उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २१५ ■ नाशिक, शनिवार, दि. ३ मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा





■ जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध... /- नाशिक आज





■ योगविद्या भारतीय परंपरेचा एक भाग... /- नाशिक आज


# लष्कर, आयएसआय पहलगाम हल्ल्यात सहभागी

## एनआयएच्या प्राथमिक तपासातील माहिती

**मुंबई : जम्मू-काश्मीरमधील २२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा प्राथमिक तपास अहवाल एनआयएने तयार केला आहे. एनआयएच्या तपास अहवालात पाकिस्तानी दहशतवादी संघटना लष्कर, आयएसआय आणि पाकिस्तानच्या लष्कराच्या कटाचे पुरावे सापडले आहेत. बेताब खोऱ्यात दहशतवाद्यांनी त्यांची शस्त्रे लपवल्याचे तपासात उघड झाले. एनआयएने ओव्हरग्राउंड कामगारांच्या संपर्कांची यादी तयार केली.**



प्राथमिक तपास अहवालात हल्ल्यात हाश्मी मुसा आणि अली भाई ऊर्फ तल्हा भाई या नावाचा समावेश आहे. हे दोघे पाकिस्तानचे नागरिक आहेत, जे पाकिस्तानी हँडलर्सच्या संपर्कात होते. त्यांना पाकिस्तानकडून मार्गदर्शक सूचना मिळत होती. आयएसआयच्या आदेशावरून लष्करच्या मुख्यालयात पहलगाम हल्ल्याबाबत कट रचण्यात आला होता. त्यामुळे पहलगाम हल्ल्यात पाकिस्तानचाच हात असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे भारताकडून अधिक आक्रमक भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

या प्राथमिक अहवालात हल्ल्याचा तपशीलवार घटनाक्रम नमूद करण्यात आला आहे. २२ एप्रिलला दुपारी १ वाजून १० मिनिटांनी सुरू झालेला हल्ला २ वाजून २० मिनिटांपर्यंत सुरु होता. हल्ल्यानंतर १० मिनिटांत म्हणजे दुपारी अडीच वाजता एफआयआर दाखल झाला. दहशतवाद्यांना पाकस्थित सूत्रधारांकडून सूचना मिळत होत्या, असेही एफआयआरमध्ये म्हटले आहे. हल्ल्यासाठी बेकायदेशीरपणे मिळवलेले ऑटोमॅटिक हत्यारे वापरण्यात आली. दहशतवाद्यांविरुद्ध यूएपीए आणि बीएनएसनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, भारताला जशास तसे प्रत्युत्तर देऊ, अशी भाषा करणारे पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान /-...३

### मदरशांना १० दिवसांची सुट्टी

बिथरलेल्या पाकिस्तानने पाकव्याप्त काश्मीरमधल्या मदरशांना १० दिवसांची सुट्टी दिली आहे. नरेंद्र मोदी आणि हवामान अशा दोन आव्हानांचा आम्ही सामना करतोय, असे स्पष्टीकरण पाकिस्तानच्या धार्मिक विभागाचे प्रमुख हाफिज नजीर अहमद यांनी दिले आहे. हमास आणि पाकिस्तान समर्थित संघटनांचा संपर्कात असल्याचे समजते. हमासने पाकव्याप्त काश्मीरमध्ये लष्कर-ए-तैयबा आणि जैश-ए-मोहम्मदसह एका रॅलीत भाग घेतला होता. पाकव्याप्त काश्मीरमधील रॅलीत हमास सामील झाला होता. तसेच पहलगाम हल्ल्यातील संशयितही पाकव्याप्त काश्मीरमधील रॅलीत सहभागी होता, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे.

## आषाढी वारीचे वेळापत्रक जाहीर

**पुणे :** यंदाचा वारी सोहळा १८ आणि १९ जूनला सुरू होणार आहे. संत तुकाराम महाराज पालखी १८ जून रोजी देहूतून प्रस्थान करेल. संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान १९ जून रोजी होईल. पंढरीत आषाढी एकादशीचा महासोहळा ६ जुलैला होईल. पालखी सोहळ्यात चांदोबाचा लिंब येथे पाहिले उभे रिंगण, पुरंदवडे येथे पहिले गोल रिंगण, खुडूस फाटा येथे दुसरे गोल रिंगण, ठाकूरबुवाची समाधी येथे तिसरे गोल रिंगण, वाखरीच्या बाजीराव विहीर येथे दुसरे उभे व चौथे गोल रिंगण, इसबावी पादुकांजवळ पंढरपूर प्रवेशापूर्वी तिसरे उभे रिंगण होईल.

# अवकाळी पावसाचे देशात दहा बळी

## शंभरहून अधिक विमानांचे मार्ग वळवले

**नवी दिल्ली :**

दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये वादळी पाऊस आणि वीज पडण्याच्या घटनांमध्ये दहा जणांचा मृत्यू झाला. दिल्ली-यूपीमध्ये प्रत्येकी चार आणि छत्तीसगडमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला. दिल्ली-एनसीआरमध्ये जोरदार वारे आणि धुळीचे वादळ वाहत असून, सखल भागात पाणी साचले आहे. दिल्ली विमानतळावरून १००हून अधिक उड्डाणे उशिराने झाली आहेत. तीन उड्डाणेदेखील वळवावी लागली.



गुरुवारी (दि. १) रात्रीपासून राजधानी दिल्लीत वादळासह मुसळधार पाऊस सुरू आहे. राजधानी आणि त्याच्या आसपासच्या भागात पहाटे पाच वाजण्याच्या सुमारास जोरदार वारे वाहू लागले. वारे इतके जोरदार होते की, अनेक भागांत फांद्या तुटून रस्त्यावर पडल्या. शुक्रवारी सकाळी दिल्लीतील द्वारका येथील खारखरी कालवा गावात कडुलिंबाचे झाड पडून एका महिलेचा व तिच्या तीन मुलांचा मृत्यू झाला. महिलेचा पती जखमी झाला आहे. /-...३

# नाशिक रोडला पूर्ववैमनस्यातून सराईताचा खून

## संशयित स्वतःहून पोलिस ठाण्यात हजर

**नाशिक रोड : प्रतिनिधी**

नाशिक रोड परिसरातील जेल रोड, मोरे मळा भागात गुरुवारी (दि. १) रात्री दोन तडीपार गुंडांमध्ये हाणामारी झाली. किरकोळ कारणावरून सुरू झालेला वादात धारदार हत्याराच्या हल्ल्यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. या घटनेनंतर हल्लेखोर संशयित स्वतः पोलीस ठाण्यात हजर होत गुन्ह्याची कबुली दिली.




जेल रोड भागातील मोरे मळा येथे राहणारा संशयित गुन्हेगार नीलेश पेखळे गुरुवारी रात्री घराजवळ उभा होता. त्याचवेळी तडीपार असलेला त्याचा गुन्हेगार मित्र हितेश डोईफोडे आणि त्याचा मित्र बंटी बंग (दोघेही रा. साने गुरुजीनगर, जेल रोड) मोरे मळा परिसरात आले. यावेळी नीलेश आणि हितेश यांच्यात जुन्या कारणावरून वाद सुरू झाला. दोघेही एकमेकांवर धावून गेले. नीलेशने धारदार हत्याराने हितेशवर हल्ला केला. डोक्याला गंभीर मार बसल्याने हितेश जमिनीवर कोसळला. त्याचा मित्र बंटी मध्यस्थी करण्यासाठी पुढे आला असता, नीलेशने त्याच्यावरही हल्ला चढवला. त्यावेळी नीलेशसह त्याचे आणखी दोन मित्र घटनास्थळी उपस्थित होते. हितेश गंभीर जखमी झाल्यानंतर नीलेशने त्याला स्वतःच्या चारचाकी वाहनात टाकून जिल्हा रुग्णालय गाठले. मात्र, रुग्णालयात पोहोचल्यावर हितेशचा मृत्यू झाल्याचे समजताच नीलेशने तेथून पळ काढला आणि थेट नाशिक रोड पोलिस /-...३

# वेव्हज् परिषद भारताच्या सर्जनशील क्षेत्रासाठी ऐतिहासिक क्षण : पंतप्रधान

## भारतातील पहिल्या मनोरंजन परिषदेचे मुंबईत उद्घाटन

**मुंबई :** जागतिक ऑडिओ व्हिज्युअल आणि मनोरंजन शिखर परिषदेचे (वेव्हज्) उद्घाटन गुरुवारी (१ मे) मुंबईतील जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. या परिषदेत जगभरातील शंभरहून अधिक कलाकार, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते एकत्र आले आहेत.

यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा भारताच्या सर्जनशील क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक क्षण आहे.





जागतिक निर्मात्यांना त्यांनी भारताला कंटेंट प्लेग्राउंड बनवण्याचे आवाहन केले आणि देशाच्या सांस्कृतिक समृद्धतेवर, कथाकथनाच्या वारशावर आणि उदयोन्मुख संत्र्याच्या अर्थव्यवस्थेवर भर दिला.

पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या डिजिटल भविष्यावर लक्ष केंद्रित करून या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. त्यांनी भारतीय चित्रपट उद्योगातील सेलिब्रिटी आणि इतर कंटेंट निर्मात्यांच्या मोठ्या संख्येने उपस्थितांना संबोधित केले. त्यांनी भारतात बनवलेल्या कंटेंटबद्दल आणि देशाला आर्थिकदृष्ट्या भरभराटीला नेण्यासाठी कंटेंट निर्मात्यांच्या क्षमतेबद्दल सविस्तर चर्चा केली. भविष्यात वेव्हज अवॉर्डसारखे आणखी उपक्रम राबवण्याचे आश्वासनही दिले. या परिषदेच्या निमित्यांने १० हजारांहून अधिक प्रतिनिधी, एक हजार निर्माते, तीनशे /-...३

# शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन मी दिले नाही!

**मुंबई :** महायुती सरकारने सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जमाफी संदर्भात जाहीरनाम्यामध्ये घोषणा केली होती. मात्र, सत्तेत आल्यानंतर निधीचे कारण देत शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसंदर्भात कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. शुक्रवारी (दि.२) उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापूरमध्ये बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर अक्षरशः हात झटकले.

### अजित पवारांनी झटकले हात



कोल्हापुरात यासंदर्भात बोलताना अजित पवार म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे आश्वासन कोणी दिले? मी तरी दिलेले नाही, असे म्हणत एक प्रकारे या मुद्द्याला बगल देण्याचा प्रयत्न केला. महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन देण्यात आले होते. दरम्यान, लाडकी बहीण हप्त्याच्या संदर्भाने पवार यांनी भाष्य केले. ते म्हणाले की, लाडक्या बहिणी योजनेचे आम्ही नियोजन केले आहे. आदित्य तटकरे यांनी सांगितल्यानंतर तातडीने नियोजन केले असून, सगळ्या योजनांचे पैसे देण्याचा प्रयत्न करत आहोत. पालकमंत्रिपदावरून बोलताना ते म्हणाले की, रायगडला पालकमंत्री दिला नाही म्हणून काही अडले आहे का? सर्व कामे होत आहेत. कोण काय बोलले याबद्दल मला विचारू नका, असे म्हणत त्यांनी खासदार संजय राऊत यांनी केलेल्या वक्तव्यावर बोलण्यास नकार दिला. दुसरीकडे, मुख्यमंत्र्यांसह अनेक मंत्र्यांनी कर्जमाफीचे /-...३

# अचूक मतदार यादीसाठी आयोगाकडून तीन मोठे बदल

**नवी दिल्ली :** भारत निवडणूक आयोगाने मतदारयादी अधिक अचूक करण्यासाठी आणि मतदान प्रक्रिया सुलभ करण्यासाठी तीन नवे उपक्रम सुरू केले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वात सुलभीकरणाची प्रक्रिया पार पडली.

महत्त्वाचा निर्णय म्हणजे, आता मृत्यू नोंदणीची माहिती थेट इलेक्ट्रॉनिक स्वरूपात रजिस्ट्रार जनरल ऑफ इंडियाकडून निवडणूक आयोगाला मिळणार आहे. त्यामुळे मृत व्यक्तींची नावे वेळीच मतदार यादीतून हटवणे शक्य होणार आहे. बूथ लेव्हल ऑफिसर्स, म्हणजेच यांना आता एकसंध फोटो ओळखपत्र देण्यात येणार आहे. त्यामुळे मतदारांची खात्री होईल आणि घरपोच पडताळणीसाठी अधिक विश्वासार्ह ठरतील. मतदार माहिती पर्चीची नव्या डिझाइनमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. मतदाराचा क्रमांक आणि भाग क्रमांक आता अधिक ठळकपणे छापले जातील, जेणेकरून मतदान केंद्र शोधणं आणि यादीत नाव मिळवणे अधिक सोपे होईल.

या सर्व सुधारणा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या आहेत. मार्चमध्ये झालेल्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या परिषदेमध्ये या बदलांची रूपरेषा ठरवण्यात आली होती. मतदारयादी ही निवडणूक /-...३

# शंभर दिवसांच्या निकालात महिला-बालविकास सर्वोत्तम

## दानवेंची महायुती सरकारवर टीका

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारच्या शंभर दिवसांच्या कामांचा निकाल गुरुवारी (दि. १) जाहीर करण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मंत्री आदिती तटकरे यांचा महिला आणि बालविकास विभाग ८० टक्के गुणांसह सर्वोत्तम ठरला आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग दुसऱ्या, तर कृषी विभाग तिसऱ्या स्थानी आहे.

या शंभर दिवसांच्या रिपोर्ट कार्डवर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी हल्लाबोल केला आहे. स्वतःच परीक्षा घ्यायची, स्वतःच मार्क द्यायचे, कोणाला तरी पास करायचे, कोणाला नापास करायचे काम सरकारने केले आहे. पालघर जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांना /-...३

# आदि-शबरी फेडरेशनला कॉर्पोरेट मंत्रालयाची परवानगी

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांच्या शेतकरी उत्पादक कंपन्यांना एकत्र करून आदि-शबरी असे फेडरेशन तयार करण्यात आले आहे. या फेडरेशनला केंद्रीय कॉर्पोरेट मंत्रालयाने परवानगी दिली असल्याने शबरी नॅचरल्ससाठी हे महत्त्वाचे पाऊल ठरले आहे.



आदिवासी बांधवांच्या प्रिमियम उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ प्रयत्नशील आहे. अल्पावधीत देशभरात प्रसिद्ध झालेल्या शबरी नॅचरल्स या ब्रँडला फक्त महामंडळाच्या अखत्यारित न ठेवता आदिवासी बांधवांचे फेडरेशन तयार करण्यात येत आहे.

या माध्यमातून आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावण्यासाठी, त्यांच्या प्रिमियम उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करण्यासाठी विशेष फेडरेशनची आवश्यकता होती. महामंडळाच्या पन्नास आदिवासी शेतकरी उत्पादक कंपन्यांना एकत्र करून महामंडळाने आदि-शबरी फेडरेशनची स्थापना केली आहे. यामध्ये महामंडळाची सहाय्यक अशी भूमिका असणार आहे.

शबरी नॅचरल्सची उत्पादने तसेच त्याबाबतचे सर्व निर्णय फेडरेशन घेणार आहे. याबाबत मंजुरीसाठी केंद्रीय कॉर्पोरेट मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

सर्व पडताळण्या पूर्ण झाल्यानंतर आता केंद्रीय कॉर्पोरेट मंत्रालयाने याला मंजुरी दिली आहे. शबरी नॅचरल्सबाबत यापूर्वीच गुणवत्ता, मोजमाप आणि यंत्रे याबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. तसेच सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांसाठी भारत सरकारद्वारे असलेल्या उद्यमचे नोंदणी प्रमाणपत्रदेखील प्राप्त झाले आहे.

> आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी बांधवांचे जीवनमान, त्यांची संस्कृती जपणे यासाठी प्रयत्न करण्यात येत असतात. त्यासाठी शबरी नॅचरल्स हा एकछत्री ब्रँड तयार करण्यात आला आहे. या ब्रँडला सर्वतोपरी शासकीय मान्यता मिळाल्या आहेत. आदि-शबरी फेडरेशनला मान्यता मिळाली असून, लवकरच त्याकडे हस्तांतर होणार आहे.
>
> **- लीना बनसोड,** आयुक्त, आदिवासी विकास विभाग, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ

# भूसंपादनातील ३७ कोटींच्या मोबदल्याला ब्रेक!

## डॉ. करंजकरांवर प्राधान्य समितीला डावलल्याचा ठपका

**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिकेचे तत्कालीन आयुक्त डॉ. अशोक करंजकर यांनी रात्रीस खेळ करून ५५ कोटींचे भूसंपादन केल्याने शहरात वादंग उठले होते. प्रशासनाने नेमलेल्या चौकशी समितीच्या तपासणीत तत्कालीन आयुक्तांनी प्राधान्यक्रम डावलून त्यांनी भूसंपादन केल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे ५५ कोटींपैकी तब्बल ३७ कोटी ६८ लाखांचा भूसंपादनाचा मोबदला प्रशासनाने रोखला आहे. भूसंपादनातील अकरा प्रकरणांपैकी पाच प्रकरणे आवश्यक नसल्याचा निष्कर्ष सदर चौकशी समितीन काढला आहे.**



नाशिक पूर्वचे आमदार डॉ. राहुल ढिकले यांनी अधिवेशनामध्ये लक्षवेधी मांडत भूसंपादनावरून आरोप केले होते. त्यानंतर शासनाने याप्रकरणी विद्यमान आयुक्त मनीषा खत्री यांना भूसंपादन चौकशीचे आदेश देत सविस्तर अहवाल सादर करा, असे आदेश दिले. दोन महिने या प्रकरणाची चौकशी सुरू होती. त्यात ११ पैकी सहा प्रकरणांत भूसंपादनाचा जो मोबदला अदा करण्यात आला त्यास क्लीन चीट देण्यात आली. परंतु उर्वरित पाच भूसंपादनाच्या प्रस्तावावर आक्षेप नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे या पाच भूसंपादन प्रकरणांचा ३७ कोटी ६८ लाखांचा मोबदला थांबवण्यात आला असून, तो कुंभमेळ्यासाठी आवश्यक भूसंपादनासाठी वापरण्यात येणार आहे. हा अहवाल शासनाला सादर करण्यात आला आहे. त्यामुळे डॉ. करंजकर यांच्या अडचणीत भर पडण्याची चिन्हे आहेत.

सिंहस्थ अथवा इतर तातडीची कोणतीही आवश्यकता नसताना भूसंपादन करण्यात आल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. डॉ. करंजकर महापालिका आयुक्त असताना रात्रीतून भूसंपादनाच्या ११ प्रकरणांत ५५ कोटींचा धनादेश काढला होता. शेतकऱ्यांच्या नावाखाली विशिष्ट बिल्डरांसाठी रात्रीतून ही कसरत करण्यात आली, असा आरोप झाला.

विशेष म्हणजे अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील भूसंपादन प्राधान्यक्रम समिती गठित असताना ती डावलून भूसंपादन उरकण्यात आले. हा महत्त्वाचा आरोप करंजकरांवर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी शेतकऱ्यांनी थेट आयुक्तांच्या दालनाबाहेर ठिय्या आंदोलन करून मनपा प्रशासनावर गंभीर आरोप केले होते. आता मात्र चौकशी समितीत डॉ. करंजकर यांना भूसंपादन प्रकरण भोवण्याची शक्यता आहे.

### या प्रकरणांना रेड सिग्नल

पाथर्डी स. नं. ३०८/ब, स. नं. ३०८/अ/१/५५ पैकी मधील १८ मिमी व ३० मी रस्ता-२ प्रस्तावात १५ कोटी ४१ लाख रक्कम यापूर्वीच जमा करण्यात आली आहे. तीदेखील कुंभमेळा भूसंपादनासाठी वर्ग केली जाणार आहे. वडाळा येथील स. नं. ६३ पै, ६४ पै, ६५ पैमधील १८ मीटर रस्ता, नाशिक स. नं. ९५५/अ/२/१ मधील ३० मीटर रस्त्यासाठीचा मोबदला रद्द करण्यात आला आहे.

## महत्त्वाचे ▶▶▶▶



### भाविकांसाठी उघडली केदारनाथची कवाडे

**नवी दिल्ली :** उत्तराखंडमधील चारधाम यात्रेतील अतिशय महत्त्वाचे धाम असणाऱ्या श्री केदारनाथ धाम येथील मंदिराची कवाडे शुक्रवारी (दि. २) अतिशय पवित्र मुहूर्तावर भाविकांसाठी उघडण्यात आली. बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असणाऱ्या केदारनाथ धाम येथील मंदिराची कवाडे शीतकाळात अर्थात या भागात हिमवृष्टी सुरू झाल्यानंतर बंद केली जातात आणि पुन्हा ठराविक अवधीनंतर उघडली जातात. यंदाच्या वर्षी केदारनाथधाम येथील कवाडे २ मे २०२५ च्या सकाळी सात वाजण्याच्या शुभमुहूर्तावर उघडण्यात आली. यावेळी मंदिर परिसरात भाविकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता.

### निंबाळकरांना पोलिसांचे समन्स

**मुंबई :** विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक निंबाळकरांना साताऱ्याच्या वडूज पोलिसांनी समन्स पाठवले आहे. शनिवारी (दि. ३) सकाळी ११ वाजता चौकशीसाठी त्यांना पोलिस ठाण्यात उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तुषार खरातांकडून मंत्री जयकुमार गोरेंच्या बदनामी प्रकरणात रामराजे नाईक निंबाळकरांना हे समन्स पाठविण्यात आले आहे. या प्रकरणात शरद पवार गटाचे नेते सामील असल्याचा आरोप जयकुमार गोरेंनी केला होता. निंबाळकर यांच्यासह माजी आमदार प्रभाकर घार्गे यांच्यासह पत्रकार आणि त्यांच्या संपर्कात असलेले काही कार्यकर्ते यांना नोटिसा बजावल्याचे समजते.

### पंकजा मुंडेंना अश्लील फोन

**बीड :** मंत्री आणि भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांना अश्लील मेसेज पाठवून आणि कॉल करून त्रास देणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. अमोल काळे असे आरोपीचे नाव असून, तो पुण्याचा आहे. गेल्या काही दिवसांपासून तो पंकजा मुंडेंना कॉल आणि मेसेजद्वारे त्रास देत होता. याप्रकरणी मुंडे यांच्या कार्यालयाने सायबर पोलिसांत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर सायबर पोलिसांनी बीएनएसच्या कलम ७८ आणि ७९ तसेच आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. सायबर पोलिसांनी भोसरी पोलिसांच्या मदतीने आरोपी अमोल काळे याला अटक केली.

### माजी आमदार जगताप यांचे निधन

**मुंबई :** अहिल्यानगरचे माजी नगराध्यक्ष आणि विधान परिषदेचे दोन टर्म सदस्य अरुण जगताप (वय ६७) यांचे शुक्रवारी (दि. २) अल्पशा आजाराने पुण्यातील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. अहिल्यानगर शहराचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संग्राम जगताप यांचे ते वडील होते. अरुण जगताप हे अहिल्यानगरच्या राजकारण आणि समाजकारणात काका या नावाने परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी पार्वती, राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार संग्राम जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन, सुना व नातवंडे असा परिवार आहे. भाजपचे राहुरीचे आमदार शिवाजीराव कर्डिले हे त्यांचे व्याही होत.

महत्त्वाचे



## पिंपळगाव बसवंत कन्या विद्यालयात आजपासून आनंदमेळ्याला सुरुवात

**पिंपळगाव बसवंत :** निफाड तालुका एज्युकेशन सोसायटी संचालित कै. बी. पी. पाटील ज्युनिअर कॉलेज व बी.के. बनकर एक्सपेरियमेंटरी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळगाव बसवंत कन्या विद्यालय प्रांगणात ३ ते १३ मेपर्यंत आयोजित आनंदमेळा महिला व बालगोपाळांसाठी पर्वणी ठरणार आहे. यात खाऊ गल्लीसह आंबा महोत्सव, पापड महोत्सव, वाळवण यात्रा, खाद्य स्टॉल, फन गेम, ग्रामसंस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या या आनंदमेळ्यात खाऊ गल्ली विशेष आकर्षण असणार आहे. शिवाय विविध राज्यांतील वेशभूषा परिधान स्पर्धा, रांगोळी, पाककला स्पर्धेसह बरेच काही या मेळ्यात अनुभवता येणार आहे. शिवाय आंबा महोत्सव, पापड महोत्सव, वाळवण यात्रा, व सांस्कृतिक कार्यक्रमांसह शॉपिंग, खाद्य स्टॉलसह फन गेमिंगचा आनंद घेण्यासाठी पिंपळगावकरांनी आपल्या पाल्यासोबत या आनंदमेळा व खाऊ गल्लीला आवर्जून भेट द्यावी, असे आवाहन निफाड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा मंगला जाधव, उपाध्यक्ष भास्कर बनकर यांच्यासह संचालक मंडळ, तसेच बी.पी. पाटील ज्युनिअर कॉलेज, बी.के. बनकर एक्सपेरियमेंटरी स्कूलच्या वतीने करण्यात आले आहे.

## येवल्यातील पारख पतसंस्थेत मेळावा

**येवला :** येथील कै. सुभाषचंदजी पारख नागरी सहकारी पतसंस्थेत गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत म्हणून पतसंस्थेचे सभासद, ठेवीदार, हितचिंतक यांच्या संयुक्त विचारविनिमय मेळाव्याचे आयोजन रविवार, दिनांक ४ मे रोजी येवल्यात करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली आहे सकाळी दहा वाजता येवला शहरातील राधाकृष्ण लॉन्स, विंचूर रोड येथे मेळाव्याचे आयोजन केले आहे, अशी माहिती पतसंस्थेचे संस्थापक पंकज पारख यांनी पत्रकारांना दिली. या संदर्भात माहिती देताना पारख म्हणाले की, गेल्या पाच-सहा वर्षांत अनियमिततेच्या कारणांमुळे पतसंस्थेत गुंतवलेले पैसे ठेवीदारांना मिळत नसल्याने ठेवीदार चिंतेत आहेत. कर्जदार झाले करोडपती आणि ठेवीदार झाले रोडपती, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. ठेवीदारांच्या हितासाठी संस्थापक पंकज पारख यांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे ठेवीदारांच्या ठेवी लवकरात लवकर कशा परत करता येतील यासंदर्भाने पतसंस्थेचे सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांना एकत्र करून पतसंस्थेची सध्याची आर्थिक स्थिती, कर्ज, ठेवी, वसुलीची सत्य परिस्थिती याबाबत सर्वांच्या सहविचाराने चर्चा होऊन सन्माननीय मार्ग काढण्याच्या दृष्टीने बैठकीचे आयोजन केले आहे, असे पारख यांनी सांगितले. दरम्यान, संस्थेच्या सर्व सभासद, ठेवीदार आणि हितचिंतकांनी या विशेष बैठकीसाठी उपस्थित राहावे. सहकार्य करण्याची भूमिका पारख यांनी नमूद केली. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्यात म्हणून मेळाव्यात आगामी दिशा ठरविण्याचे संकेत पारख यांनी दिले आहेत.

## चांदवड प्रशासकीय कार्यालयात महाराष्ट्र दिन



**चांदवड :** महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त १ मेस चांदवड येथील प्रशासकीय कार्यालयात उत्साहाचे वातावरण होते. आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण समारंभ झाला. याप्रसंगी चांदवडचे उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, तहसीलदार मंदार कुलकर्णी, पोलीस निरीक्षक कैलास वाघ, गटविकास अधिकारी मच्छिंद्र साबळे, मुख्याधिकारी सिनारे यांच्यासह चांदवडचे उपविभागीय माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल, भाजपचे ज्येष्ठ नेते मोहन शर्मा, अशोककाका व्यवहारे, सुरेश पाटील, योगेश ढोमसे, विजय धाकराव, संजय पाडवी व अनेक नागरिक उपस्थित होते.

# बाभूळगावच्या तलावात गेलेल्या जमिनीचा मोबदला द्या

## नाथपंथी चार कुटुंबीयांचे पंचायत समिती कार्यालयासमोर उपोषण, लेखी आश्वासनानंतर मागे

**येवला : प्रतिनिधी**

**बाभूळगाव बुद्रुक येथील ३८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी खरे कुटुंबीयांची जमीन अधिग्रहीत केली होती. २७ वर्षे उलटूनही शासनाकडून जमिनीचा मोबदला न मिळाल्याने नाथपंथी खरे कुटुंबीयांनी येथील पंचायत समिती कार्यालयासमोर महाराष्ट्रदिनी उपोषण सुरू केले होते. रात्री उशिरा स्वारिपचे तालुकाध्यक्ष महेंद्र पगारे यांनी मध्यस्थी केली. गटविकास अधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर हे उपोषण मागे घेण्यात आले.**



**बाभूळगाव बुद्रुक येथील नाथपंथी गोसावी समाजातील खरे कुटुंबीयांनी पंचायत समिती कार्यालयासमोर सुरू केलेले बेमुदत उपोषण लिंबूपाणी देऊन सोडताना गटविकास अधिकारी संदीप वायाळ, महेंद्र पगारे.**

बाभूळगाव खुर्द येथे ३८ गावे नळपाणी पुरवठा योजनेत खरे कुटुंबातील चार भावांची एक हेक्टर ५६ आर म्हणजेच पावणेचार एकर जमीन शासनाने अधिग्रहीत केली होती.

याठिकाणी या चार भावांची कसत असलेली जमीन, विहीर, समाजासाठी असलेली स्मशानभूमी होती. शासनाने पाणीपुरवठा योजनेसाठी जमीन अधिग्रहीत केल्यानंतर ग्रामपंचायतीने गावठाण जागा त्यांना राहण्यासाठी व स्मशानभूमीसाठी दिली. मात्र, विस्थापित झालेल्या चार कुटुंबांतील मुलांना शासनाकडून जमिनीचा मोबदला, घरे व शासकीय नोकरीचा शब्द अद्याप पूर्ण झालेला नाही. अनेक वर्षांपासून शासन दरबारी लेखी व तोंडी स्वरूपात न्याय मागूनही कुणीच लक्ष देत नसल्याने १ मे महाराष्ट्रदिनी येथील पंचायत समिती कार्यालयासमोर पोपट खरे, गोरख खरे, नाना खरे, मच्छिंद्र खरे, भरत खरे, नवनाथ खरे, राजेंद्र खरे, मनोहर खरे, विनोद खरे, विशाल खरे, संदीप खर, राहुल खरे, संकेत खरे, सुरेश खरे, सुनील खरे, भूषण खरे, किरण खरे, जन्याबाई खरे, अन्नपूर्णाबाई खरे, जिजाबाई खरे, अनिता खरे, अरुणा खरे, संगीता खरे, सुनीता खरे, सोनाली खरे, रोहिणी खरे आदी बेमुदत उपोषणास बसले होते.

### या मागण्यांसाठी केले उपोषण

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने विस्थापित चारही कुटुंबांतील सदस्यांना राहण्यासाठी प्रत्येकी एका व्यक्तीस एक घर बांधून देण्यात यावे, प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय नोकरी देण्यात यावी, स्मशानभूमीसाठी नाथपंथी गोसावी समाजाला जागा नावावर करून द्यावी, अधिग्रहीत झालेली जमिनीची योग्य रक्कम देण्यात यावी आदी मागण्या यावेळी खरे कुटुंबीयांनी केल्या होत्या. यातील गटविकास अधिकारी संदीप वायाळ यांनी खरे कुटुंबीयांना शासनाच्या वतीने प्रत्येक कुटुंबाला घरकुल देण्यासह समाजाला स्मशानभूमी नावावर करून देण्याचे लेखी आश्वासन दिले. अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा मोबदला व शासकीय नोकरीत सामावून घेण्याचा मुद्दा हा प्रांत व जिल्हाधिकारी यांच्याअंतर्गत विषय असल्याने यात प्रांतांकडे संपर्क साधून तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर उपोषण सोडण्यात आले.



## ढसाळांनी मराठी साहित्याला दिले नवे रूप

### येवल्यातील तुही यत्ता कंची कार्यक्रमातील सूर

**येवला : प्रतिनिधी**

नामदेव ढसाळ यांच्या कवितेत आलेले अनेक शब्द आणि त्यांचे अर्थ प्रस्थापित मराठी साहित्याला अपरिचित होते. तथापि, ढसाळ यांच्या कवितेमुळेच मराठी साहित्याला एक नवे रूप मिळाले. ते जनमानसांत रुजविण्यासाठी बहुजनांतील साहित्यिकांनी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी, असा सूर येथे उमटला.

शहरातील सेनापती तात्या टोपे शिक्षण प्रसारक मंडळाच्या एन्झोकेम हायस्कूलच्या मैदानात भल्याभल्यांना त्यांची यत्ता कंची? असं विचारणारा कार्यक्रम नुकताच सादर झाला. माजी आमदार मारोतराव पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ नेते महेंद्र काले अध्यक्षस्थानी होते.

संस्थेचे अध्यक्ष पंकज पारख, सचिव सुशील गुजराती व एन्झोकेम शाळेचे प्रशासन अधिकारी दत्ता महाले, प्राचार्य दत्तात्रेय उटावळे, समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष अर्जुन कोकाटे, सरचिटणीस दिनकर दाणे आणि राष्ट्र सेवा दलाच्या कार्यकर्त्यांच्या विशेष पुढाकाराने हा कार्यक्रम झाला.

मुंबई येथील ज्येष्ठ पत्रकार युवराज मोहिते यांनी सूत्रसंचालन केले. नामदेव ढसाळ यांच्या गोलपिठापासून तर अनेक एकापेक्षा एक सरस कविता अभिनेत्री चिन्मयी सुमित, कवयित्री नीरजा, सिनेअभिनेता हेमंत ढोमे, अभिनेतो अक्षय शिंपी यांनी सादर केल्या.

## फांगदर शाळेत शैक्षणिक वस्तूंचे वाटप

**देवळा : प्रतिनिधी**

देवळा येथील पोलीस ठाण्यातील हवालदार रविराज बच्छाव यांच्या हस्ते फांगदर शाळेचे ध्वजारोहण झाले. पहिली ते चौथीतील पहिल्या पाच क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांना बच्छाव यांच्याकडून इंग्रजी डिक्शनरी, चालू घडामोडींवर आधारित जनरल नॉलेज पुस्तक व इंग्रजी अंकलिपी, तसेच इतर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी बच्छाव यांनी जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

गेल्या काही दिवसांपूर्वी फांगदर शाळेला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती पाहत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यावी, या उद्देशाने १ मे महाराष्ट्र दिनाच्या दिवशी विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत केली.



**पोलीस हवालदार रविराज बच्छाव यांच्याकडून फांगदर शाळेला दिलेली शैक्षणिक भेट. समवेत शिक्षक व विद्यार्थी. (छाया : विनोद देवरे)**

हवालदार बच्छाव यांनी प्रेरणादायी असा प्रवास विद्यार्थ्यांसमोर कथन केल्यानंतर मुख्याध्यापक संजय गुंजाळ यांनी बच्छाव सन्मान केला.

यावेळी निंबा शेवाळे, संजय पवार, प्रवीण मोरे, योगेश मोरे, विनोद मोरे, काळू पवार, भूषण आहेर, पद्माकर बिरारी, ऋषिकेश वाघ यांसह मान्यवर उपस्थित होते. उपशिक्षक खंडू मोरे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्याध्यापक संजय गुंजाळ यांनी आभार मानले.



## आदिवासी भागात अक्षयतृतीया उत्साहात

**दिंडोरी : प्रतिनिधी**

आखाजी (अक्षयतृतीया) हा सण मराठी महिन्यातील वर्षाचा शेवटचा सण सुरगाणा, पेठ, दिंडोरी यांसह जव्हार, विक्रमगड, डहाणू येथील आदिवासीबहुल क्षेत्रात उत्साहात साजरा झाला.

दिंडोरी तालुक्यातील ठेपणपाडा, धोंडाळपाडा, नळवाडपाडा, जोरणपाडा आदी गावांत महिलांनी सात दिवस आधी शेणाने सारवलेल्या लहान दुथडी (टोपली)मध्ये नागली, उडीद, भात, वरी, मका आदी धान्य पेरली होती. टिपऱ्या वाजवून गौराईची गाणी गायली. फुगडी, पुरुषांना गौरी माळणे आदी कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडून आखाजी सण झाला.

## पेठ तहसील कार्यालयात विविध दाखल्यांचे वाटप

**पेठ : प्रतिनिधी**

शासनाने निर्धारित कालावधीदरम्यान सामान्य नागरिकांना अल्प कालावधीत कार्यालयीन सेवा देण्याकामी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०२५ नुसार सेवा हक्क दिन पेठ तहसील कार्यालयात साजरा करण्यात आला.

यावेळी उत्पन्नाचे १५, जातीचे ७, अधिवास १२ ई-रेशनकार्ड १० दाखल्यांचे वितरण करण्यात आले. तहसीलदार आशा गांगुर्डे यांनी या कायद्याचे वैशिष्ट्य व त्याचा वापर करून आपली समस्या सोडवून घेण्याचे आवाहन केले.



यावेळी तालुका भूमी अभिलेखच्या उपअधीक्षक नंदा बहिरट, नायब तहसीलदार रामकिसन राठोड, संजय गांधी योजनेचे अनिल उपरे, पुरवठा निरीक्षक वनिता गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी सन २०२४-२५ मध्ये व्हीएलई-६ वर उत्कृष्ट काम केलेल्या यासीन शेख, संपत दळवी, नितीन धर्मराज महाले, भगवान गायकवाड, विनोद सहाळे, रवींद्र महाले, प्रशांत टोपले यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

## ओझरला आज पाणीपुरवठा बंद

**ओझर : वार्ताहर**

ओझरसह उपनगरांना पाणीपुरवठा करणाऱ्या पालखेड येथील पंपिंग स्टेशनमध्ये विजेच्या देखभालीचे काम सुरू असल्याने शहरात शनिवारी (दि. ३ मे) पाणीपुरवठा होणार नाही, असे ओझर नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाने कळविले आहे.

पालखेड येथील पंपिंग स्टेशनमध्ये देखभालीचे काम सुरू असल्याने शनिवारी (दि. ३) होणारा पाणीपुरवठा शक्य झाल्यास उशिराने करण्यात येईल. उद्याचा पाणीपुरवठा रविवारी (दि. ४) करण्यात येईल. रविवारचा पाणीपुरवठा सोमवार (दि. ५) करण्यात येईल.

## केंद्रप्रमुख पवार यांचे कार्य कौतुकास्पद : माजी मंत्री घोलप

**दिंडोरी : प्रतिनिधी**

वणी (ता. दिंडोरी) येथील कार्यकुशल केंद्रप्रमुख किसनराव पवार यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य आदर्शवत व कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री बबनराव घोलप यांनी केले.

केंद्रप्रमुख किसन पवार यांच्या सेवापूर्ती सोहळ्याप्रसंगी घोलप मार्गदर्शन करताना बोलत होते.

पवार थेरगाव येथील रहिवासी असून, प्राथमिक शिक्षक पदवीधर शिक्षक व केंद्रप्रमुख पदावर ३८ वर्षे सेवा केली. ते उत्कृष्ट



चारोळीकार, लेखक, कवी व उत्कृष्ट सूत्रसंचालक असून, त्यांच्या विविध पैलूंचा उलगडा घोलप यांनी करून दिला. जिल्हा परिषद माजी अध्यक्ष दिगंबर गिते यांनी किसन पवार यांचे विविध प्रसंग व गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख केला. याप्रसंगी मविप्र संस्थेचे संचालक शिवाजीराव गडाख, नाशिक महापालिका माजी नगरसेविका प्रियंका माने, कॅनॉल बागायतदार संघाचे ओझर संचालक आनंद बोराडे, शेतकरी संघटना जिल्हाध्यक्ष अर्जुन तात्या बोराडे, विभागीय द्राक्ष संघाचे पुणे येथील संचालक सोपानराव बोराडे, डॉ. किरण देशमुख, प्राथमिक शिक्षक सिन्नर पतपेढीचे प्रदीप शिंदे, प्राथमिक शिक्षक पतसंस्था येवल्याचे चेअरमन किरण जाधव, प्राथमिक शिक्षक पतसंस्था निफाडचे चेअरमन निंबा बोरसे, प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे दिंडोरीचे चेअरमन श्रावण भोये, शंकर ठाकरे, प्रतीक अहिरे, विशाल पवार, पूनम पवार, साक्षी पवार, पल्लवी चौधरी, सरला कापसे, सुलोचना पवार, गायत्री राऊत, कवी राजेंद्र गांगुर्डे, शिक्षण विस्तार अधिकारी मंदाकिनी लाडे, शरद कोठावदे आदींनी मनोगत व्यक्त केले. पल्लवी चौधरी यांनी प्रास्ताविक केले. कवी राजेंद्र उगले यांनी सूत्रसंचालन केले.



## डोंगरगाव कालव्याला पाणी मिळण्यासाठी जनजागृती

**येवला : प्रतिनिधी**

डोंगरगाव पोहोच कालव्याला वाढीव पूरपाणी मिळावे, यासाठी येवला तालुक्यात जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती पुणेगाव- दरसवाडी पोहोच कालवा समितीचे अध्यक्ष श्रावण देवरे पाटील यांनी दिली.

दरम्यान, हिंदू धर्माच्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणाऱ्या अक्षयतृतीया दिनाचे औचित्त साधत डोंगरगाव येथे पुणेगाव- दरसवाडी- डोंगरगाव पोहोच कालवा समितीच्या सदस्यांनी येवला तालुक्यातील डोंगरगाव येथे हनुमान मंदिरात सभा घेतली. पुणेगाव- दरसवाडी- डोंगरगाव पोहोच कालव्याला वाढीव पूरपाणी पाणी मिळावे, यासाठी येवला तालुक्यातील प्रत्येक गावोगावी जाऊन पाण्यावर संघर्ष करण्यासाठी जनजागृती करणार आहे.

पाण्यासंदर्भात सखोल माहिती काढून येवला उत्तरपूर्व भागासाठी जास्तीत जास्त नदीजोड प्रकल्पाची जोडणी करून करंजवण, वाघाड, पालखेड आदी धरणांचे पाणी हे पुणेगावमधून पुणेगाव- दरसवाडी- डोंगरगाव पोहोच कालव्यासाठी देण्यात यावे, यासाठी समितीचे सदस्य येत्या काही दिवसांत मोठा संघर्ष, आंदोलन उभे करणार आहेत, असे समितीचे संस्थापक बद्रिनाथ कोल्हे पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, डोंगरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच उज्ज्वलाताई ढोकळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून पुढील नियोजन करण्यात आले. याप्रसंगी समिती अध्यक्ष श्रावण देवरे पाटील, उपाध्यक्ष दत्तू पाटील सोमासे, समिती सदस्य रमेश पाटील ढोकळे, ज्ञानेश्वर पाटील सोमासे, संजय पाटील सोमासे, पारसनाथ सोमासे, गणेश सोमासे, तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

## गोदाकाठ परिसरात बिबट्याची दहशत संपता संपेना

### बिबट्याचे हल्ले अन् विजेचाही लपंडाव; पिंजरा लावण्याची ग्रामस्थांची मागणी

**निफाड : प्रतिनिधी**

गेल्या पंधरा वर्षांपासून तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात बिबट्याचा संचार वाढला असून, बिबट्याच्या हल्ल्यात अनेक शेळ्या-मेंढ्यांसह पाळीव जनावरे आणि बालके, तसेच शाळकरी मुलांनादेखील जीव गमवावा लागला आहे.

तालुक्याच्या गोदाकाठ परिसरात उसाचे क्षेत्र मोठे आहे. मुबलक पाणी आणि जनावरांचे खाद्य यामुळे गेल्या काही दशकांपासून बिबट्याचा वावर या परिसरात वाढला आहे. आतापर्यंत शिवरे परिसरात चार, तर करंजी, गोदानगर, तारूखेडले, तामसवाडी, कोठुरे, शिंगवे, म्हाळसाकोरे येथील बालकेदेखील बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेली आहेत. अनेक नागरिक



जखमी झाले आहेत.

वन विभागाने हा परिसर बिबट्याप्रवण क्षेत्र म्हणून घोषित केला असताना त्या तुलनेत जनजागृती करण्यात आलेली नाही. परिसरात ऊस पिकाबरोबरच कादवा, दारणा आणि गोदावरी नद्यांसह नांदूरमध्यमेश्वर धरण आणि पालखेड कडवा याबरोबरच नांदूर धरणाचे तीन कालवे असल्याने परिसरात मुबलक पाणीसाठा, तसेच काटेरी झुडपे आणि उसाच्या मुबलक क्षेत्राच्या आश्रयाने बिबट्याचा मुक्तहस्ते वावर वाढत आहे. निफाड, रसलपूर, पिंपळस, कोठुरे जळगाव, काथरगाव, सुंदरपूर, दिंडोरी, नांदूरमध्यमेश्वर, म्हाळसाकोरे, भुसे, चापडगाव, शिंगवे, चांदोरी, सायखेडा, तामसवाडी तारुखेडले, मांजरगाव, सारोळेथडी, खेडलेझुंगे, गाजरवाडी, चाटोरी, चितेगाव, लालपाडी, वऱ्हेदारणा, चेहेडी यांसह गोदाकाठ परिसरातील असंख्य गावांत उसाचे क्षेत्र असल्याने या गावांमध्ये देखील बिबट्याचे नेहमीच वास्तव्य असते. वन विभागानेदेखील या परिसरातील बिबट्यांची संख्या कमी कशी करता येईल, यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

### जनावरे सांभाळणे अवघड

साखर कारखान्यांचा हंगाम नुकताच संपल्याने तालुक्यात उसाचे क्षेत्र कमी झाल्याने बिबट्यांचे आश्रयाचे ठिकाण कमी झाल्याने आता बिबटे दिवसादेखील दृष्टीस पडू लागल्याने वस्तीवर राहणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यातच बिबटे पाळीव प्राण्यांवर हल्ले करीत असल्याने जनावरे सांभाळण्याचे अवघड काम पशुपालकांना करावे लागत आहे. त्यामुळे वन विभागाने जेरबंद केलेले बिबटे लांब जंगलात सोडावेत, अशी मागणी होत आहे.

## भुरट्या चोरांपासून सावधान!

### लासलगाव पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**लासलगाव : वार्ताहर**



सध्या लग्नसराई, सुट्ट्यांमुळे अनेक कुटुंबे बाहेरगावी जात आहेत. त्यामुळे घरे अनेक दिवस कुलूपबंद असतात. याचा फायदा घेत परिसरात भुरट्या चोरांची टोळी सक्रिय झाली आहे. बंद घरे त्यांच्या निशाण्यावर आहेत. त्यामुळे नागरिकांना आर्थिक फटका बसण्याच्या घटना घडत आहेत.

या पार्श्वभूमीवर लासलगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी नागरिकांना सतर्क राहावे, असे आवाहन केले आहे. सुट्टी किंवा अन्य कारणांमुळे अनेक दिवस घर बंद राहणार असेल, तेव्हा मौल्यवान वस्तू व रोकड घरात ठेवू नये. बाहेरगावी जाताना शेजाऱ्यांना कल्पना द्यावी. परिसरात अनोळखी व्यक्ती, घरोघरी फिरणारे भटके किंवा विक्रेते आढळल्यास त्यांच्यावर संशयाने लक्ष ठेवावे. ते घरांची रेकी करत असल्याची शक्यता असते. अशा व्यक्तींना कोणतीही वैयक्तिक माहिती देऊ नये.

विशेषतः पासपोर्ट साइज फोटो, आधारकार्डाची माहिती किंवा जन्मतारखेसारखी कागदपत्रे देणे टाळावे. काही व्यक्ती संशयास्पद वाटल्यास तत्काळ पोलीसपाटील किंवा लासलगाव पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही शिंदे यांनी केले आहे.

## पान १ वरुन

### लष्कर, आयएसआय पहलगाम हल्ल्यात सहभागी

खान यांच्याकडे मदतीची याचना केल्याचे समजते. इम्रान खान सध्या तुरुंगात असले तरी शाहबाज शरीफ त्यांच्याकडून मदतीची अपेक्षा केली आहे. मुनीर यांचा विरोध कमी करावा असे शरीफ यांच्याकडून इम्रान खान यांना आवाहन करण्यात येत आहे. चार माजी लष्करी अधिकारी पाठवून इम्रान खानची मनधरणी सुरु आहे. इम्रान खानने सिंधमधली आंदोलने थांबवावी, असे आवाहन देखील पाकिस्तानी लष्करप्रमुख आणि पंतप्रधानाकडून केले जात आहे. इम्रान खानने पुलवामा हल्ल्यानंतर आयएसआयच्या पदावरुन मुनीर यांना हटवले होते. लष्करप्रमुख होताच मुनीर यांनी इम्रान खान यांचा बदला घेत इम्रान खान यांना तुरुंगात डांबले.

### अवकाळी पावसाचे देशात दहा बळी

भारतीय हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार शनिवारी (दि.३) राजस्थानमध्ये धुळीचे वादळ येईल. मध्य प्रदेश, हिमाचल प्रदेश, छत्तीसगड, सिक्कीम, पश्चिम बंगाल आणि ओडिशामध्ये गारपीट होऊ शकते. केरळ, अरुणाचल प्रदेश आणि कर्नाटकमध्ये पावसाचा इशारा दिला आहे. उत्तर प्रदेश, पंजाब, चंदीगड, दिल्ली, बिहार, गुजरातमध्ये उष्णतेसाठी पिवळा इशारा दिला आहे. रविवारी (दि. ४) राजस्थानमध्ये धुळीचे वादळ येईल. मध्य प्रदेशात गारपीट होण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, तामिळनाडू-पुडुचेरी, कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, अरुणाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि विदर्भात ऑरेंज हीट अलर्ट जारी करण्यात आला आहे. यूपी, पंजाब, चंदीगड, दिल्ली, बिहार आणि गुजरातमध्ये पिवळ्या उष्णतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. तर सोमवारी (दि. ५) मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक, पूर्व उत्तर प्रदेश, सिक्कीम, बंगाल, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम, तामिळनाडू-पुडुचेरी आणि त्रिपुरामध्ये पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे निर्देश**

यंदाच्या उन्हाळ्यात उष्णतेच्या लाटेचा धोका लक्षात घेता, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने महाराष्ट्रासह ११ राज्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल, बेघर, वृद्ध, लहान मुले आणि उघड्यावर काम करणाऱ्या कामगारांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. वर्षे २०१८ ते २०२२ या कालावधीत कडक ऊन आणि उष्माघातामुळे देशभरात ३,७९८ मृत्यू झाल्याचे राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोच्या आकडेवारीतून समोर आले. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने () निवारा, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि कामाच्या वेळांमध्ये बदल यासारख्या उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना आयोगाने केल्या आहेत.

### नाशिकरोडला पूर्ववैमनस्यातून सराईताचा खून

ठाण्यात हजर होऊन घडलेली संपूर्ण घटना पोलिसांना सांगितली.

दरम्यान, गंभीर जखमी बंटीला मनपाच्या बिटको रुग्णालयात त्याच्या भावाने उपचारासाठी दाखल केले आहे. नाशिकरोड पजोलिसांनी निलेश पेखळेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी करीत आहेत.

### कर्जमाफीचे आश्वासन मी दिले नाही!

खोटी आश्वासने दिल्याने दररोज राज्यातील सात शेतकरी आत्महत्या करत आहेत. यामुळे राज्याचे मुख्यमंत्री पहलगाम हल्ल्यातील अतिरेक्यापेक्षाही क्रूर झाले असल्याची टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी केली आहे. माळसोन्रा ते परभणी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आलेल्या शेतकरी आत्महत्या आक्रोश पदयात्रेत त्यांनी सडकून टीका केली. महायुती सरकारने निवडणुकीत दिलेले संपूर्ण कर्जमुक्तीचे आश्वासन पाळून तातडीने राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

### क्षेत्रासाठी ऐतिहासिक क्षण : पंतप्रधान

कंपन्या, ३५० स्टार्टअप्स आणि ९० हून अधिक देशांतील नेते एकत्र आले होते. सृजनशील निर्मिती अर्थव्यवस्थेत होणाऱ्या वाढीमुळे भारताच्या डिजिटल परिदृश्यात लक्षणीय परिवर्तन घडून येत आहे. फ्रॉम कंटेंट टू कॉमर्स: मॅपिंग इंडियाज क्रिएटर इकॉनॉमी असे शीर्षक असलेल्या बोस्टन कन्सल्टिंग ग्रुपच्या अहवालाचे उद्या (दि. ३) या परिषदेत प्रकाशन होणार आहे. या अहवालानुसार, भारतातील सृजनशील निर्मिती अर्थव्यवस्थेचा ३५० अब्ज डॉलर्सहून अधिक ग्राहक खर्चावर प्रभाव असून २०३० पर्यंत ही आकडेवारी १ ट्रिलियन डॉलर्सपेक्षा जास्त होण्याची अपेक्षा आहे. भारतात १००० पेक्षा जास्त फॉलोअर्स असलेल्या व्यक्ती अशी व्याख्या करण्यात आलेले २ ते २.५ दशलक्ष डिजिटल सृजनशील निर्माते असल्याचे या अहवालात म्हटले आहे. इतकी मोठी संख्या असूनही त्यांच्यापैकी केवळ ८१० टक्के निर्माते त्यांच्या आशयातून सध्या चांगले उत्पन्न मिळवत आहेत, ज्यामधून अतिशय झपाट्याने वाढणाऱ्या या क्षेत्राचा पुरेशा प्रमाणात वापर होत नसल्याचे अधोरेखित होत आहे. या सृजनशील निर्मात्यांच्या परिसंस्थेतील प्रत्यक्ष महसूल सध्या २०-२५ अब्ज डॉलर असण्याचा अंदाज असून या दशकाच्या अखेरपर्यंत तो १००-१२५ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

### महिला-बालविकास सर्वोत्तम

पहिला क्रमांक दिला, हे तेच पोलीस अधीक्षक ज्यांनी गद्दारी करताना आमदार लोकांना गुजरातला जाण्यास मदत केली. गुटखा ड्रग्स जे गुजरातवरून येते त्यावर काहीच कारवाई केली नाही आणि त्यांना एक क्रमांक दिला आहे, असं म्हणत दानवेंनी सरकारला धारेवर धरलं आहे. परिवहन विभाग ५ व्या नंबरला आहे. त्यात ५० टक्के ऐवजी ४० टक्के पगार वाढ एसटी कर्मचारी यांना दिली. कृषी विभागाला टॉप ५ मध्ये स्थान दिले आहे. १ रुपया पीक विमा योजना बंद केली. गृह विभागाबद्दल सांगायची गरज नाही. राज्य सरकारने जाहीर केलेला हे गुणांक फसवं आहे. जनतेला आता या गुणांकाबद्दल विचारावं. तुमच्या सरकाराची औकात काय आहे हे तुम्हाला जनतेतून कळेल, अदिती तटकरे यांचं डिसेंबरमध्ये केलेलं वक्तव्य होतं. मार्चमध्ये २१०० रुपये लाडक्या बहिणीला देऊ. .

### मतदार यादीसाठीआयोगाकडून तीन मोठे बदल

आयोगाकडून तयार करण्यात येणारी अधिकृत यादी आहे, ज्यात देशातील सर्व पात्र मतदारांची नावे, वयोमर्यादा, लिंग, आणि मतदार ओळख क्रमांक नमूद केलेले असते. ही यादी प्रत्येक विधानसभा मतदारसंघानुसार विभागलेली असते.

# यशवंत मंडई पाडण्यास सापडेना मुहूर्त!

## इमारत धोकादायक; तरीही मनपाचे दुर्लक्ष

**नाशिक : प्रतिनिधी**

रविवार कारंजावरील जीर्ण झालेली व धोकादायक यशवंत मंडई जमीनदोस्त करण्यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाला मुहूर्त सापडत नसल्याचे चित्र आहे. पाच ते सहा महिन्यांपासून यशवंत मंडई पाडण्याची प्रक्रिया पूर्ण होऊनही बांधकाम विभागाने इतर कामांतून वेळ मिळत नसल्याने ही धोकादायक इमारत 'जैसे थे' ठेवली आहे. दरम्यान, इमारत पाडण्यासाठी तीस लाखांचा खर्च अपेक्षित असून, त्यासाठी निविदा काढण्यात येणार आहे. यशवंत मंडईची इमारत अतिशय धोकादायक बनली असून, पावसाळ्यापूर्वीच ती पाडणे गरजेचे आहे.



यशवंत मंडई पाडून त्या जागेवर बहुमजली पार्किंग किंवा व्यापारी संकुल उभारण्यात येणार आहे. सद्यस्थितीत रविवार कारंजा परिसरात वाहनधारकांसाठी मोकळी जागा नसल्याने येथे वारंवार वाहतूक कोंडी होते. यावर उपाय म्हणून बहुमजली पार्किंग उभारण्याची मागणी सतत होते. यशवंत मंडई इमारतीचे दोनदा स्ट्रक्चर ऑडिट करण्यात आले.

ही इमारत धोकेदायक असल्याचा निष्कर्ष देण्यात आला आहे. यशवंत मंडई पाडण्यासाठी महापालिका निविदा प्रक्रिया राबवणार आहे. बांधकाम विभागाकडून या कामाची निविदा काढली जाणार असली तरी अद्याप याबाबत कुठलीही कार्यवाही झालेली नाही. यशवंत मंडई इमारत धोकेदायक झाली असून, ती कधीही कोसळू शकते. स्ट्रक्चर ऑडिट झाल्यानंतर महापालिकेच्या करसंकलन विभागाने आक्रमक होत या इमारतीमधील व्यावसायिकांना गाळे खाली करण्याचे आदेश दिले आहेत. उच्च न्यायालयाने महाालिकेच्या बाजूने निर्णय देत व्यावसायिकांना दणका दिला होता. पोलीस बंदोबस्तात यशवंत मंडईची इमारत जमीनदोस्त केली जाणार असल्याचे पालिकेने याआधीच स्पष्ट केले आहे.

> यशवंत मंडई इमारत पाडली जाणार आहे; मात्र सध्या बांधकाम विभागाकडे फाइल आहे. इतर कामे सध्या सुरू आहेत. तथापि, लवकरात लवकर ही इमारत पाडण्याची कार्यवाही केली जाईल.
> **–संजय अग्रवाल,** शहर अभियंता, मनपा

# मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे उद्घाटन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा, तहसीलदार गणेश जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. चैतन्य बैरागी यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे वैद्यकीय उपचारासाठी नागरिकांना अर्थसहाय्य सहज उपलब्ध होण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष स्थापन करण्यात आला आहे.



नाशिक येथील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या माध्यमातून २८ फेब्रुवारी ते आजपर्यंत जवळपास १३४ नागरिकांनी मदत घेतली असून, त्यापैकी ३५ रुग्णांची नावे वैद्यकीय मदतीसाठी या कक्षामार्फत प्रस्तावित करण्यात आली आहेत. जिल्ह्यातील नागरिकांनी मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाशी निगडित दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी तसेच आपत्तीप्रसंगी आर्थिक मदत मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता मदत कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी केले आहे.

**मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाद्वारे करण्यात आलेली मदत**

मार्गदर्शन केलेली रुग्णसंख्या– ९५ ए, कक्ष चौकशी अभ्यागत संख्या– १३४, आजपर्यंत प्रत्यक्ष दाखल प्रस्ताव संख्या– ३५, दाखल प्रस्तावांपैकी मेलद्वारे मार्गदर्शन केलेले रुग्ण– ९, रुग्ण नातेवाइकांच्या कक्षाबाबत मिळालेले अभिप्राय– १२.

# पोलिसांच्या सतर्कतेमुळे फसला दाम्पत्याचा आत्मदहनाचा प्रयत्न

**नाशिक : प्रतिनिधी**

सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीतील १३० कारखान्यांतील अतिक्रमणाकडे एमआयडीसीचे अधिकारी हेतुपुरस्सर कानाडोळा करत असून, त्यांच्यावर निमा व आयमा या औद्योगिक संघटनांचा दबाव असल्याचा आरोप तक्रारदार संतोष शर्मा यांनी केला आहे. त्यांच्यावर कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ शर्मा दाम्पत्याने १ मे या महाराष्ट्र दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्यांचा हा प्रयत्न फसला.

औद्योगिक अतिक्रमण काढण्यास एमआयडीसीचे अधिकारी टाळाटाळ करत असल्याचा आरोप करत समाजसेवक संघटनेचे पदाधिकारी संतोष शर्मा यांनी यापूर्वी १९ दिवस उपोषण केले होते. त्यानंतर एमआयडीसीची प्रतीकात्मक अंत्ययात्रा काढून निदर्शने करण्यात आली होती. तरी एमआयडीसीने कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्यामुळे शर्मा दाम्पत्याने १ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेरील रस्त्यावरच गळ्यात पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह निमा व आयमाच्या अध्यक्षांचे फोटो असलेला निषेध फलक घालून स्वतःच्या अंगावर डब्यातून आणलेले पेट्रोल ओतून घेतले. याचवेळी पोलिसांनी धाव घेत दोघांनाही ताब्यात घेतले. त्यांच्यासोबत असलेले कार्यकर्तेही आंदोलनात सहभागी होऊन घोषणाबाजी करत होते. पोलिसांनी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास आंदोलक संतोष शर्मा, प्रिया शर्मा, कैलास दवंडे, बबलू चव्हाण, श्याम गावित आदींना ताब्यात घेऊन त्यांना सरकारवाडा पोलीस ठाण्यात नेले. दुपारी दोन वाजेच्या सुमारास त्यांची सुटका करण्यात आली.

> औद्योगिक वसाहतीतील अतिक्रमण काढण्यासाठी आम्ही १९ दिवस उपोषण केले. एमआयडीसीची अंत्ययात्रा काढली तरी प्रशासनाला काहीच फरक पडला नाही. आता जर आम्हाला न्याय मिळाला नाही तर आता मंत्रालयासमोर आत्मदहन करू.
> **– प्रिया शर्मा,** आंदोलक



### विवाहितेला पती, सासऱ्याची मारहाण

**नाशिक : प्रतिनिधी**

संशयावरून सासऱ्याने अश्लील शिवीगाळ करत, पतीने मारहाण केल्याची फिर्याद गीतांजली अहिरे या विवाहितेने मालेगाव कॅम्प पोलीस ठाण्यात दिली आहे. या प्रकरणी पोलिसांनी सासऱ्यासह पतीवर गुन्हा दाखल केला आहे. विवाहितेने फिर्यादीत म्हटले आहे की, दि. ३० रोजी पती राजेश अहिरे हा घरी आल्यानंतर संशयावरू मला मारहाण केली. पतीला समजावण्याचा प्रयत्न केला; मात्र पतीने शिवीगाळ केली. ही बाब आपण सासरे मिलिंद चिमण अहिरे यांना सांगण्यासाठी त्यांच्या घरी गेले असता, सासऱ्यानेही आपल्याला अश्लील शिवीगाळ करत स्त्रीमनाला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. दुसऱ्या दिवशी सकाळी हा प्रकार मामा सनिल पगारे, आत्या वैशाली जगताप व भाऊ राज्यभूषण पानपाटील व सुदर्शन पानपाटील यांना सांगितला. त्यांनी पती राजेश अहिरे यांना झालेल्या प्रकाराबद्दल विचारले असता, त्यांनाही शिवीगाळ केली. त्यामुळे मालेगाव कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्याने पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.


**दस्त गहाळ झाल्याबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की,

**श्री.प्रविण गोविंदराव पवार**, उ.व. : ५७ वर्षे, धंदा : शेती व व्यापार, रा.फ्लॅट नं.८०१, आठवा मजला, यशोदा डझलर, रामेश्वर नगर, गंगापुररोड, नाशिक यांचे वतीने दस्त गहाळ झाल्याबाबत जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

**१) मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी **तालुका नाशिक** पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील **मौजे आनंदवल्ली** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे नं. ६४/१/२/प्लॉट/२** यांसी **क्षेत्र ६००-३१ चौ.मी.** यांसी **सिटी सर्व्हे नं.३५८५** यांसी **क्षेत्र ६००.३१ चौ.मी.** व त्यावरील बांधीव मिळकत यांसी चतुःसिमा मंजुर बांधकाम नकाशाप्रमाणे.

**२)** वर कलम १ यांत वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही माझ्या मालकीची व कबजे वहिवाटीतील मिळकत आहे.

**३)** दि.०८/०४/२०२५ रोजी माझे राहते घराजवळ माझे जवळील बॅग हरविलेली असून तिचा शोध घेवून देखील ती मिळुन आलेली नाही.सदरील बॅगमध्ये **वर कलम १ मध्ये नमुद केलेल्या मिळकतीबाबतचे मुळ नोंदणीकृत खरेदीखत, दस्त क्र.नसन-२/४५६८/२००१, दि.२२/०५/२००१ व दि.३१/१२/२००९ रोजीचे मुळ नोंदणीकृत खरेदीखत दस्त क्र.नसन-३/९३९६/२००९** असे दोन दस्त हरविलेले आहेत. सदर दस्त हरविल्याची तक्रार, पोलिस निरिक्षक, गंगापुर पोलिस स्टेशन, नाशिक यांचे कडे दिलेली आहे. तरी सदरचे मुळ दस्त कोणासही मिळुन आल्यास त्यांनी आमचे खालील नमुद पत्त्यावर आणुन द्यावेत व त्याची लेखी पोहच घ्यावी.

**श्री.स्वप्निल विकास देशपांडे**, ॲडव्होकेट
बीडी-०६,ठक्कर बझार,नवीन सिबीएस.,नाशिक.मो.९९२११४८६५७



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी **तालुका दिंडोरी** पैकी **मौजे चिंचखेड** या गांवचे शिवारातील **गट नंबर ३०६** यांसी **क्षेत्र ३.१६.०० हे. आर. चौ.मी.** यांसी आकार रुपये ०६=१२ पैसे, यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटस्प्रमाणे.

सदर मिळकत **श्री.प्रकाश रामचंद्र पगारे** यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची असल्याचे मिळकत मालकांनी खात्रीलायक सांगुन आमचे अशील यांचेशी मिळकत विक्रीचा व्यवहार केलेला आहे. सदर नोटीस उपरोक्त मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधता तपासणीकामी प्रसिध्द करत आहोत.

सबब, सदरील मिळकतीत कोणाचेही, कुठल्याही, कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार जसे गहाण, दान, लिन, लिज, विसार पावती, करारनामा, साठेखत करारनामा, दावा, अन्नवस्त्र, मृत्युपत्र, मुखत्यारपत्र, बोजा, अथवा कोणताही दस्ताऐवज दिवाणी अगर महसुल कोर्टाचे विषय असल्यास नोटीस प्रसिध्द झालेपासून **०७ (सात) दिवसांचे आत** साक्षांकीत कागदपत्रानिशी आमचेकडे लेखी हरकत नोंदवावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत अगर तक्रार न आल्यास सदर मिळकतीचे टायटल स्वच्छ, निर्वेध व बिनबोजाचे आहे, असे समजून तसा निर्वेधपणाचा दाखला देण्यात येईल व व्यवहार पुर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

कळावे, ही जाहीर नोटीस. दि.०२/०५/२०२५.

**महेश अशोकराव पवार**, ॲडव्होकेट
१६,हिरामोहन संकुल,पिंपळगांव (ब),ता.निफाड,जि.नाशिक.



**दस्तगहाळ नोटीस**

**मिळकतीचे वर्णन :-** तुकडी जिल्हा नासिक, पोटतुकडी **तालुका नासिक** यापैकी **मौजे पाथर्डी** येथील **सर्व्हे नं.२४३/१+२+३,** यातील **प्लॉट नं. ११** यांसी **क्षेत्र १५३-०० चौ.मी.** याचा **सिटी सर्व्हे नं.४८८७** यासी **सिटी सर्व्हे प्रमाणे क्षेत्र १६२-७ चौ.मी.** यांसी चतु:सिमा मंजुर ले-आऊट नकाशाप्रमाणे आहेत अशी मिळकत.

या मिळकतीचे **१) खरेदीखत अनु.क्र.नसन १/५०६३/२०१७** ता.१३/०७/२०१७ **२) चुक दुरुस्ती पत्र अनु.क्र.नसन १/५१२७/२०१७** ता.१५/०७/२०१७ व **३) खरेदीखत अनु.क्र.नसन १/२९१६ /२०१७** ता.१३/०७/२०१७ व इतर दस्तऐवजे असलेले फोल्डर हे माझेकडून म्हणजेच **अमित पद्माकर गढेकर** यांचेकडून ता.२७/०४/२०२५ रोजी **सुमारे १२:०० वाजेदरम्यान पाथर्डी फाटा ते इंदीरानगर** येथे गाडीवरुन जात असतांना गहाळ झालेले असून त्याचा शोध घेतला असतां आढळून येत नाही. जर कोणास मुळ दस्तऐवज सापडल्यास ती खाली नमुद पत्यावर आणून द्यावे. यदाकदाचित जर कोणीही सदर कागदपत्रांचा गैरवापर केल्यास सदरचे कृत्य हे मिळकत मालकांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही. याकामी कोणाचीही काहीही हरकत असल्यास आजपासुन **७ दिवसांचे आंत** कागदपत्रांसह समक्ष हरकत नोंदवावी. कळावे, ही जाहीर नोटीस. नासिक. दि.०२/०५/२०२५.

**ॲड.मुकुंद रामचंद्र ओढेकर**
शिवदुर्गा बंगला,डॉ.होमी भाभानगर,नवीन मुंबई-आग्रारोड,नासिक.मो.९३२५६६८०६९



**MAHAGENCO** — Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-Tender Notice**

Chandrapur Super Thermal Power Station MAHAGENCO, invites bid offers from reputed and experienced Companies to Participate in the Competitive bidding Process to following O&M Tenders.

| S. N. | Tender NO (Rfx No) / Descricption / Estimated Cost in Rs. |
|---|---|
| 1 | BM-II / Rfx No. 3000056963 / Supply of overrunning clutches for air preheaters drives in boiler U-5, 6 & 7 (500 MW) at CSTPS, Chandrapur / Rs.2653200/- |
| 2 | AHP-III / Rfx No. 3000056914 / Annual Contract for Complete operation and maintenance work for Dry fly ash disposal System (Remote Silo) including related Electrical and C&I works at 2X500 MW (Unit-8&9) CSTPS, Chandrapur for two years / Rs.10907882.56/- |
| 3 | BM-III / Rfx No. 3000057049 / Design, Manufacturing, supply & installation of weld overlay body liners for scrapper area at at Unit-8 & 9 ( 2X500 MW) , CSTPS , Chandrapur / Rs.4494000/- |
| 4 | BM-II / Rfx No. 3000057061 / Supply of 150 NB Knife gate valve and its seats for ESP & Coarse Ash Hoppers at U-5, 6 & 7 CSTPS, Chandrapur / Rs.702155/- |
| 5 | TM-III / Rfx No. 3000057053 / Procurement of PVC Fills for Natural Draught Cooling Tower for U-8 & 9, 2X500 MW, CSTPS, Chandrapur / Rs.1492030/- |
| 6 | WTP-II / Rfx No. 3000057047 (Refloated) / Supply of Laboratory Instruments at WTP- II, CSTPS, Chandrapur / Rs.1818900/- |
| 7 | OS-I / Rfx No. 3000057058 / Nitrogen Gas Cylinder Supply with works at CSTPS, Chandrapur / Rs.309457.70/- |
| 8 | BM-II / Rfx No. 3000057055 / Work of repairing of boiler fan inlet outlet ducts and air preheater rotor shells on as and when requirement basis for Unit No.5, 6 & 7 at CSTPS Chandrapur / Rs.1119930/- |
| 9 | BM-II / Rfx No. 3000057141 (Refloated) / Procurement of various spares for Coal Mill Reject handling System Unit-5 & 6 at CSTPS, Chandrapur / Rs.2240450/- |
| 10 | EM-I / Rfx No. 3000057143 / Work of laying, removal & dressing of HT/LT Cables during overhaul / shutdown or on as and when required basis at Stage-II, CSTPS / Rs.2986111.18/- |
| 11 | EM-I / Rfx No. 3000057144 / Work of Overhauling and oil filtration of LT Transformers during Unit-4, 210 MW AOH at Stg.-II, CSTPS, Chandrapur / Rs.1168040.56/- |

Above floated tender published in MAHAGENCO online Portal. For the detailed Tender document, interested bidders should visit SRM Website **https://eprocurement.mahagenco.in for (Sr. No. 01 to 11)** For any query Contact No. 8554991818.

Sd/-
**CHIEF ENGINEER (O&M)**
**CSTPS, CHANDRAPUR**


### जि. प. प्राथमिक शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात

**चांदवड : वार्ताहर** येथील जिल्हा परिषद प्राथमिक (दगडी शाळा) शाळेमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रांगणात ध्वजारोहण मोठ्या आनंदाने पार पडले, ज्यात शिक्षक, विद्यार्थी आणि शालेय समितीचे सदस्य सहभागी झाले होते. याप्रसंगी विद्यार्थ्यांच्या उन्हाळी सुटीतील अभ्यासासाठी उपयुक्त असलेल्या कृतिपत्रिकांचे वाटप करण्यात आले. तसेच, निपुण महाराष्ट्र उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी वाचन उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

आंतरराष्ट्रीय युवा खेळाडू आक्रमक डावखुरा सलामीवीर साहिल पारख याची भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआय इंटर सेंटर ऑफ एक्सलन्स स्पर्धेसाठी निवड झाली.


**कृषि उत्पन्न बाजार समिती,दिंडोरी**

**ई- निविदा सूचना क्रमांक-०१ सन.२०२५-२६ (ऑनलाईन)**

Portal: https://mahatenders.gov.in

मा.सभापती,कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी यांच्या वतीने कृषी उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी अंतर्गत जुने उपबाजार वणी येथे लिलाव शेड (गाळे) चे बांधकाम करणे कामासाठी ४-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा (ऑनलाईन) प्रणालीद्वारे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून मागवित आहेत. कामाची अंदाजित **किंमत रु.३९,३९,६९४/- (जी.एस.टी, लेबर इन्शुरन्स सोडून)** इतकी आहे, निविदापूर्व अहर्ता अटी, ई-निविदा प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक व सविस्तर निविदा सूचना शासनाच्या https :// mahatenders. gov. in व. https :// msamb. com या वेबसाईटवर दिनांक ०२/०५/२०२५ पासून पाहता येईल,बाजार समितीने कोणतेही अथवा सर्व निविदा त्यासाठी कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क/अधिकार राखून ठेवलेला आहे.

**सचिव** **सभापती**
**कृषि उत्पन्न बाजार समिती, दिंडोरी**



**महावितरण** — **ई–निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता म.रा. वि.वि.कं. मर्या चांदवड विभाग यांनी महावितरणतर्फे मान्यताप्राप्त ठेकेदारांकडून खालील कामाकरीता लखोटाबंद ई – निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रू. | बयाना रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| १ | EE/CND/T-03/2025-26 | चांदवड विभाग अंतर्गत डीटीसी, एच.टी लाईन आणि एल. टी लाईनच्या प्रिव्हेन्टीव मेंटेनन्सच्या वार्षिक कामाकरीता | १० लाख | १००००/– |
| २ | EE/CND/T-04/2025-26 | | १० लाख | १००००/– |
| ३ | EE/CND/T-05/2025-26 | | १० लाख | १००००/– |

सदरची निविदा संकेतस्थळावर भरण्याचा कालावधी **दि. ०३.०५.२०२५ ते १२.०५.२०२५** रोजी २३.०० वा पर्यंत शक्य असलेस. निविदे बद्दलच्या संपूर्ण माहितीसाठी कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या वेबसाईटला भेट द्यावी.

PRO No - १३०/२०२५

**कार्यकारी अभियंता,**
**म.रा.वि.वि.कंपनी मर्या. चांदवड विभाग**



अभिस्वारस्य प्रस्ताव

**ई-निविदा सूचना क्र. २०२४-२५/२**

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधी मध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साह्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविणेबाबत.**

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांच्या अधिनस्त असलेल्या अपर आयुक्त नाशिक/ठाणे/ अमरावती/ नागपूर विभागांतर्गत असलेल्या प्रत्येकी एक असे एकुण वार शासकीय आश्रमशाळेत महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधी मध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साह्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविणेबाबत ई-निविदेद्वारे अभिस्वारस्य प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

१. आदिवासी विभागातंर्गत असलेल्या अपर आयुक्त नाशिक/ठाणे/अमरावती/नागपूर यांच्या अधिनस्त असलेल्या प्रत्येकी एक याप्रमाणे चार शासकीय आश्रमशाळेत सन २०२५-२६ व सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना दहावी नंतर दोन वर्ष कालावधी मध्ये नामवंत खाजगी प्रशिक्षण संस्थेच्या साह्याने अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेश परीक्षांचे मार्गदर्शन करण्यासाठी योजना राबविणे.

ई-निविदेद्वारे अभिस्वारस्य प्रस्तावात भाग घेऊ इच्छुक निविदाकारांनी निविदेच्या अटी व शर्ती व सविस्तर तपशिलाकरिता https://mahatenders.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.

निविदा फक्त ऑनलाईन स्वीकारल्या जातील. ऑनलाईन निविदा सादर करण्याचा कालावधी दिनांक ०५.०५.२०२५ ते २५.०५.२०२५ रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत राहील.

**सही/-**
**लीना बनसोड, भा. प्र. से.**
**आयुक्त, आदिवासी विकास,**
**महाराष्ट्र राज्य, नाशिक.**

आरओसी-2025-26/क्र-5/C४७४

# ट्रॅक कंपोनंट विरोधात चड्डी मोर्चाचा इशारा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

स्थानिक कामगारांवर अन्याय करणाऱ्या ट्रॅक कंपोनंट प्रा. लि. कंपनीला पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीप्रणीत मार्शल कामगार युनियनने निषेध नोंदवला आहे. कामगार दिनाचे औचित्य साधत औद्योगिक विकास महामंडळाच्या नाशिक कार्यालयासमोर शेकडो कामगारांनी आंदोलन केले.

या आंदोलनात कामगार उपआयुक्त कार्यालय, औद्योगिक कामगार सुरक्षा विभाग, औद्योगिक कार्यकारी अभियंता यांच्याविरोधात आवाज उठवण्यात आला. युनियनचे अध्यक्ष प्रशांत खरात यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. ट्रॅक कंपोनंट कंपनीत स्थानिक कामगारांना नोकरीपासून दूर ठेवले जात असल्याचा आरोप करत, युनियनने संबंधित अधिकाऱ्यांवर पक्षपाती भूमिका घेतल्याचा ठपका ठेवला. निषेध करताना काही कामगारांनी मुंडन आंदोलनाचा निर्णय घेतला होता. मात्र, पोलिसांच्या मध्यस्थीने हे आंदोलन मागे घेण्यात आले.

यावेळी अध्यक्ष प्रशांत खरात यांनी इशारा दिला की, जर आठ दिवसांच्या आत कामगारांच्या मागण्यांवर ठोस निर्णय घेण्यात आला नाही, तर पुढच्या टप्प्यात 'कामगार आयुक्त कार्यालय ते मुख्यमंत्री कार्यालय, मुंबई'दरम्यान चड्डी मोर्चा काढण्यात येईल.

## केवडीबन म्हसोबा यात्रोत्सव समिती अध्यक्षपदी गोवर्धने

**नाशिक प्रतिनिधी :** केवडीबन येथील श्री म्हसोबा महाराज देवस्थान यात्रोत्सव समितीच्या अध्यक्षपदी ॲड. गौरव गोवर्धने यांची नियुक्ती देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आली. असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या नाशिकमधील तपोवन परिसरातील श्रीक्षेत्र केवडीबन म्हसोबा महाराज मंदिरात मे महिन्यात दरवर्षी यात्रेचे आयोजन केले जाते. कार्यक्रमांचे नियोजन व रूपरेषा आखण्यासाठी समिती गठित करण्यात येते. कार्याध्यक्षपदी आमदार राहुल ढिकले, उपाध्यक्षपदी अंबादास खैरे, सहकार्याध्यक्ष डॉ. दिनेश बच्छाव, सचिव समाधान जाधव, सहसचिव हेमंत शेट्टी, खजिनदार धनंजय माने, सहखजिनदार कैलास क्षीरसागर, संघटक प्रमुख मच्छिंद्र सानप, सहसंघटक महेंद्र आव्हाड, दिगंबर मोगरे, मंगेश धनवटे, किरण सोनवणे, दिलीप रावत, तुषार नाटकर, राजेंद्र गरड, प्रसिद्धिप्रमुख राहुल कुलकर्णी, सहप्रसिद्धिप्रमुख शाहू पवार, सहप्रमुख बाळासाहेब सानप, मामा राजवाडे, रामसिंग बावरी, महंत रवींद्राचार्य महाराज, महंत संतोषदासजी उदासी महाराज या कार्यकारिणी पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली.

## श्री नेमिनाथ जैन विद्यालयात महाराष्ट्र दिन

**मंगरूळ वार्ताहर :** श्री नेमिनाथ जैन विद्यालयात महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन साजरा करत विद्यार्थ्यांना निकाल वाटप करण्यात आला, अशी माहिती विद्यालयाचे प्राचार्य शिवदास शिंदे यांनी दिली.

१ मे महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाचे औचित्य साधत विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक सुनील बुरड, तसेच ज्येष्ठ लिपिक बाळू शेवाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

## जाहीर फारकत

प्रति,
**सौ. सोनाली अमोल पवार**
रा. द्वारा - **श्री. सुभद्रा रामदास गवळी**, मु. गव्हाणेपाडा,
हिस जाहिर फारकत देणार

**श्री. अमोल सुभाष पवार,** रा. मु. पो. चौंधाणे, ता. बागलाण, जि. नाशिक यांचेकडून सदर जाहिर फारकतीने कळविण्यात येते की तुमचा व माझा विवाह **दि. १७/०४/२०१५** रोजी आदिवासी धर्म शास्त्राप्रमाणे व आपआपसातील जाती रिवाज रूढी परंपरेनुसार श्रीक्षेत्र दोधेश्वर, ता. बागलाण, जि. नाशिक येथे झालेला आहे असून आपल्याला एक मुलगी नामे सुरभी, वय - ७ वर्षे असे एक अपत्ये झालेले आहे. तरी मुलगी ही माझेकडे राहत आहेत. तुमचा व माझा विवाह हा प्रेमसंबंधातून झालेला असून लग्नानंतर तुम्ही माझेसोबत पालघर येथील सपाळा गावी सन २०१५ ते २०१९ पर्यंत राहिल्या त्यानंतर सन २०१९ पासून नाशिक येथे नांदण्यास आल्या. सुरूवातीपासूनच तुम्ही घरात कामधंदा तुम्ही करीत नव्हत्या, घरात शिवीगाळ भांडण करीत असत, नेहमी माहेरी निघून जात असत, दिवाळी २०२४ सणाच्या वेळी लग्नातील सर्व स्त्रीधनाचे दागिने तसेच घरातील रोख रक्कम २० हजार तसेच तुमचे कपडे लत्ते सर्व घेवून तुमच्या माहेरी गेल्या. त्यानंतर मी स्वतः व नातेवाईकांमार्फत तुम्हांस नांदण्यास आणणेकामी बरेच प्रयत्न केले परंतु तुम्ही नांदण्यास आल्या नाहीत. माझ्याकडे फारकतीची मागणी केली. परंतु तुम्ही नांदण्यास आल्या नाहीत अगर तसा कोणताही प्रयत्न केला नाही. त्यामुळे तुम्हांस माझेबरोबर संसार करावयाचा नाही हे तुमच्या वर्तणुकीवरून स्पष्ट होते. सबब तुम्हांस सदर जाहिर फारकतीने कळविण्यात येते की - सदर जाहिर फारकत प्रसिद्ध झालेपासून **७** दिवसांचे आत तुम्ही नांदण्यास निघून यावे. या मुदतीत तुम्ही नांदण्यास आल्या नाहीत तर जाती रिवाज आणि रूढीप्रमाणे व तुमच्या मागणीप्रमाणे हिच जाहिर फारकत समजण्यात यावी व आपले एकमेकांकडे काहीही देणे घेणे राहिले नाही. या मुदतीनंतर आपण दुसरा घरोबा करण्यास मोकळे झालो आहोत व आपल्यातील पती पत्नी संबंध कायमचा नष्ट झालेला आहे असे समजण्यात येईल.

**आमचे मार्फत प्रसिद्ध**
**ॲड. एस. एस. मानकर**
**सटाणा, ता. बागलाण, जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **श्री. सी. एन. पवार**
**श्री. एन. ए. डांगरे, ॲडव्होकेट्स, सटाणा**

**जा.क्र.१११६/२५ दि.०२/०५२०२५ वारसा प्रमाणपत्र अ. नं.८५/२०२५**
**सटाणा येथील मा. सि. ज. ज्यु. डि. सो., यांचे कोर्टात**

**१. श्री. राजाराम तुळशिराम बागुल,** वय - ६३ वर्षे, धंदा - मजुरी, **२. श्री. तुकाराम तुळशिराम बागुल**,वय-७६ वर्षे, धंदा- मजुरी, **३. श्री. गमन तुळशिराम बागुल,** वय ६७ वर्षे, धंदा-मजुरी, **४. श्री. काळू तुळशिराम बागुल**, वय-५३ वर्षे, धंदा-मजुरी, **५. श्रीमती यशोदाबाई सुकदेव अहिरे**, वय - ७१ वर्षे, धंदा - घरकाम, **६. सौ. भागाबाई सिताराम ठाकरे**, वय-५६ वर्षे, धंदा-घरकाम, **७. सौ. आक्काबाई रामदास चौरे**, वय - ५८ वर्षे, धंदा - घरकाम, बागुल, वय-६१ वर्षे, धंदा-घरकाम, **८. श्रीमती रखमा भाऊपाटील** बागुल, वय - **९. श्री. शरद भाऊपाटील बागुल**, वय-२८ वर्षे, धंदा - मजुरी, ३४ वर्षे, धंदा - घरकाम , **१०. सौ. अनिताबाई छोटु बहिरम**, वय-**११. सौ. शांताबाई शामा गवळी**, वय - ३३ वर्षे, धंदा - घरकाम, १२. सौ. मनिषा रविंद्र पवार, वय - ३२ वर्षे, धंदा - घरकाम, **१३. सौ. कल्पना सुरेश चौरे**, वय ३० वर्षे, धंदा - घरकाम, सर्व मुळ रा. मु.शेवरे, पो. मुल्हेर, ता. बागलाण, जि. नाशिक नं.६ व ७ ह.मु. दगडपाडा जामोटी, पो. मुल्हेर, ता. बागलाण, जि. नाशिक नं.१० ह.मु. मळ्याचापाडा, पो. सुकापुर, ता. साक्री, जि. धुळे नं. १२ ह.मु. तुंगण दिगर, पो. दसवेल, ता. बागलाण, जि. नाशिक नं.१३ ह.मु. पारगांव, पो. बल्हाणे, ता. साक्री, जि. धुळे **अर्जदार**

**विरूद्ध**

**कोणीही नाही सा.वाला**

ज्याअर्थी प्रस्तुतचे अर्जातील अर्जदार नं. १ ते ७ यांचे वडिल, अर्जदार नं.८ यांचे सासरे व अर्जदार नं.९ ते १३ यांचे आजोबा नामे **तुळशिराम बुधा बागुल (कोकणी)** हे अर्जदारांसोबत एकत्र कुटुंबियांसमवेत राहत असतांना दि.०१/०२/२०१५ रोजी मौजे शेवरे, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. तसेच मयत **तुळशिराम बुधा बागुल (कोकणी)** यांची पत्नी, अर्जदार नं. १ ते ७ यांची आई, अर्जदार नं.८ यांची सासु व अर्जदार नं.९ ते १३ यांची आजी नामे **मालनबाई तुळशिराम बागुल** ह्या अर्जदारांसोबत एकत्र कुटुंबियांसमवेत राहत असतांना दि. १३/११/२०१९ रोजी मौजे शेवरे, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. मयत **तुळशिराम बुधा बागुल (कोकणी)** यांचा मुलगा, अर्जदार नं. १ ते ७ यांचा भाऊ, अर्जदार नं.८ यांचे पती व अर्जदार नं. ९ ते १३ यांचे वडिल नामे **भाऊपाटील तुळशिराम बागुल** हे अर्जदारांसोबत एकत्र कुटुंबियांसमवेत राहत असतांना दि.०९/०७/१९९८ रोजी मौजे शेवरे, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत/नाहीत असे कोणाचे म्हणणे अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धीनंतर **३०** दिवसांचे आत **दि. २७/६/२०२५** पावेतो स्वत: अगर वकिलांमार्फत न्यायालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे दाखल करणे वरील मुदतीत कोणाचे काहीही म्हणणे न दाखल झाल्यास मे. न्यायालय योग्य तो पुरावा देवून पुढील आदेश करेल त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही. आज दि.२९/०४/२०२५ माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा** **दिवाणी न्यायालय, सटाणा**

## जाहीर नोटीस

अर्ज नं. ०७/२०२५

**तहसिल कार्यालय कोपरगाव क्र. कावि/फौजदारी/०७/२०२५**
**कोपरगाव दि. १६/०४/२०२५**
**कोपरगाव येथील मे. तहसिलदार साहेब यांचे कोर्टात**
**राहुल ज्ञानेश्वर माळी,**
वय-२९ वर्षे, धंदा-मजुरी, रा. कोकमठाण
ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर **अर्जदार**

**विरुध्द**

**निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,** ग्रामपंचायत कार्यालय कोकमठाण,
ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर **सामनेवाले**

ज्याअर्थी, अर्जदार राहुल ज्ञानेश्वर माळी रा. कोकमठाण ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार राहुल ज्ञानेश्वर माळी यांची मुलगी नामे सिद्धी राहुल माळी हिचा जन्म अर्जदाराचे राहते घरी मौजे शामवाडी, कोकमठाण ता. कोपरगाव येथे दि.०३/०५/२०२१ रोजी झाला आहे. अशी निबंधक, जन्म मृत्यु नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथे झालेबाबत ग्रामपंचायत कार्यालय कोकमठाण, यांचेकडील दाखला क्र. ५५७५२६१३०००३५ दि. २६/१२/२०२४ अन्वये सन २०२१ या वर्षाची जन्म घटनेची रजिष्टरला नोंद करण्यांत आली नाही तथापि त्यांची जन्म मृत्यू रजिष्टरला नोंद होण्याकामी तसा मे कोर्टचा आदेश होण्याकामी चौकशी अर्ज या मे.कोर्टात दाखल केलेलाआहे. तरी सदर सिद्धी राहुल माळी हिचा जन्म अर्जदाराचे राहते घरी मौजे शामवाडी, कोकमठाण ता. कोपरगाव येथे दि. ०३/०५/२०२१ रोजी झाला आहे. या बाबतची ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय कोकमठाण, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची कोणतीही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **३०** दिवसांचे आत योग्य त्या कागदपत्री पुराव्यांसह सदरची हरकत मे.कोर्टासमोर हजर होवून पुराव्यानिशी दाखल करावी. अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही. असे समजून मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करेल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही. याची जाहीर नोंद या जाहीर नोटीसने घेण्यात यावी, कळावे. आज दि. १६/०४/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानीशी दिले.

**हुकुमावरून**
**सही/-तहसिलदार, कोपरगाव**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **ॲड. रुपाली आर. पाठक (पंडीत)**
**सटाणा, जि.नासिक**

**जा.क्र.११२४/२५ दि.०२/५/२०२५ वारस प्रमाणपत्र अ. नं.८२/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात......**
**श्री. नरेश सजन सावंत**, वय - ६२ वर्षे, धंदा-शेती, रा. नामपूर,
ता. बागलाण, जि.नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार यांचे वडील नामे **सजन शंकर सावंत** हे **दिनांक २८/०२/२००४** रोजी **मौजे नामपूर**, ता. बागलाण, जि.नाशिक येथे वृध्दपकाळाने मयत झाले असून मयताची पत्नी व अर्जदाराची आई नामे **लटकनबाई सजन सावंत** ही **दिनांक १०/०७/१९९८** रोजी **मौजे नामपूर,** ता.बागलाण, जि.नासिक येथे मयत झालेली आहे त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हाच एकमेव कायदेशीर मुलगा वारस असल्याचे कथन करुन अर्जदाराने मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हा मयत **संजन शंकर सावंत** व मयत **लटकनबाई सजन सावंत** यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहे / नाही याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक १३/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदाराचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक २९/४/२०२५** रोजी माझी सही व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक**

## भगूर नगरपरिषद, भगूर
## ई-निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत ठेकेदार यांना कळिवणेत येते की, भगूर नगरपरिषदेचे बांधकाम विभागाचे विकास कामांची अंदाजपत्रके, नकाशे, आर.सी.सी. डिझाईन तयार करणे, प्रकल्प अहवाल तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजुरी घेणे इ. कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पॅनल नियुक्त ३ वर्षाकरिता करणे कामी वार्षिक ई-निविदा दोन लिफाफा पध्दतीने मागविणेत येत आहे. कामाची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे, ई-निविदेचा विस्तृत नमुना व कामाचा तपशिल, तसेच सविस्तर अटी व शर्ती Main Portal-https:/www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर **दि. २९/०४/२०२५ ते दि.०७/०५/२०२५ दु.. ३.००** या कालावधीत पाहण्यास व ऑनलाईन दाखल करण्यास उपलब्ध होतील.

**अभियंता** **मुख्याधिकारी** **प्रशासक**
**भगुर नगरपरिषद, भगुर** **भगुर नगरपरिषद, भगुर** **भगुर नगरपरिषद, भगुर**

## जाहीर नोटीस

**ॲड. श्री. रविंद्र जगन्नाथ पाटील, निवास :- 'ओम शांती' बालाजी नगर, सटाणा, जि. नाशिक**
**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **मो.नं. ७५८८६१८६५२ / ९९७०२९०२२७**

**जा.क्र.११०५/२०२५ दि.०२/०५२०२५ वारसा प्रमाणपत्र अ. नं.८३/२०२५**
**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात....**

**१) श्रीमती. लक्ष्मीबाई बाबुलाल पिंपळसे**, वय-७५ वर्ष **२) श्री. नंदलाल बाबुलाल पिंपळसे**, वय - ४७ वर्ष **३) श्री. नानाजी बाबुलाल पिंपळसे**, वय-४५ वर्ष सर्वांचा धंदा - शेती व मजुरी सर्व रा. ब्राम्हणगांव, ता. बागलाण, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ व ३ यांचे वडील **बाबुलाल गिरजी पिंपळसे** हे **दि.०२/०५/२०२१** रोजी **मौजे ब्राम्हणगांव**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झाले आहेत. अर्जदार हा **कै. बाबुलाल गिरजी पिंपळसे** यांचे कायदेशीर वारस असले बाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदार नं. १ व २ यांनी वारस प्रमाणपत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे **कै. बाबुलाल गिरजी पिंपळसे** यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत या बाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर **दि.१७/६/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलां मार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करेन मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणने ऐकले जाणार नाही. असे आज **दिनांक२९/४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिवक्यानिशी प्रसिद्धीस दिली.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **श्रीमती. किरण के. देवरे, (पवार) ॲडव्होकेटस सटाणा (नाशिक)**

**जा.क्र.१०८६/२५ दि.२९/४/२०२५ वारस प्रमाणपत्र अ. नं.३७/२०२५**
**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ट स्तर यांचे न्यायालयात...**
**श्री. मोठाभाऊ जगन्नाथ भामरे,** वय ४८ वर्ष, धंदा शेती
रा. पिंपळकोठे, ता. बागलाण, जि. नाशिक **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी अर्जदाराचे वडील **जगन्नाथ नथु भामरे** हे **दि. १८/०८/२०१८** रोजी **मौजे पिंपळकोठे**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झाले आहेत. अर्जदाराची आई **इंदुबाई जगन्नाथ भामरे** ही **दि. २१/०३/२०१७** रोजी **मौजे पिंपळकोठे**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झाली आहे. मयत जगन्नाथ नथु भामरे यांची आई म्हणजे अर्जदाराची आजी **रखाबाई ऊर्फ रखमाबाई नथु भामरे** ही **दि. २४/०७/१९८६** रोजी **मौजे पिंपळकोठे**, ता. बागलाण, जि. नाशिक येथे मयत झालेली आहे. **कै. रखाबाई ऊर्फ रखमाबाई नथु भामरे, कै. इंदुबाई जगन्नाथ भामरे, कै. जगन्नाथ नथु भामरे** यांचे मृत्यू पश्चात अर्जदार हाच कायदेशीर वारस असलेबाबत मा. न्यायालयात कथन करुन मे. कोर्टाकडुन अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार हा मयत **कै. रखाबाई ऊर्फ रखमाबाई नथु भामरे, कै. इंदुबाई जगन्नाथ भामरे, कै. जगन्नाथ नथु भामरे** याच्या मृत्युनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्धी झाल्यापासून **३०** दिवसांचे आत अगर दि.९/६/२०२५ रोजी स्वत: अगर वकीला मार्फत हजर राहुन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेवुन आदेश करतील मग त्यानंतर कोणाचे काही एक म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक २९/४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाच्या शिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी व फौजदारी न्यायालय, सटाणा, नाशिक**

## जाहीर नोटीस

**नि.नं:०६ प्रोसेस जमा** **श्री. एस. आर. सोनवणे ॲडव्होकेट, सटाणा, (नासिक)**

**जा.क्र.११०७/२५ दि.०२/०५/२०२५ वारस प्रमाणपत्र नं.६२/२०२५**

**सटाणा येथील मे. सिव्हील जज्ज साहेब ज्युनि. डिव्ही यांचे कोर्टात......**
**१) मुमताज निहाल शाह**, वय- ५० वर्षे, **२) शाहरुख निहाल शाह,** वय-२९ वर्षे, **३) नवाज निहाल शाह**, वय- २७ वर्षे **४) सायमा निहाल शाह,** वय- १२ वर्षे, **५) सिध्दीका निहाल शाह**, वय- १५ वर्षे, नं. ४ व ५ ची. अ.पा.क. जनकआई नं. १ **६) समनूर मोहम्मद शाह**, वय-८५ वर्षे, सर्व रा. नामपूर, ता. बागलाण, जि.नासिक **७) मुस्कान अरबाज शाह,** वय - २३वर्षे रा. करंजाड, ता.बागलाण, जि.नासिक **८) हिना निहाल शाह**, वय २१ वर्षे, रा. नामपूर, ता.बागलाण, जि.नासिक
**अर्जदार**

**विरुध्द -**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं. १ चे पती व अर्जदार नं. २ ते ५ व ७,८ यांचे वडील व अर्जदार नं. ६ चा मुलगा नामे **निहाल मोहम्मद शाह** हे **दिनांक २५/०५/२०२१ रोजी मौजे नामपूर**, ता.बागलाण,जि.नासिक येथे मयत झाले असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारस असलेबाबतचे लिगल हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने ते मिळणेकामी अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत निहाल मोहम्मद शाह यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून ३० दिवसाचे आत अगर **दिनांक ९/०५/२०२५** रोजी स्वतः अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे सादर करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक २९/०३/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक**

## ग्रामपंचायत देवपूर ता, सिन्नर जि.नाशिक
## जाहीर ई-निविदा सूचना सन २०२५/२६ (प्रथम प्रसिद्धी)

सरपंच/ ग्रामसेवक ग्रामपंचायत देवपूर ता.सिन्नर जि.नाशिक करिता १५ व्या वित्त आयोगातून खालील कामासाठीची बंद लिफाफा निविदा नाशिक जिल्हा परिषदेकडील सुबे.अ. नोंदणीकृत कंत्राटदाराकडून मागविण्यात येत आहे. इच्छुक निविदाकरांनी आपल्या निविदा दि ०२/०५/२०२५ ते ०७/०५/२०२५ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयात पोहचतील आशा पाठवाव्यात. निविदेचे कोरे फॉर्म ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील. निविदा उघडण्याचा संभाव्य दिनांक ०७/०५/२०२५ दुपारी ३.०० वाजेनंतर

| अ.नं. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| १ | भूमिगत गटार करणे | ५७८०००/- |
| २ | गावांतर्गत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे | ३०६०००/- |
| ३ | पोषण आहार व साहित्य | २७०००/- |
| ४ | अंगणवाडी डिजिटल करणे | १६५०००/- |
| ५ | आरोग्य पायाभूत सुविधामध्ये सुधारित स्वच्छता उपक्रम (पेवर ब्लॉक) | १७००००/- |

**अटी व शर्ती** -१) निविदा मंजूर/ नामंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतकडे राखून ठेवलेला आहे. मंजुरीबाबत पत्रव्यवहार केला जाणार नाही २) अटी मान्य नसलेली निविदा स्वीकारली जाणार नाही ३) निविदा बंद लिफाफा नसेल तर नाकारण्यात येईल ४) पुरेशी स्पर्धा न झाल्यास प्रक्रिया रद्द करून फेर प्रक्रिया घेण्यात येईल.

**सही/- सरपंच** **सही/-ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत देवपूर** **ग्रामपंचायत देवपूर**
**ता.सिन्नर जि. नाशिक** **ता.सिन्नर जि. नाशिक**

## ग्रामपंचायत कार्यालय वाघाड, ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी
## जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६

ग्रामपंचायत कार्यालय वाघाड ता. दिंडोरी जि. नाशिक येथे, १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरून दिनांक ०२/०५/२०२५ पासून ते ०८/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय वाघाड, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय वाघाड, ता. दिंडोरी, जि. नाशिक**

## ग्रामपंचायत पाटोळे ता. सिन्नर जि. नाशिक
## जाहीर ई-निविदा सूचना क्र.१ सन २०२५/२६ (प्रथम प्रसिद्धी)

ग्रामपंचायत पाटोळे ता. सिन्नर जि. नाशिक करिता मौजे ग्रामपंचायत पाटोळे येथे अंगणवाडी बांधणे ह्या कामांसाठी लागणारे मटेरीअल खरेदी/पुरवठा करणे ह्या कामासाठी ची इ निविदा नोंदणीकृत पुरवठादारकडून मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरून प्रसिद्ध केलेली असून खरेदी व दाखल ०२/०५/२०२५ ते ०७/०५/२०२५ पर्यंत करता येतील. निविदेबाबत अधिक माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असून निविदा धारकांनी ई-निविदा भरणेबाबत कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे ह्याबाबत अर्तिम अधिकार ग्रामपंचायत पाटोळे ता.सिन्नर जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही/- सरपंच** **सही/-ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पाटोळे ता. सिन्नर जि. नाशिक**

## ग्रामपंचायत कार्यालय वरखेडा ता. दिंडोरी जि. नाशिक प्रथम प्रसिद्धी
## जाहीर ई निविदा सूचना २०२५-२६

ग्रामपंचायत कार्यालय वरखेडा ता. दिंडोरी जि. नाशिक येथे १५ वा वित्त आयोग, पेसा निधी व ग्रामनिधी योजनेंतर्गत कामे करायचे असून सदर कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. व विविध विकास निधी योजनेंतर्गत करावयाच्या ग्रामपंचायत अंतर्गत कामांकरिता साहित्य पुरवठाकामी कामांची ई-निविदा मागविण्यात येत आहे. सदर ई निविदा महाराष्ट्र शासनाच्या https://mahatenders.gov.in या वेबसाईट वरून दिनांक ०१/०५/२०२५ पासून ते ०७/०५/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येतील ई- निविदा संबंधीची सविस्तर माहिती, अटी व शर्ती सदर संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत कार्यालय वरखेडा, ता. दिंडोरी जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

**ग्रामपंचायत अधिकारी** **सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय वरखेडा ता. दिंडोरी, जि. नाशिक**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे नाशिक शहर-१ येथील मिळकती.

**अ) भूमापन क्रमांक व उपविभाग २२६/१/१/१/७/प्लॉट/७ यांसी क्षेत्र १२३.७५ चौ.मी. यांसी आकार रू. ६०.०० पैसे.**

**ब) भूमापन क्रमांक व उपविभाग २२६/१/१/१/८/प्लॉट/८ यांसी क्षेत्र १२३.७५ चौ.मी.** यांसी **आकार रु. ६०.०० पैसे.** हया मिळकती **श्री. सतिश सुभाष पुरोहित** यांचे मालकीचे असून सदर प्लॉट मिळकती हया निर्वेध व बिनबोजाची आहे असे मिळकत मालकांनी खात्रीने सांगुन आमचे पक्षकारांबरोबर फरोक्त खरेदीचा व्यवहार निश्चित करून विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सबब सदर प्लॉट मिळकतींवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस्त्र, मृत्यूपत्र, बक्षिसपत्र, विसार पावती, साठेखत, जनरल मुखत्यारपत्र, विकसन करारनामा, जामीनकी, जप्ती वगैरे कोणत्याही प्रकारचा बोजा अगर हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून ०५ दिवसांचे आत आमचे खालील पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रानिशी लेखी हरकत नोंदवावी, मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध समजून आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी हरकत व कागदपत्र नसलेली हरकत तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली हरकत विचारात घेतली जाणार नाही. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक,

**तारीख :- ०१/०५/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्द**
**श्री. सुनिल गोविंदराव शेळके, ॲडव्होकेट**
**अ-२३३, दुसरा मजला, मेघदुत सी.बी.एस. समोर, नाशिक.**

## भगूरला सावरकर जयंती अध्यक्षपदी मुकुंद देशमुख

**देवळाली कॅम्प प्रतिनिधी:**



भगूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती उत्सव समितीची बैठक पोलिस अधिकारी रमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत समितीच्या अध्यक्षपदी सेवानिवृत्त पोलिस निरीक्षक मुकुंद देशमुख यांची निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी राधाकृष्ण गामणे, सरचिटणीसपदी प्रताप पवार, सहचिटणीस राजेंद्र बागडे यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजन गायकवाड राहणार आहेत. येत्या बुधवारी, दि. २८ मे रोजी सकाळी सावरकर वाड्यात अभिवादन करण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकात पुष्कराज थिएटर प्रस्तुत महाराष्ट्राची लोकधारा मऱ्हाटमोळा कार्यक्रम, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा, असा सजीव देखावा सादर करण्यात येणार आहे. हास्य जत्रा फेम अभिनेत्री वनिता खरात व अभिनेता रोहित माने हे या कार्यक्रमाचे आकर्षण ठरणार आहे, अशी माहिती अध्यक्ष मुकुंद देशमुख यांनी दिली. सल्लागार समितीत केशव कासार, हेमंत गोडसे, उत्तम शिंदे, राजेंद्र कापसे, अनिल पवार, शेखर बागडे, ज्ञानेश्वर गणोरे, उत्तम जाधव, दीपक वलकवडे, हेमंत हेंबाडे, संजय अरिंगळे, महाराज बिरमाणी, एकनाथ शेटे, विजय करंजकर, शैलेश उदावंत, तानाजी करंजकर, श्याम शिंदे, गजानन कातकाडे, सुनील थोरात, अविनाश म्हणून मंगेश बागडे, राजाभाऊ सोनवणे, प्रशांत कापसे, अशोक मोजाड, वसंत पाटील, शिवाजी घुगे, अमोल वाल्हाडे, तुकाराम जगताप, किशोर गायकवाड, नीलेश हेंबाडे, रवी येरम, श्याम भागवत, सुनील गायकवाड, सचिन वाघ, प्रमोद जाधव, दीपक देशमुख, विनोद ढगे, उत्तम पाटील, प्रकाश सुराणा, सुनील कासार, अमोल भागवत, संग्राम गायकवाड यांची निवड झाली.

## जाहीर इशारा नोटीस

तमाम लोकास विशेषतः **श्री. भगवान नामदेव, श्री. संजय नामदेव जाधव,** मयत वारस **संतोष सखाराम गायकवाड, संगिता राजू के.नानाबाई गायकवाड भालेराव, जनाबाई अशोक आहिरे, मिनाबाई रतन आहिरे, चंद्रभागाबाई नंदा आहिरे, फुलाबाई रामचंद्र गांगुर्डे, आनंदराव रुपाजी शार्दुल, अहिल्याबाई महादू ढवळे, मिराबाई सुकलाल शर्मा, दादाभाऊ रुपाजी शार्दुल, केशवराव रुपाजी शार्दुल व शोभा दिलीप शार्दुल** यांना या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की, **मौजे आक्राळे**, ता. दिंडोरी, जि.नाशिक येथील शेत मिळकती-गट नंबर १९७ क्षेत्र ०० हे. ५९ आर आकार रुपये २.७५ पैसे, गट नंबर २०३ क्षेत्र ०० हे. ६२ आर आकार रुपये १.५० पैसे, गट नंबर २०९ क्षेत्र ०० हे. ४९ आर आकार रुपये १.०० पैसे, गट नंबर २१३ क्षेत्र ०१ हे. १९ आर आकार रुपये १.५६ पैसे, तसेच गट नंबर १९४ क्षेत्र ०० हे. ७७ आर आकार रुपये १.१९ पैसे या मिळकतींचे संबंधाने आमचे पक्षकार **माणिक हिरामण पांडव** यांनी दिंडोरी येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.मु.नं.**८२/२०१४** हा दावा वाटप करुन मिळणेसाठी व कब्जासाठी दाखल केलेला होता. त्या दाव्यात वरील सर्व लोक तसेच **शशिकला दिनकर, महेश दिनकर, मनोज दिनकर पांडव व कै. प्रविण दिनकर पांडव** हे सर्व प्रतिवादी होते. तो दावा **दिनांक १८.१.२०११** रोजी मंजूर केला असून त्या दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचे हिस्से निश्चित केले त्यानुसार त्या दाव्यातील जज्मेंट, हुकुमनामा वाटपाचे कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे पाठविला व त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी नाशिक यांनी तो जज्मेंट, हुकुमनामा तहसिलदार दिंडोरी व उपअधिक्षक भूमी अभिलेख दिंडोरी यांचेकडे पाठविला. त्यानंतर आमचे पक्षकार माणिक पांडव यांनी मोजणीचे पैसे देखील भरले. मात्र शशिकला दिनकर पांडव व इतर-४ यांनी त्या दाव्या विरुद्ध दिवाणी चौकशी **अर्ज नंबर २१/२०२१** या उशीर माफीचे अर्जासोबत नियमित दिवाणी अपील दाखल केले. त्या अर्जाचे कामकाज नाशिक जिल्हा न्यायालयात चालू असतांना वरील इसम म्हणजेच **श्री. भगवान नामदेव जाधव व इतर-१४** तसेच **माणिक हिरामण पांडव** तसेच **शशिकला दिनकर पांडव व इतर-४** यांचे दरम्यान आपसात बसून वाद मिटविण्याचे ठरले व त्यानुसार आपसात तडजोड ठरली व त्या ठरलेल्या तडजोडीनुसार **भगवत नामदेव जाधव व इतर-१४** तसेच **माणिक हिरामण पांडव** तसेच **शशिकला दिनकर पांडव व इतर- ४** यांचे दरम्यान आपसातील समजुतीचा करारनामा दिनांक १७.७.२०२३ रोजी करण्यात आला. त्या करारनाम्यानुसार वरील मिळकतींमधून वरील इसम **श्री भागवत नामदेव जाधव व इतर-१४ यांनी ०० हे. ४० आर एवढे क्षेत्र शशिकला दिनकर, महेश दिनकर, मनोज दिनकर व कै. प्रविण दिनकर पांडव** यांना देण्याचे ठरले व **शशिकला दिनकर पांडव व इतर - ४** यांनी दिवाणी चौकशी **अर्ज नंबर २१/२०२१** हा नाशिक जिल्हा न्यायालयातून काढून घ्यावयाचा असे त्या करारनाम्यामध्ये नमूद करण्यात आले असून त्या करारनाम्यानुसार वरील **भगवान जाधव व इतर-१४** हे पक्ष नंबर २ व ३ म्हणून समाविष्ट आहेत. त्यानुसार दिवाणी चौकशी अर्ज नं.२१/२०२१ हा काढून घेण्यात आला व त्यानंतर रे. मु.नं. ८२/२०१४ या दाव्यातील हुकुमनाम्यानुसार वाटपाची कार्यवाही पूर्ण करण्यात आली. मात्र त्यानंतर दिनांक १७.७.२०२३ रोजीचे करारनाम्यानुसार **श्री. भगवत नामदेव जाधव व इतर-१४** यांनी त्यांचे हिश्यास आलेल्या क्षेत्रामधून **श्रीमती शशिकला दिनकर पांडव व इतर-४** यांना **०० हे. ४० आर क्षेत्र** अद्याप दिले नाही व उलट त्यांचे हिश्याचे संपूर्ण क्षेत्र परस्पर त्रयस्थ इसमांना विक्री करीत असल्याचे आमचे पक्षकारांना तसेच **शशिकला दिनकर पांडव व इतर- ४** यांना खात्रीशीररित्या समजले आहे. तसेच वरील सर्व मिळकतींमध्ये **देऊबाई नाना तेजाळे** हिचे दुसऱ्या पतीचे मुले **जयाबाई खरे, रंगनाथ तेजाळे, कै. बबनबाई गायकवाड** चे वारस, **आनंदा तेजाळे** यांचा देखील अविभक्त हिस्सा आहे. त्यामुळे सदरील मिळकतींचे संबंधाने **भागवत नामदेव जाधव व इतर -१४** यांचेशी कुणीही कुठल्याही प्रकारचा व्यवहार करु नये व कुठल्याही स्वरुपाचे करार अगर दस्त त्यांचे कडुन सदर मिळकतींचे संबंधाने लिहून नोंदवून घेवू नये. याही उपर कुणीही त्यांचे सोबत सदर मिळकती संबंधाने व्यवहार केल्यास आमचे पक्षकारांना योग्य ती कायदेशीर कारवाई करणे भाग पडेल. तसेच दिनांक १७.७.२०२३ रोजीचे समजुतीचे करारनाम्यानुसार आमचे पक्षकार **माणिक हिरामण पांडव, शशिकला दिनकर, महेश दिनकर, मनोज दिनकर पांडव व कै. प्रविण दिनकर पांडव** यांचे वारस योग्य ती कायदेशीर कारवाई करणार आहेत याची संबंधितांनी नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर इशारा नोटीस.

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

दि.२/५/२०२५

**ॲड. नामदेव रामकृष्ण वाळके**
**ॲड. शिरीष नामदेव वाळके**
**ए-११, पहिला मजला, मेघदूत शॉपिंग सेंटर, सीबीएस, नाशिक**


## गांवकरी Classified जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

--------------------

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

--------------------

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

--------------------

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

--------------------

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५.
संपर्क- 8668862801

### Name change

My Old Name is Gokul Dattatrey Kale has been changed to My New Name **Gokul Dattaray Kale** as per Aadhar

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जाहिरात छोटी किमया मोठी!**

## महत्त्वाचे



### इंडिया सिक्युरिटी प्रेसचा मातीचा मंगल कलश मुंबईला रवाना

**नाशिकरोड :** महाराष्ट्र राज्याचा मंगल कलश यशवंतराव चव्हाण यांनी आणला. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा व नद्यांचे जल व माती कलशात राष्ट्रवादी काँग्रेसने राज्यातून विविध ठिकाणांहून १ मे रोजी जमा केली. नाशिकला राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री नरहरी झिरवाळ, माजी खा. समीर भुजबळ, शहराध्यक्ष रंजन ठाकरे यांच्याकडे नाशिकरोडच्या इंडिया सिक्युरिटी प्रेस व करन्सी नोट प्रेसच्या मातीचा मंगल कलश राष्ट्रवादीचे नाशिकरोड विभागीय अध्यक्ष मनोहर कोरडे यांनी सुपूर्द केला. १९२४ मध्ये इंग्रजांच्या काळात चलनी नोटा छापण्याचा पहिला कारखाना नाशिकरोडला उभारला गेला. त्या कारखान्यात ११ डिसेंबर १९७९ मध्ये बोनससाठी प्रेस कामगार नेते टी. एन. आडके यांनी बेमुदत संप पुकारला. तो २३ दिवस चालला. त्यामुळे देशात चलनी नोटांची कोंडी झाली. त्यावेळी केंद्रात चरणसिंग यांचे काळजीवाहू सरकार होते. यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान होते. प्रेस पूर्णतः बंद होता. जनरल मॅनेजर यांना त्यांच्या कार्यालयात जाण्यासाठी स्वतः प्रेसचे गेट उघडावे लागत. अशा काळात हा संप मिटविण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी मध्यस्थी केली. दोन वेळा दिल्लीला चकरा मारल्या. यशवंतराव चव्हाण उपपंतप्रधान असूनही काळजीवाहू सरकार असल्याने ते निर्णय घेऊ शकत नव्हते. अखेर मागणी तत्त्वतः मान्य करून करार केला गेला आणि या दोन्ही नेत्यांच्या मध्यस्थीने तो संप मिटला. संपूर्ण पगारी रजाही मान्य करण्यात आली. त्यामुळे प्रेस कामगारांचे या दोन्ही नेत्यांशी अतूट नाते जुळले गेले आहे. म्हणून प्रेसच्या मातीचा कलश कोरडे यांनी दिला. यावेळी त्यांच्यासमवेत प्रशांत वाघ, जगदीश पवार, रमेश ताजनपुरे, संजय बोडके, विद्या पगारे, रूपाली पठारे, राकेश कांबळे, सोनू वायकर, अजय बागूल, ताहीर शेख, गौतम पगारे, मंगेश लांडगे, सागर शिंदे, प्रकाश पाळदे आदी उपस्थित होते.

### आजपासून नाशिकरोडला शिवमहापुराण

**नाशिकरोड :** शिवसेनेच्या दिवंगत झुंजार नेत्या, रणरागिणी सौ. सत्यभामा लक्ष्मण गाडेकर यांच्या चतुर्थ पुण्यस्मरणार्थ आज शनिवार, दि. ३ रोजी बीड येथील चकलांबाच्या सुप्रसिद्ध कथाकार गुरुवर्य ह.भ.प. साध्वी सोनालीदीदी करपे यांची संगीतमय शिवमहापुराण कथा आयोजित केली आहे. यानिमित्ताने सायंकाळी ५ वाजता परिसरातून सुशोभित रथातून शिवपुराण व साध्वी सोनालीदीदी करपे यांची भव्य शोभायात्राही काढण्यात येणार आहे. सिन्नर फाटा पूर्व भागातील जुना चेहडी रोडवरील गाडेकर मळ्यातील मनीषा फार्ममध्ये सोनालीदीदींच्या सुमधुर वाणीतून रोज सायंकाळी ७ ते १० वा. पर्यंत ही शिवपुराण कथा भाविकांना श्रवण करण्यास मिळणार आहे. या कथेचे उत्तम आयोजन लक्ष्मण पुंडलिक गाडेकर, मनीषा सागर वझरे, योगेश सत्यभामा लक्ष्मण गाडेकर, जयश्री योगेश गाडेकर, विशाल सत्यभामा लक्ष्मण गाडेकर, पल्लवी विशाल गाडेकर यांनी केले आहे. या सात दिवसांच्या आध्यात्मिक कार्यक्रमासाठी गाडेकर, रौंदाळे, वझरे, गिते परिवारातील सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.



### जपानुष्ठान सोहळ्यात संतांचे मार्गदर्शन

**नाशिक :** पंचवटीतील तपोवन येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज येथे २८ एप्रिल ते ५ मेदरम्यान अक्षयतृतीया जपानुष्ठान सोहळा होत असून, सोहळ्यात भाविकांना संतांचे मार्गदर्शन लाभत आहे. नामवंत साधूंकडून बौद्धिक प्रवचनांचा लाभ दिला जात असून, प्रवचनातून वेगळी प्रेरणा, प्रज्ञा आणि दिशा दाखविली जात आहे. या सोहळ्यात आतापर्यंत अरुणगिरी महाराज, श्रवणगिरी महाराज, गणेशगिरी महाराज, संदीपगिरी महाराज, राघवगिरी महाराज, संतोषगिरी महाराज यांनी प्रवचन सेवा दिला असून, शनिवारी (दि.३) शिवगिरी महाराज व रविवारी हभप भाऊ पाटील यांचे रात्री ८ ते १० वाजेदरम्यान प्रवचन होणार आहे. दरम्यान, जपानुष्ठान सोहळ्याला भाविकांचा मोठा प्रतिसाद लाभत असून, भाविकांनी आणखी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून प्रवचन सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन राष्ट्रसंत जनार्दन स्वामी महाराज आश्रमाच्या विश्वस्त मंडळातर्फे करण्यात आले आहे.

### सोहम गाडेकरला स्केटिंग स्पर्धेत गोल्ड मेडल

**पंचवटी :** मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थी कु. सोहम संतोष गाडेकर (इ.१० वी ब) याने पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय स्केटिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून गोल्ड मेडल व प्रमाणपत्र प्राप्त केले. कु.सोहम यास ज्येष्ठ क्रीडाशिक्षक अनिल पगार, शरद आहेर, सुनीता उशीर तसेच प्रशिक्षक निनाद भडांगे व पालक संतोष गाडेकर यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. कु. सोहम गाडेकर याने मिळविलेल्या उज्ज्वल यशाबद्दल मविप्र सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्र अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, संचालक रमेश पिंगळे, माजी सेवक संचालक डॉ. अशोकराव पिंगळे, शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके, अभिनव शालेय समिती अध्यक्ष निवृत्ती महाले, उच्च माध्यमिक समिती अध्यक्ष पंडितराव पिंगळे, कला व वाणिज्य महाविद्यालय समिती अध्यक्ष सुरेश पिंगळे, होरायझन शालेय समिती अध्यक्ष शंकरराव पिंगळे, शिक्षक-पालक संघाचे उपाध्यक्ष वाळू काकड, शालेय समिती सदस्य, मविप्र सभासद, ग्रामस्थ, प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.



### सरस्वती विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा



**नाशिक :** सरस्वती विद्यालय, महात्मा गांधी रोड, नाशिक या शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश वैशंपायन, उपाध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी, संस्थेचे सेक्रेटरी हेमंत बरकले, शाळेच्या अधीक्षिका सुरेखा प्रमोद यांनी महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र दिन कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहणाने झाली. शाळेचे चेअरमन रवींद्र कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यानंतर शिक्षिका ज्योत्स्ना जोशी, पवार यांनी राष्ट्रगीत व राज्यगीत यांचे गायन केले. मुख्याध्यापिका अनुराधा बस्ते यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची सुरुवात केली. महाराष्ट्राच्या गौरवशाली परंपरेला अभिवादन केले.

# पंचवटीत पिकअपच्या धडकेने युवती ठार

## आरटीओ कॉर्नरवर अपघात; चार वाहनांना धडक

**पंचवटी : वार्ताहर**

**दिंडोरी रोडवरील आरटीओ कॉर्नरवरील सिग्नलवर भरधाव पिकअपने चार वाहनांना जोरदार धडक दिल्याने युवतीचा जागीच मृत्यू झाला. तर तीन जण जखमी झाले. दिंडोरी रोडवरील राज स्वीट समोरील सिग्नलजवळ गुरुवारी (दि.१) दुपारी पावणेबाराच्या सुमारास हा अपघात झाला.**

सर्व अपघातग्रस्त हे सिग्नलवर उभे असताना दिंडोरीकडून नाशिककडे भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअपने मागून येऊन चार वाहनांना धडक दिली.



जयश्री संजय सोनवणे (२३, रा. आकाश पेट्रोलपंपाजवळ, दिंडोरीरोड) ही युवती या अपघातात मृत्युमुखी पडली. तिचा भाऊ हितेश संजय सोनवणे (३०) हा गंभीर जखमी झाला. जयदेव लक्ष्मण महाले (२१, रा. साईदर्शन कॉलनी, ता. जि. धुळे) व घनश्याम भरत महाले (१९, रा. वरवंडी, ता. दिंडोरी) हेसुद्धा जखमी झाले आहेत. चालक अनिल मच्छिंद्र साळवे (३२, रा. रामेश्वरनगर, दिंडोरीरोड) याने पिकअप वाहनाने (एमएच १५ एचएच ७३०३) सिग्नलवरील वाहनांना धडक दिली.

पिकअप वाहन व त्याच्या चालकाला म्हसरूळ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत हितेश संजय सोनवणे (३०, रा. कलाश्री अपार्टमेंट, दिंडोरीरोड) यांनी फिर्याद दिली. पोलीस उपनिरीक्षक मनोहर क्षीरसागर तपास करीत आहेत.

# बनावट सहीने उपसरपंचांचा राजीनामा मंजूर करण्याचा प्रयत्न

## पळसे सरपंच, ग्रामसेवकाविरुद्ध तक्रार

**नाशिक : प्रतिनिधी**

सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने उपसरपंचांची बनावट सही करून राजीनामा मंजूर करण्याचा प्रयत्न केल्याची तक्रार उपसरपंच भाऊसाहेब गायधनी यांनी पंचायत समितीसह पोलिसांकडे लेखी स्वरूपात केली आहे.

तक्रारीत म्हटले की, पळसे ग्रामपंचायतीच्या पंचवार्षिक निवडणुकीत वॉर्ड क्रमांक दोनमधून आपण निवडून आलो आहोत. आठ महिन्यांपूर्वी उपसरपंचपदी निवड झाली आहे. मात्र, विद्यमान सरपंच व ग्रामसेवकांनी संगनमत करून माझी बनावट सही करून मी राजीनामा दिल्याचे दर्शविले. २८ एप्रिलच्या मासिक बैठकीत विषय क्रमांक १२ हा उपसरपंचांच्या राजीनाम्याची पडताळणी करणे हा ठेवला.

**विनाकारण आरोप नको...**

उपसरपंच भाऊसाहेब गायधनी यांनी काही दिवसांपूर्वीच दुसऱ्याला संधी मिळावी यासाठी राजीनामा दिला होता. राजीनाम्यावर आक्षेप असेल तर त्यांनी संबंधित विभागाकडून आपल्या राजीनाम्याची पडताळणी करून घ्यावी. विनाकारण चुकीचे आरोप करून दिशाभूल न करता आपली सही खोटी की खरी, त्याची मागील मीटिंगच्या प्रोसिडिंगवरील सह्यांशी पडताळणी करूनच आरोप करावे. उगाच बिनबुडाचे आरोप खपवून घेतले जाणार नाही.

- **ताराबाई गायधनी** (सरपंच, ग्रामपालिका, पळसे)

मासिक बैठकीबाबतचा अजेंडा प्राप्त झाल्यानंतर आपणास धक्का बसला. मी कुठल्याही प्रकारे राजीनामा दिलेला नाही. २५ एप्रिलला मी ग्रामसेवक उत्तम शेटे व सरपंच ताराबाई गायधनी यांना समक्ष भेटून राजीनाम्यावर सही केलेली नाही. हा राजीनामा खोटा आहे. त्यामुळे विषय क्रमांक १२ हा रद्द करावा, असे मी बैठकीत सांगितले.

मात्र, सरपंच व ग्रामसेवकांनी माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष केले. आपण राजीनाम्याच्या कागदपत्रांची मागणी केली असता सरपंच व ग्रामसेवकांनी कागदपत्र दाखविण्यास नकार दिला. खोटा राजीनामा तयार करण्यामध्ये सरपंच, ग्रामसेवक यांच्यासह सुनील गायधनी यांचादेखील सहभाग असल्याचेही तक्रारीत नमूद केले आहे.

# जाधव बंधू हत्याकांडातील फरार आरोपीला अटक

## गुंडाविरोधी पथकाची यशस्वी कारवाई



**सिडको : विशेष प्रतिनिधी**

उपनगर परिसरातील आंबेडकरवाडी येथे रंगपंचमीच्या दिवशी झालेल्या जाधव बंधू दुहेरी हत्याकांड प्रकरणातील फरार आरोपी मंगेश रोकडे (३२) याला ठाणे येथून अटक करण्यात आली आहे. गुंडाविरोधी पथकाने अतिशय शिताफीने ही धडक कारवाई केली.

उमेश भगवान जाधव व प्रशांत भगवान जाधव या दोघा भावांचा कोयत्याने निर्घृण खून करण्यात आला होता. याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान आतापर्यंत सहा आरोपींना अटक झाली असून, मंगेश रोकडे हा सातवा आरोपी फरार होता. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपआयुक्त प्रशांत बच्छाव व सहायक आयुक्त संदीप मिटके यांच्या मार्गदर्शनाखाली गुंडाविरोधी पथकाला आरोपींचा शोध घेण्याचे आदेश देण्यात आले होते. पोलीस अंमलदार अक्षय गांगुर्डे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, आरोपी ठाणे शहरातील मनोरमानगर भागात लपून राहत असल्याची माहिती मिळाली.

गुंडा पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मोहिते यांच्या नेतृत्वाखाली विजय सूर्यवंशी, प्रदीप ठाकरे, राजेश राठोड, कल्पेश जाधव आदींच्या पथकाने २९ एप्रिल रोजी ठाणे गाठले. मनोरमानगर येथील बुद्धविहार मैदानाजवळ सापळा रचण्यात आला.

### अल्पवयीन युवतीचा पंचवटीत विनयभंग

**पंचवटी : वार्ताहर**

घरी जेवण देण्यासाठी गेलेल्या एका अल्पवयीन पीडितेला जवळ बोलावून तिचा विनयभंग केल्याचा प्रकार घडला असून, याबाबत अल्पवयीन पीडित युवतीने पंचवटी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

एक १६ वर्षीय पीडित युवती तिच्या घरा शेजारी राहणारा नाझीम उर्फ नासिर मुल्ला ( पूर्ण नाव माहिती नाही) याच्या घरी जेवण देण्यासाठी गेली असताना मार्च २०२५ पासून ते दि.१ मेदरम्यान तिला जवळ ओढून स्त्रीमनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. तसेच त्यानंतर त्याने पुन्हा तिला घरी बोलावत, 'तू जर कोणाला काही सांगितले तर तुझ्या वडिलांना ऑर्डरसाठी बाहेर गेल्यावर मारून टाकेल व लहान बहिणीला घरी टी.व्ही. पाहण्यास आल्यावर गळा दाबून मारेल' अशी धमकी दिली. तिला मोबाइलवर तू कधी येते, कधी जाते, वडील कधी येता? कधी जातात? याबाबत माहिती घेऊन बळजबरीने फोनवर बोलायला लावायचा. याबाबत पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी पाटील करीत आहेत.

### फळविक्रेत्यांवर अतिक्रमणची कारवाई

**पंचवटी : वार्ताहर**

गंगापूर रोडवरील आनंदवली ते बारदान फाट्यापर्यंत रस्त्यालगत बसलेल्या फळविक्रेत्यांवर मनपाच्या सातपूर आणि पश्चिम अतिक्रमण विभागाने सयुक्तिक मोहीम राबवून कारवाई करण्यात आली. मनपा उपायुक्त अश्विनी गायकवाड यांच्या आदेशान्वये विभागीय अधिकारी राजाराम जाधव व चंदन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने संयुक्त मोहीम राबवून गंगापूर रोड ते आनंदवली ते बारदान फाट्यापर्यंत फळविक्रेत्यांवर अतिक्रमण कारवाई करण्यात आली. जप्त केलेले २ ट्रक फळे व आंबे निरीक्षणगृह व बालसुधारगृह उंटवाडीरोड येथे जमा करण्यात आले. या मोहिमेत प्रवीण बागूल, तानाजी निगळ, भगवान राजपूत, सुमित दिवे, जावेद शेख, जगन्नाथ हमारे, बापू लांडगे, मोहन भांगरे, संजय सूर्यवंशी, संतोष पवार गांधी, शिरीष शिंदे व पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# बेशुद्ध पडेपर्यंत बसचालकाला मारहाण

**पंचवटी : वार्ताहर**



मुंबई-आग्रा महामार्गावरील आडगाव टी पॉइंटजवळ बसचालकाला बेशुद्ध पडेपर्यंत मारहाण केल्याची घटना घडली असून, याबाबत आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अशोक विजय भिल (४३, रा.मु.पो. नेर, ता.जि. धुळे) यांनी आडगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. बसचालक कृष्णा रमेश वळवी (३८, रा. नाला अंमलपाडा, ता. तळोदा, जि. नंदुरबार) हे अक्कलकुवा, जि. नंदुरबार बस आगाराच्या (एम. एच. २० बी.एल. २४९९) या बसमधून प्रवासी घेऊन जात असताना आडगाव टी पॉइंट येथे एसक्रॉस (एम.एच.१५ जी.ओ. ६९८४) या कारचालकाने त्याची गाडी ओव्हरटेक करून बस समोर आडवी लावत बस थांबवली. बसचालक कृष्णा वळवी यांना खाली उतरवून, 'तू आमच्या गाडीला कट का मारला?' असे म्हणून चालक कृष्णा वळवी यांना शिवीगाळ व दमदाटी केली.

तसेच त्यांच्या गुप्तांगावर लाथा मारत बेशुद्ध पडेपर्यंत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत शासकीय कामात अडथळा आणला म्हणून आडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक काळे करीत आहेत.

# पळसेत पिसाळलेल्या कुत्र्यांचा धुमाकूळ

## एकाच दिवशी बारा जणांना चावा

**नाशिक : प्रतिनिधी**

पळसे गावातील फुलेनगर, बंगालीबाबा व गावठाण भागात पिसाळलेल्या कुत्र्यांनी दहा ते बारा नागरिकांना चावा घेतल्याचा अंदाज असून, जखमींवर नाशिकरोडच्या बिटको रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सरपंच ताराबाई गायधनी यांनी कर्मचाऱ्यांना कुत्रा पकडण्याच्या सूचना केल्या आहेत.

सकाळच्या दरम्यान चौकाचौकात नागरिकांची लग्नसराईमुळे गर्दी असते. त्यातच काल अचानक पिसाळलेल्या कुत्र्याने नागरिकांचे लचके तोडले. ग्रामीण भागात एवढ्या मोठ्या प्रमाणात कुत्री आली कुठून? असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे. महानगरपालिका



**पळसे : गावातील महिलांना पिसाळलेल्या कुत्र्याने घेतलेला चावा. (छाया : सुनील पवार)**

हद्दीत पकडलेले कुत्री ग्रामीण भागात कर्मचारी सोडून देत असल्याचा संशय पळसेच्या ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. यामुळे अनेक गावांमध्ये कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे.

महानगरपालिकेने पकडलेले मोकाट कुत्री ग्रामीण भागात न सोडता परस्पर शहराच्या हद्दीत बंदोबस्त करावा; अन्यथा मनपा कार्यालयात कुत्री आणून सोडू, असा इशारा सरपंच ताराबाई गायधनी यांच्यासह अजित गायधनी, किरण नरवडे, समाधान गायखे, कमलबाई गायधनी, प्रिया गायधनी, भीमाबाई चौधरी, कांताबाई गायखे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील गायधनी, शिवसेना उबाठाचे तालुकाप्रमुख दीपक गायधनी, राजू नरवडे, भाजपचे नंदू नरवडे, पांडुरंग ढेरिंगे, प्रकाश गायधनी आदींसह नागरिकांनी दिला आहे.

# डॉ. देवयानी जाधव यांना धन्वंतरी पुरस्कार

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनतर्फे होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल हॅनेमन यांची जयंती व जागतिक होमिओपॅथी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून एचएचएफ अकॅडमीचे प्रमुख डॉ. सुनील घोडके, डॉ. सारंग रहाळकर, असोसिएशनचे संस्थापक व महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ सिनेट सदस्य डॉ. भालचंद्र ठाकरे, नाशिक येथील सुप्रसिद्ध हिमॅटोलॉजिस्ट डॉ. प्रीतेश जुनागडे, जिल्हाध्यक्ष डॉ. स्वप्निल खैरनार, शहराध्यक्ष डॉ. अमोल वाजे, महिला विंगच्या अध्यक्षा डॉ. ज्योती पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.



जिल्ह्यातील वैद्यकीय क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या डॉ. सुधाकर मालपुरे, डॉ. प्रसाद कापडणी व डॉ. रोहिदास भदाणे यांना व धन्वंतरी जीवनगौरव पुरस्कार डॉ. देवयानी दिलीप जाधव व डॉ. उल्हास पांडुरंग कुटे यांना देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी नाशिक जिल्हा होमिओपॅथिक डॉक्टर असोसिएशनचे पदाधिकारी डॉ. भगवान पगारे, डॉ. योगेश पगार, डॉ. चंद्रकांत शेवाळे, डॉ. हेमंत आवारे, डॉ. रत्ना चोपडे, डॉ. राखी मुथा, डॉ. मनीषा काळे, डॉ. अश्विनी कुलकर्णी, डॉ. किशोरी पगार, डॉ. वर्षा धारणे, डॉ. पल्लवी पाटील, डॉ. पूनम ठक्कर, डॉ. सीमा पवार, डॉ. करुणा बनसोडे, डॉ. पुष्पा मराठे, डॉ. मनीषा मर्दा व डॉ. निर्मला गिते, डॉ. राकेश शर्मा, डॉ. रोहित पलोड, डॉ. उमेश धारणे यांनी परिश्रम घेतले.

# लोकसहभागातून रुग्णालये उभारण्याची गरज

## डॉ. नंदकिशोर लाड : वसंत व्याख्यानमाला शुभारंभ

**नाशिक : प्रतिनिधी**

**आरोग्यसेवा ही लोकांची समस्या आहे. दिवसेंदिवस उपचार महाग होत आहेत, एकीकडे आजार वाढत आहे तर दुसरीकडे न पेलवणारा रुग्णालयांचा खर्च भेडसावत आहे. यावर उपाय म्हणून सहकारी तत्त्वावरील रुग्णालये निर्माण करण्यासाठी लोकांनी पुढे आले पाहिजे, असे आवाहन पद्मभूषण तथा ख्यातनाम अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. नंदकिशोर लाड यांनी केले.**



**नाशिक : व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना अस्थिरोगतज्ज्ञ पद्मभूषण डॉ. नंदकिशोर लाड, विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, सह्याद्री प्रोड्युसर फार्मचे चेअरमन विलास शिंदे, नाशिकचे अस्थिरोगतज्ज्ञ व्ही. आर. काकतकर. समवेत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी आदी.**

वसंत व्याख्यानमालेच्या १०२ व्या ज्ञानसत्रातील पहिले पुष्प गुंफताना डॉ. लाड बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विभागीय महसूल आयुक्त प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, सह्याद्री फार्म्स मोहाडीचे चेअरमन विलास शिंदे, नाशिकचे प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. व्ही. आर. काकतकर, वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी आदींसह कार्यकारी मंडळ उपस्थित होते.

मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये दीपप्रज्वलन होऊन व्याख्यानमालेची सुरुवात झाली. वसंत व्याख्यानमालेचे माजी कार्याध्यक्ष मधुकर झेंडे तसेच माजी अध्यक्ष देवकिसन सारडा यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. अध्यक्ष श्रीकांत बेणी यांनी आपल्या प्रास्ताविकपर मनोगतातून व्याख्यानमालेची 'लोकल ते ग्लोबल' अशी वाटचाल सांगितली.

प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनीदेखील व्याख्यानमालेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

डॉ. नंदकिशोर लाड यांचा सन्मान सह्याद्री फार्मर्सचे चेअरमन विलास शिंदे यांनी केला. व्याख्यानमालेच्या सुरुवातीला मविप्र संस्थेतील संगीत शिक्षक दिनकर दांडेकर प्रस्तुत महाराष्ट्रगीत सादर करण्यात आले.

व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन संगीता बाफना यांनी केले. शाहीर स्वप्नील डुंबरे व सहकारी कलाकार

**नाशिक वसंत व्याख्यानमाला**

यांचा शाहिरी जलसा झाला. साथसंगत करण्यासाठी ढोलकीवादक आकाश बैरागी, संबळवादक रोशन भिसे, गायक विक्रम नन्नावरे, राहुल तिवारी, हार्मोनियमसाठी कुलदीप गोराडे तसेच सहगायक म्हणून अक्षय नन्नावरे, विशाल नन्नावरे, तसेच सिंथेसायझरवादक शुभम यादव आदींचे सहकार्य लाभले.

# शाहीर सूरज राऊळ यांच्या शाहिरी जलशाचे सादरीकरण

**नाशिक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक असे स्वराज्य तोरण बांधण्यापासून तर संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील विविध हुतात्म्यांचे स्मरण करून मराठ्यांच्या पराक्रमाची गाथा आपल्या शाहिरीतून पहाडी आवाजात सादर करून युवा शाहीर सूरज राऊळ आणि सहकारी यांनी नाशिककरांना मंत्रमुग्ध केले.

वसंत व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशीच्या ज्ञानसत्रात स्व. लोकशाहीर गजाभाऊ बेणी स्मृती व्याख्यानमालेत नगरदेवळा (जि. जळगाव) येथील युवा शाहीर सूरज राऊळ आणि सहकारी यांनी विविध गीतांमधून शाहिरी कलेच्या विविध रंगांची उधळण केली. व्याख्यानमालेच्या सुरुवातीला बेणी परिवारातर्फे स्व. गजाभाऊ बेणी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. तसेच गजाभाऊंच्या जीवनपटावर आधारित चित्रफीत यावेळी दाखवण्यात आली.

या शाहिरी मंचात युवा शाहीर सूरज राऊत यांच्यासोबत शाहीर राजेंद्र जोशी, जितेंद्र भांडारकर, अशोक पाटील, गोकुळ पाटील, नामदेव पाटील, सौरभ राठोड, भूषण पवार, दर्शन गुजराती आदींनी साथसंगत केली. सूत्रसंचालन गोकुळ पाटील यांनी केले. शाहीर सूरज राऊळ व सहकाऱ्यांचा सत्कार व्याख्यानमालेचे चिटणीस हेमंत देवरे यांनी केला. यावेळी व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेणी व कार्यकारी मंडळ उपस्थित होते.



**आज होणारे व्याख्यान**

स्व. अशोकराव देशमुख स्मृती व्याख्यानमालेत स्वेच्छानिवृत्त आयकर अधिकारी मुंबई ॲड. उज्ज्वलकुमार चव्हाण यांचे 'ये ईडी ईडी क्या है?' या विषयावर व्याख्यान होईल.
२) MSL Karaoke Club, Nashik यांचा हिंदी गीतांचा बहारदार कार्यक्रम होईल.

## महत्त्वाचे



### चांदवड प्रशासकीय कार्यालयात महाराष्ट्र दिन

**चांदवड :** १ मे महाराष्ट्र राज्याच्या ६६ व्या स्थापना दिनानिमित्त चांदवड येथील प्रशासकीय कार्यालयात उत्साहाचे वातावरण होते. आमदार डॉ. राहुल आहेर यांच्या हस्ते सकाळी ध्वजारोहण समारंभ झाला. याप्रसंगी चांदवडचे उपविभागीय अधिकारी कैलास कडलग, तहसीलदार मंदार कुलकर्णी, पोलीस निरीक्षक कैलास वाघ, गटविकास अधिकारी मच्छिंद्र साबळे, मुख्याधिकारी सिनारे यांच्यासह चांदवडचे उपविभागीय माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल, भाजपचे ज्येष्ठ नेते मोहन शर्मा, अशोक व्यवहारे, सुरेश पाटील, योगेश ढोमसे, विजय धाकराव, संजय पाडवी आणि नागरिक उपस्थित होते.

### मोहाडी थोरात विद्यालयात महाराष्ट्र दिन

**मोहाडी :** मविप्र संचालित येथील कर्मवीर रावसाहेब थोरात विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात



झाला. उत्तम जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शालेय समिती सदस्य जी. एम. गायकवाड अध्यक्षस्थानी होते. यावेळी मविप्रचे दिंडोरी-पेठचे संचालक प्रवीण जाधव, मोहाडीच्या सरपंच आशा लहांगे, सुरेश सोमवंशी, विजय जाधव, रामराव पाटील, रवी जाधव, सोनाली जाधव, एस. एस. जाधव, दीपक जाधव, माणिकराव नाठे, उत्तम जाधव, श्याम जाधव, एल. टी. गुरुजी, प्राचार्य शरयू भामरे, आयटीआयच्या प्राचार्य माया वारुंगसे, पर्यवेक्षक रवींद्र निकम, प्रदीप जाधव आदी उपस्थित होते. प्राचार्य भामरे यांनी प्रास्ताविक केले. विद्यालयातील सेविका पल्लवी वैद्य व दौलत हिरे यांचा आदर्श सेवक म्हणून सन्मान करण्यात आला. विद्यालयातील संगीत शिक्षक दिलीप पागेरे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी पहलगाम हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर विद्यालयात प्रथम, द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. कार्यक्रमानंतर चावडीवाचन उपक्रम झाला. कार्यक्रमासाठी फलकलेखन कलाशिक्षक कृष्ण जाधव, धनंजय जाधव यांनी केले. गोविंद बैरागी व ज्ञानेश्वर भवर यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक रवींद्र निकम यांनी आभार मानले.

### ओझरच्या पोदार स्कूलमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम




**ओझर :** येथील पोदार इंटरनॅशनल स्कूलमध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात झाला. यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. प्रारंभी शाळेच्या आवारात सुरक्षा विभागातील विजय गडाख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या देशभक्तीपर घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध नृत्ये, भावस्पर्शी नाटिका व सुरेल गीतांद्वारे महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे सजीव दर्शन घडविले. प्राचार्या डॉ. जसिंथा पार्के यांनी महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा इतिहास उलगडत विद्यार्थ्यांना संस्कृतीचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले.

## निधन वार्ता



### सत्यभामा पाळदे

**नाशिकरोड :** शेवगेदारणा येथील रहिवासी सत्यभामा दत्तात्रय पाळदे (७२) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्या कै. दत्तात्रय पाळदे यांच्या पत्नी होत.

### लहानू अहिरे



**सटाणा :** बागलाणचे माजी आमदार लहानू बाळा अहिरे (९५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा अंत्यविधी दि. १ रोजी सकाळी दहा वाजता जाड (ता. बागलाण) येथील त्यांच्या मूळ गावी करण्यात आला. स्व. माजी आमदार अहिरे यांचा जन्म १ जून १९३० रोजी गुजरात-महाराष्ट्र सीमेवरील जाड या दुर्गम आदिवासी गावात झाला होता. इयत्ता सातवी फायनल करून कृषी पदविकेचे कोसबाड येथे शिक्षण घेतले होते. गुजरात डांग येथे खाजुरण्या गावात शिक्षक व नंतर गरकुड (गुजरात) येथे तलाठी म्हणून सेवा केली होती.

### रंजनाबाई बोडके



**नाशिक :** दिंडोरी रोडवरील यशवंत मंगल कार्यालयासमोर राहणाऱ्या रंजनाबाई केशव बोडके (६५) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर बोडके यांच्या त्या मातोश्री होत.



### दत्ताराम खताळे

**नाशिक :** दत्ताराम गोपाळ खताळे (७५) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून व तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. केशव खताळे (मराठा हायस्कूल) यांचे ते वडील होत.

### प्रतिभा कर्पे



**पंचवटी :** हुंडीवाला लेन येथील रहिवासी व भद्रकालीतील फळ व्यापारी जगन्नाथ कर्पे यांच्या पत्नी प्रतिभा जगन्नाथ कर्पे (६२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगी, दोन मुले, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. ज्येष्ठ कार्यकर्ते गणेश व महेश कर्पे यांच्या त्या मातोश्री होत.

### राधाकिसन बोराडे



**शिलापूर :** नाशिक रोड पंचक येथील मनपा शाळेतील कर्मचारी राधाकिसन वाळू बोराडे (५२) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, तीन भाऊ असा परिवार आहे. ते तुकाराम, ज्ञानेश्वर व शांताराम बोराडे यांचे बंधू होत.

# सर्वधर्मसमभाव हो, सबका हो सन्मान!

## महाराष्ट्रदिनी लासलगावला विविध शाळा, संस्थांतर्फे विविध उपक्रम

**लासलगाव : वार्ताहर**

**लासलगाव येथील विविध शैक्षणिक संस्थांतर्फे महाराष्ट्र व कामगार दिन उत्साहात झाला. मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. येथील जिजामाता प्राथमिक शाळेने सर्वधर्मसमभाव हो, सबका हो सन्मान दाखवणारा चित्ररथ काढला. शहरात तो लक्षवेधी ठरला.**



**लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळात महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीत सहभागी मान्यवर, संस्था संचालक, शिक्षक व विद्यार्थी.** (छायाचित्र : समीर पठाण)

**शिक्षण सहाय्यक मंडळ**

लासलगाव शिक्षण सहाय्यक मंडळ संचालित तिन्ही विद्याशाखांतर्फे महाराष्ट्र व आंतरराष्ट्रीय कामगार दिन उत्साहात झाला. निवृत्त पोलीस उपनिरीक्षक सुनील जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करून कलशपूजन आणि (कै.) दत्ताजी पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पहलगाम येथील मृतांना मान्यवरांनी श्रद्धांजली वाहिली. यावेळी शहरातील विविध भागांतून मिरवणूक काढण्यात आली. जिजामाता प्राथमिक शाळेने सर्वधर्मसमभाव हो, सबका हो सन्मान दाखवणारा चित्ररथ, तर लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाने महाराष्ट्राचे आराध्य दैवत खंडोबा महाराज, म्हाळसाबाई व बाणाई, येळकोट येळकोट जय मल्हार, जिजामाता कन्या विद्यालयाने अवकाशयात्री सुनीता विल्यम्स यांचा देखावा असलेला चित्ररथ सादर केला. झांज व लेझीमपथक, एनसीसी, स्काउट-गाइड, हरितसेना, विद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून मिरवणुकीची शोभा वाढवली.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब पाटील, सचिव संजय पाटील, उपाध्यक्ष निवृत्ती गायकर, संचालिका नीता पाटील, शंतनू पाटील, अभय पाटील, सीताराम जगताप, लक्ष्मण मापारी, कैलास ठोंबरे, डॉ. सुरेश दरेकर, राजेंद्र सावंत, भाऊसाहेब सोनवणे, युनूस तांबोळी, आसिफ पठाण, डॉ. अशोक महाले, देवीदास पाटील, जनार्दन जगताप, राजाराम सानप, सुभाष रोटे, शाहू होळकर, भागवत होळकर, विठ्ठल गायकर, तुळशीराम जाधव, पोपट नवले, दिलीप पानगव्हाणे, संजय ठोंबरे, दत्तूलाल शर्मा, विजय शर्मा, राजेंद्र कराड, रामेश्वर गिलडा, दत्तू गांगुर्डे, लासलगाव प्रेस क्लबचे सदस्य, लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयाचे प्राचार्य रमेश सोनवणे, जिजामाता कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रोशनी गायकवाड, पर्यवेक्षक कौतिक आवारे, अनिल सोनवणे, जिजामाता प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मोहन निकम उपस्थित होते.

**श्री महावीर विद्यालय**

येथील श्री महावीर विद्यालयात महाराष्ट्र दिनानिमित्त निवृत्त ग्रंथपाल कैलास कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रह्मेचा अध्यक्षस्थानी होते. मानद सचिव शांतिलाल जैन, संस्थेचे पालक प्रतिनिधी अक्षय ब्रह्मेचा, श्री महावीर विद्यालयाच्या प्राचार्या पल्लवी चव्हाणके, श्री महावीर इंग्लिश मीडियमच्या प्राचार्या वैशाली निकम आदी उपस्थित होते. पर्यवेक्षक शिवाजी धुमाळ यांनी प्रास्ताविक केले. उपशिक्षक सतीश पवार यांनी महाराष्ट्र व कामगार दिनाचे महत्त्व विशद केले. कार्याध्यक्ष जवाहरलाल ब्रह्मेचा, मानद सचिव शांतिलाल जैन, निवृत्त ग्रंथपाल कैलास कदम यांनी सर्वांना महाराष्ट्र व आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संगीत शिक्षक सचिन आहेर व गीतमंचाने ध्वजगीत, राज्यगीत 'जय जय महाराष्ट्र माझा' सादर केले. सूत्रसंचालन उपशिक्षक ज्ञानेश्वर मोहन व एनसीसीप्रमुख राजेंद्र बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

**सरस्वती विद्यामंदिर**

लासलगाव विद्या प्रसारक मंडळाचे सरस्वती विद्यामंदिर, सरस्वती बालक मंदिर व मातोश्री निर्मला माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहण झाले. पालक श्रीराम सांगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमास राहुल नागरे, लक्ष्मण बोडके, अशोक शिंदे, रामनाथ फापाळे, दीपक गांगुर्डे, विजय कापसे, अंबादास साठे व मुनीर शेख आदी पालक, तसेच मुख्याध्यापक भीमराव शिंदे, राजेंद्र महाले, ऊर्मिला खोकले, शिक्षक सुनील आव्हाड, संदीप सूर्यवंशी, कांचन शेलार, धर्मेंद्र निकम, रूपाली शिंदे, मोहन नाईक, सोनाली होळकर, प्रदीप ठाकरे, स्वप्नील आहिरे, सुनील होळकर, कविता अत्तरदे, रूपाली दिवटे, दीपाली शेळके, हर्षाली रसाळ, सोनाली बागूल, वर्षा गुंजाळ, सारिका बोराडे, तुषार फेंगडे आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. नवनाथ जिरे व कैलास पातळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक व कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

**जैन प्राथमिक शिक्षण मंदिर**

येथील जैन प्राथमिक शिक्षण मंदिर या शाळेत महाराष्ट्र दिन, तसेच कामगार दिन उत्साहात झाला. मुख्याध्यापिका लिनिता अहिरे, शिक्षक, कर्मचारी, बालवाडी शिक्षिका यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी चावडीवाचन उपक्रमांतर्गत गोष्टींच्या पुस्तकांचे वाचन विद्यार्थ्यांकडून करण्यात आले. महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाची माहिती मुख्याध्यापिका लिनिता अहिरे यांनी दिली. महेश खैरनार यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. विद्यार्थ्यांच्या वार्षिक निकालपत्रांचे वाटप करण्यात आले.

## शिंगवे येथे ७० फूट विहिरीत पडलेल्या कोल्ह्याचे प्राण वाचले

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील शिंगवे येथील शेतकरी बापू देवराम गुंड यांच्या शेतातील गट नंबर ५९८, महात्मा फुलेनगर येथे असलेल्या सुमारे ७० फूट खोल विहिरीत एक कोल्हा पडल्याची घटना घडली. ही बाब स्थानिक नागरिकांच्या लक्षात येताच, शिंगवेचे सरपंच आत्माराम खताळ यांनी तातडीने चांदवड येथील वनविभागाच्या कार्यालयाला दूरध्वनीद्वारे माहिती दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, वनविभागाचे कर्मचारी आवश्यक साहित्यासह घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोरी आणि प्लास्टिकच्या जाळीच्या सहाय्याने अथक प्रयत्न करून कोल्ह्याला सुरक्षितपणे विहिरीतून बाहेर काढले. त्यानंतर त्याच ठिकाणी रात्री सुमारे साडेआठ वाजता कोल्ह्याला त्याच्या नैसर्गिक अधिवासात सुखरूप सोडण्यात आले, अशी माहिती वनविभागाचे अधिकारी प्रकाश सोमवंशी यांनी दिली. या बचावकार्यात वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी आणि स्थानिक नागरिकांनी दाखवलेल्या सतर्कता आणि सहकार्यामुळे एका वन्यजीवाचे प्राण वाचले.

## विद्या इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

### पाच विद्यार्थ्यांना पाच विषयांत १०० गुण

**येवला : प्रतिनिधी**

फेब्रुवारी २०२५ मध्ये झालेल्या आय.सी.एस.ई. बोर्डाच्या १० वीच्या परीक्षेत येवला येथील विद्या इंटरनॅशनल स्कूलचा शाळेचा निकाल दरवर्षीप्रमाणे यंदाही १०० टक्के लागला.

समर्था कुमावत हिने ९७.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम क्रमांक मिळवला. तिला केमेस्ट्री, बायोलॉजी व कम्प्युटर या तीन विषयांत शंभरपैकी शंभर गुण मिळाले. सुयोगा कुमावत ९५.८० टक्के मिळवून द्वितीय आली व तिने फिजिक्स व हिस्टरी या विषयात १०० पैकी १०० गुण मिळविले, पेहल चोपडा ९३.२० टक्के मिळवून तृतीय आली तर दिशा पारिख ९२.८० टक्के, नीती अहुजा व श्रेयांश राका ९२.४० टक्के मिळवून अनुक्रमे चौथ्या व पाचवे आले. दिशा पारिख, श्रेयांश राका, दिशा पारिख यांना हिस्टरीमध्ये १०० गुण मिळाले असून, या वर्षीदेखील मुलींनी निकालात बाजी मारली. एकूण चाळीस विद्यार्थ्यांपैकी सात विद्यार्थ्यांनी ९०टक्क्यांच्या वर गुण मिळवले. मागील सलग



१० वर्षांपासून शाळेचा निकाल १०० टक्के लागत आहे. या विद्यार्थ्यांबरोबरच आदी पारिख ९०.६ टक्के, शिवदास कंभीरे ८८.८ टक्के, खुशी देसाई ८४.६ टक्के गुण मिळवून यशस्वी झाले. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. राजेश पटेल, सेक्रेटरी डॉ. संगीता पटेल यांनी अभिनंदन केले.



## येवला तहसील कार्यालयात सेवा हक्क दिन

**येवला : प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ या कायद्याचा दहावा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज विस्तारित समाधान योजना शिबिर झाले.

येवला शहरातील तहसील कार्यालयात सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रांताधिकारी बाबासाहेब गाढवे होते. तहसीलदार आबा महाजन यांनी प्रास्ताविक केले तर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप वायाळ यांनी सेवा हक्क कायद्याची व्याप्ती व महत्त्व विशद केले. उपअधीक्षक भूमिअभिलेख पुष्पा गाडे पाटील यांनी भूमिअभिलेख विभागाच्या विविध ऑनलाइन योजनांबद्दल नागरिकांना थोडक्यात माहिती दिली. सेवा हक्क दिनानिमित्त आयोजित विविध स्पर्धेतील विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. तसेच महसूल, नगरपालिका, भूमिअभिलेख, पुरवठा विभाग या विभागांतील विविध लाभार्थ्यांना यावेळी लाभ वितरित करण्यात आले. सेवा हमी कायद्यांतर्गत अधिसूचित सेवा देऊन उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ५ आपले सरकार केंद्रचालकांना यावेळी सन्मानित करण्यात आले. सूत्रसंचालन नायब तहसीलदार विवेक चांदवडकर यांनी केले. सदर कार्यक्रमासाठी तहसीलदार आबा महाजन, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, नायब तहसीलदार पंकज मगर, नगरपालिका मुख्याधिकारी तुषार आहेर, उपअधीक्षक भूमिअभिलेख पुष्पा गाडे पाटील, गटशिक्षणाधिकारी संजय कुसाळकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शरद कातकडे, महिला व बालविकास विभागाच्या वंदना शिंपी आदींसह महसूल, नगरपालिका, पंचायत समिती, शिक्षण विभाग अशा विविध विभागांचे अधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते. आभार नायब तहसीलदार पंकज मगर यांनी मानले.

## एमएसजीएस शैक्षणिक संकुलात महाराष्ट्र दिन

**येवला : प्रतिनिधी**



तालुक्यातील अंदरसूल येथील मातोश्री शांताबाई गोविंदराव सोनवणे शैक्षणिक संकुलात १ मे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अरुण भांडगे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे सरचिटणीस अमोल सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर सहकार व शिक्षणमहर्षी स्व. गोविंदराव (नाना) सोनवणे यांच्या पुतळ्याला संस्थेचे अध्यक्ष अरुण भांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिक्षक अमोल आहेर यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना सादर केली. त्यानंतर एमएसजीएस इंग्लिश मीडियम स्कूल व सेमी इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यार्थी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ.८वी) परीक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी - श्लोक ज्ञानेश्वर सोनवणे, समर्थ संदीप जाचक, पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थी - ईशान सचिन देशमुख, आयुष दत्तात्रय राऊत, तन्मय सतीश सोनवणे, प्रतीक्षा पृथ्वीराज देशमुख, साई अतुल सोनवणे, तन्मय शरद खोकले, कांचन संतोष देवरे, अमृता संतोष सोनवणे आदी विद्यार्थ्यांना यश संपादन केले. १ मे रोजी शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांचा वार्षिक निकाल देण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे खजिनदार मकरंद सोनवणे, संचालक तथा प्र. अधिकारी राजेंद्र गायकवाड, जीवन गाडे, माजी सरपंच विनिता अमोल सोनवणे, रामनाथ काका एंडाईत, इंग्लिश मीडियमचे प्रिन्सिपल अल्ताफ खान, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य सचिन सोनवणे, सेमी इंग्लिश मीडियमच्या मुख्याध्यापिका जयश्री परदेशी, सीनियर कॉलेजच्या प्राचार्या डॉ.सुवर्णा कडलग, शिक्षक गणेश सोनवणे, अजीम पटेल, सचिन घोडके, राजेश कांबळे, सुनील सपकाळ, संदीप बोढरे, महेश मेहेत्रे, जितेश व्यवहारे, शिवप्रसाद शिरसाठ, माधुरी माळी, नीलिमा देशमुख, अर्चना एंडाईत, सुनीता वडे, सुषमा सोनवणे, कांचन गायकवाड यांच्यासह सर्व शिक्षक, पालक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## जावेद शेख यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक

### एटीएममधून आलेले ९७ हजार व्यापाऱ्याला केले परत

**मनमाड : वार्ताहर**

शहरातील एचएके हायस्कूलमध्ये नोकरीला असणारे जावेद शेख यांना एटीएमद्वारे व्यवहार करताना ९७ हजारांची रोकड मिळाली. मात्र, ती आपली नाही, हे त्यांना माहीत होते. त्यांनी तत्काळ सामाजिक कार्यकर्ते फिरोज शेख यांच्याशी संपर्क साधून आपल्याआधी कोण एटीएममध्ये येऊन ट्रॅन्झॅक्शन करून गेले, याबाबत माहिती घेतली. शहरातील व्यापारी रमेश गांधी यांना ९७ हजार रुपये परत केल्याची घटना येथे घडली. जावेद शेख यांचा प्रामाणिकपणा पाहून गांधी यांच्यासह शहरातील अनेक नागरिकांनी त्यांचे



कौतुक केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, मनमाड येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात एचडीएफसी बँकेचे एटीएम आहे. शहरातीलच एचएके हायस्कूलमधील शिक्षक जावेद मुस्ताक शेख एटीएममधून पैसे काढण्यासाठी गेले. पैसे काढण्यासाठी त्यांनी एटीएम टाकले असता तत्काळ त्यातून जवळपास ९७ हजार रुपये बाहेर आले. जावेद शेख यांनी तत्काळ शहरातील सामाजिक कार्यकर्ते, फुले-शाहू-आंबेडकर मुस्लिम विचारमंचाचे कार्याध्यक्ष फिरोज शेख यांच्याशी संपर्क साधला. शेख यांनीही तत्काळ एटीएम गाठले. जावेद शेख यांच्याआधी एटीएममध्ये कोण आले होते, याचा शोध घेतला. शहरातीलच व्यापारी रमेश गांधी यांनी हे ट्रॅन्झॅक्शन केल्याचे लक्षात आले. गांधी यांच्याशी संपर्क साधून ९७ हजारांबाबत खात्री केली. प्रामाणिकपणे गांधी यांना ९७ हजार रुपये परत केले. आजही प्रामाणिक लोक आहेत हे यावरून स्पष्ट झाले. शेख यांच्या प्रामाणिकपणाबद्दल नागरिकांकडून कौतुक होत आहे. जावेद शेख हे फुले-शाहू-आंबेडकर मुस्लिम विचारमंचाचे मार्गदर्शक मुस्ताक यांचे पुत्र आहेत.

> आजकाल रस्त्यावर पडलेला रुपयाही कोणी कोणाला परत करत नाही. मात्र, जावेदभाईंनी माझा शोध घेऊन ९७ हजार रुपये मला परत केले. याबाबत मी त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.
> – **रमेश गांधी,**
> व्यापारी, मनमाड

## येवल्यात महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

**येवला : प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत संप्रदायाचे प्रचारक व उद्धारक असलेले संत महात्मा बसवेश्वर यांची जयंती येवला शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते तथा व्यंगचित्रकार प्रभाकर झळके होते.

प्रारंभी दीपप्रज्वलन व भगवान बसवेश्वर यांच्या आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर समाजातील गुणवंत विद्यार्थी आराध्या तक्ते, आराध्या शेटे, अंश तक्ते, सृष्टी बोरकर, सुयोग तक्ते, ओम वाडकर, डॉ. अंकिता मानेकर, डॉ. तेजस जंगम, साहिल बोरकर, राज शेटे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

सामाजिक कार्यकर्ते महेंद्र गायकवाड, शरद शेजवळ यांनी मनोगतातून महात्मा बसवेश्वरांच्या कार्याची माहिती दिली तर ब्रह्माकुमारी नीतादीदी, दीपक पाटोदकर यांनी समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी गणेश हारके, दुर्गेश तक्ते, योगेश तक्ते, सागर शेटे, मनीष बोरकर, मनोज तक्ते, प्रतीक तक्ते, अतुल तक्ते आदींनी विशेष परिश्रम घेतले. यावेळी शहरातील लिंगायत समाजाचे समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार अरुण विभूते यांनी मानले.

## महत्त्वाचे



### डावा कालवा दुरुस्तीच्या मागणीला जलसंपदामंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद

**वावी :** गोदावरी उजव्या कालव्यावरील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरण करण्याचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले ही गोदावरी उजव्या कालव्याच्या लाभधारक क्षेत्राच्या शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय समाधानकारक व दिलासा देणारी बाब आहे. परंतु, उजवा कालवा पण आपला आहे आणि डावा कालवादेखील आपलाच आहे. त्यामुळे उजव्या कालव्याबरोबर डाव्या कालव्याचे व चाऱ्यांचे कामदेखील पूर्ण करावे, अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी केली असता, त्या मागणीला जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. यावेळी खासदार धनंजय महाडिक, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पा., मा. खा. सुजय विखे पा., जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव दीपक कपूर, लाभक्षेत्र विकास सचिव मा. डॉ. संजय बेलसरे, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, जलसंपदा उत्तर विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, कार्यकारी अभियंता सोनल शहाणे, उपविभागीय अभियंता तुषार खैरनार, गौतम बँकेचे मा. चेअरमन बाबासाहेब कोते, श्री साईबाबा संस्थानचे माजी विश्वस्त अभय शेळके, शिर्डीचे माजी नगराध्यक्ष कैलासबापू कोते आदींसह महायुतीचे कार्यकर्ते, शेतकरी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### न.प. समस्यांसंदर्भात सोमवारी जनता दरबार

**वावी :** कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचे प्रश्न सोडविण्यात आघाडीवर असणारे आ. आशुतोष काळे नागरीकांचे शासकीय कार्यालयातील प्रश्न व अडचणी सोडविण्यातदेखील आघाडीवर आहेत. यासाठी त्यांनी जनता दरबार हा उपक्रम मागील सहा वर्षांपासून अविरतपणे राबविला आहे. सोमवार दि. ५ रोजी दुपारी २ वाजता कोपरगाव शहरातील नागरिकांच्या कोपरगाव नगरपालिकेच्या संदर्भातील समस्या व अडचणी सोडविण्यासाठी तहसील कार्यालयात 'जनता दरबार' आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली.

### अस्थिरोग संघटनेतर्फे आज मोफत चर्चासत्र

**नाशिक :** महाराष्ट्र ऑर्थोपेडिक असोसिएशन या राज्यस्तरीय अस्थिरोगतज्ज्ञांच्या संघटनेतर्फे राज्यभर ऑर्थोपेडिक सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त आज शनिवारी (दि. ३) शालिमार येथील आयएमए हॉल येथे दुपारी ४ वाजता चर्चासत्र आयोजित केले आहे. नाशिककरांनी या चर्चासत्राचा लाभ घेण्याचे आवाहन अध्यक्ष डॉ. राजेंद्र खैरे तसेच माजी अध्यक्ष डॉ. संजय धुर्जड यांनी केले आहे. तंदुरुस्तीतून आरोग्य ही या वर्षीची संकल्पना असून, स्वतःला तंदुरुस्त ठेवून निरोगी तसेच दीर्घायुषी कसे बनवावे? यासाठी आणि सत्तरीनंतरदेखील ऐच्छिक जीवन कसे जगावे या सर्व बाबींचा ऊहापोह या चर्चासत्रात होणार आहे. दरवर्षी एका विशिष्ट संकल्पनेच्या आधारावर भर देऊन कार्यक्रम घेतले जातात, अशी माहिती नाशिक ऑर्थोपेडिक सोसायटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. राजेंद्र खैरे यांनी दिली. यावेळी ज्येष्ठ अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. विजय काकतकर, डॉ. रमेश मंत्री, डॉ. भरत केळकर, डॉ. संजय गणोरकर, डॉ. मिलिंद पिंप्रीकर, आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनर डॉ. विजय नेमाडे यांची मुलाखत घेतली जाणार आहे. या कार्यक्रमास प्रवेश विनामूल्य आहे.

### सिन्नरला सोमवारी गुणगौरव

**सिन्नर :** येथील श्री एज्युकेशन सोसायटीच्या वतीने बहुजन समाजातील स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्चशिक्षित व वरच्या पदावर नियुक्त झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार व गौरव सोहळा सोमवारी (दि.५) सकाळी ८ वाजता श्री एज्युकेशन सोसायटी, शिवाजीनगर येथे आयोजित करण्यात आला असल्याची माहिती अध्यक्ष डॉ. जी. एल. पवार, सरचिटणीस डॉ. सुशील पवार यांनी दिली. या कार्यक्रमात यूपीएससी उत्तीर्ण अक्षय पवार, समिता कातकाडे, सुजाता जाधव, एमपीएससी उत्तीर्ण मयूरी काळोखे, उज्ज्वला लोंढे, पूजा लोंढे, मनोज पवार, मिलिंद पवार, वृषाली जाधव, वनाधिकारी सचिन लोंढे, आदर्श पोलीसपाटील बाळकृष्ण पाटील आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन श्री एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. जी. एल. पवार, सरचिटणीस डॉ. सुशील पवार यांनी केले आहे.

### पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

**सिन्नर :** जयप्रकाशनगर ते साबरवाडीमार्गे ठाणगाव रस्त्यावर भरधाव पिकअपने मोटारसायकलला धडक दिल्याने मोटारसायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना दि.२५ रोजी सकाळी ९.३० वाजेच्या सुमारास घडली. नवनाथ केरू कडभाने (२८, रा. जयप्रकाशनगर, सोनारी, ता. सिन्नर) असे मृताचे नाव आहे. नवनाथ कडभाने हे हीरो होंडा मोटारसायकलने (क्र. एमएच-१५, बीटी-२४४७) जयप्रकाशनगर येथून ठाणगावकडे जात असताना समृद्धी महामार्गाच्या पुलाजवळील चौफुलीवर साबरवाडीकडून जयप्रकाशनगरकडे येणाऱ्या पिकअपने (क्र. एमएच-१५, एफव्ही-३४०६) मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात नवनाथ केरू कडभाने यांना गंभीर दुखापत होऊन मयत झाले. आरती नवनाथ कडभाने यांच्या फिर्यादीवरून सिन्नर पोलिसांनी पिकअपचालक रमेश दत्तात्रय काळुंगे (रा. सोनारी) याच्याविरोधात अपघाताचा गुन्हा दाखल केला असून, अधिक तपास हवालदार गिते करीत आहेत.

### मोटार रिवायडींगचे दुकान फोडले

**सिन्नर :** येथील सिन्नर-संगमनेर रस्त्यावरील नितीन मशिनरी मोटार




रिवायडींग दुकानाचा पत्रा उचटवून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करत कॉपर वायरसह २ लाख १७ हजारांचे साहित्य चोरून नेल्याची घटना बुधवारी (दि.३०) सकाळी ९ वाजेच्या सुमारास उघडकीस आली. याबाबत सविस्तर वृत्त असे की, ओम नितीन कट्यारे यांचे सिन्नर-संगमनेर रस्त्यावर रौनक लॉन्सशेजारी नितीन मशिनरी मोटार रिवायडींगचे दुकान असून, मंगळवारी (दि.२९) रात्री ७ वाजता दुकान वाढवून कट्यारे घरी गेले होते. त्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दुकानाचा पत्रा वाकवून आत प्रवेश करत ६० हजार रुपये किमतीची आर. आर. केबल कंपनीची १०० किलो कॉपर वायर, ६० हजार रुपये किमतीची चंचल केबल कंपनीची १०० किलो कॉपर वायर, ३० हजार रुपये किमतीचे ॲग्रोटेक कंपनीचे ६० गोरे ब्रासचे बुश, १२ हजार रुपये किमतीचे नॅशनल एजन्सीज कंपनीचे ३० ब्रासचे बुश, २५ हजार रुपये किमतीचे जिया एंटरप्रायजेस ॲग्रोटेक कंपनीचे ५० ब्रासचे बुश, ३० हजार रुपये किमतीची जेनिल कंपनीची ६० किलो कॉपर वायर असे एकूण २ लाख १७ हजारांचे साहित्य चोरून नेले. बुधवारी (दि.३०) सकाळी ९ वाजता कट्यारे यांनी दुकान उघडले असता चोरीचा प्रकार निदर्शनास आला. ओम कट्यारे यांनी सिन्नर पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार सोपान शिंदे करीत आहेत.

# सिन्नरला ६९,५०० हेक्टरवर होणार खरिपाची पेरणी

## १६,८०० मे. टन खतांचे आवंटन मंजूर, कृषी विभागातर्फे एकदिवसीय कार्यशाळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

**सिन्नर तालुक्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी सरासरी ६९,५०० हेक्टर क्षेत्रावर बाजरी, मका, ज्वारी, सोयाबीन, भुईमूग, कापूस, तूर, मूग, उडीद व इतर पिकांचे खरीप हंगामात पेरणीचे कृषी विभागाने नियोजन केले आहे. खरीप हंगामासाठी ५००० मेट्रिक टन युरिया, २२०० मेट्रिक टन एसएसपी, २०० मेट्रिक टन एमओपी, १५०० मेट्रिक टन डीएपी व ७९०० मेट्रिक टन इतर कॉम्लेक्स खते असे एकूण १६,८०० मेट्रिक टन खतांचे आवंटन मंजूर झाले आहे.**



आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील बियाणे, खते, कीटकनाशके, भाजीपाला रोपवाटिका परवानाधारकांची एकदिवसीय कार्यशाळा नुकतीच पार पडली. नाशिकचे कृषी विकास अधिकारी संजय शेवाळे, वजनमापे निरीक्षक संजय वाघ, पंचायत समितीचे कृषी अधिकारी नंदकुमार अहिरे, इफको कंपनीचे प्रतिनिधी निमिश पवार, कृषी विस्तार अधिकारी मच्छिंद्र कांगणे, सुधाकर देशमुख, दीपाली मोकळ आदी यावेळी उपस्थित होते.

कृषीनिविष्ठा विक्रेत्यांनी बियाणे, खते, कीटकनाशके कायद्याचे तंतोतंत पालन करावे. खतांच्या टंचाईच्या काळात किंवा शेतकरी बांधव एकाच प्रकारच्या विशिष्ट खतांचाच आग्रह धरतात. अशावेळी विक्री केंद्रधारकांनी शेतकऱ्यांना संयुक्त खतांचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करावे. खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वीच कृषी केंद्रामध्ये सार्वजनिक व खासगी कंपन्यांच्या प्राप्त होणाऱ्या बियाणे, खते, कीटकनाशकांचे नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळेत चाचणीसाठी पाठविण्यात येणार असून, हे नमुने अप्रमाणित घोषित झाल्यास त्या नमुन्यांना विक्री बंद आदेश देण्यात येणार आहेत.

शेतकरी बांधवांना पेरणीसाठी दर्जेदार व गुणवत्तापूर्वक कृषीनिविष्ठा मिळणार असल्याचे संजय शेवाळे यांनी सांगितले.

खरीप हंगामाच्या तोंडावर परराज्यातील काही कंपन्या शेतकऱ्यांच्या बांधावर बोगस बियाणे, खते व कीटकनाशके विक्री करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. तसेच कृषी सेवा केंद्रामध्ये शेतकरी बांधवांसाठी विक्रीस उपलब्ध झालेला युरिया औद्योगिकीकरणासाठी वापरला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. असे प्रकार आढळल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश नाशिकचे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी दिले.

नंदकुमार अहिरे यांनी शेतकरी बांधवांना कृषीनिविष्ठांची विक्री करताना विक्रेत्यांनी काय काळजी घ्यावी, जादा दराने विक्री न करणे, लिंकिंग न करणे, विक्री केंद्रात खते शिल्लक असूनही खते न देणे, विक्री परवाना व भावफलक सहज दिसेल अशा दर्शनी भागात लावणे, खतांची विक्री ई-पॉस मशीनव्दारेच करणे, शेतकरी बांधवांना खरेदीची परिपूर्ण बिले देणे, फिरत्या गाडीतून अनधिकृत निविष्ठा खरेदी न करणे तसे आढळल्यास कृषी विभागाच्या निदर्शनास आणून देणे, शासनाने युरिया खताच्या संतुलित वापर होण्याच्या दृष्टीने १० टक्के युरिया खताची बचत करण्यासाठी नॅनो युरिया व नॅनो डीएपी या विद्राव्य खताचा नव्याने समावेश केलेला असून, त्याबाबत शेतकरी बांधवांमध्ये प्रचार व प्रसिद्धी करण्याबाबत मार्गदर्शन केले.

शेतकरी बांधवांनी अधिकृत परवानाधारकांकडूनच कृषीनिविष्ठा खरेदी करावीत. निविष्ठा खरेदी करताना पक्के बिल घेणे आवश्यक असून, आपण खरेदी केलेले बियाणे त्याच कंपनीचे, त्याच वाणाचे, त्याच हंगामासाठी शिफारस केलेले आहे काय, तपासणीचा दिनांक व अंतिम दिनांक बरोबर आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे, जेणेकरून आपली फसवणूक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, सेंद्रिय शेती व इतर कृषीविषयक उपयुक्त माहिती शेतकरी बांधवांना अत्यंत उपयोगी व मोफत कृषिक ॲप डाऊनलोड करून देण्याबाबत कृषी विस्तार अधिकारी मच्छिंद्र कांगणे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी सिन्नर तालुका ॲग्रो डीलर्सचे अध्यक्ष अनिल शेळके, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर नागरे, सरचिटणीस अंबादास वाघ, रामदास भाबड, सहचिटणीस व्दारकानाथ कोकाटे यांनी खरीप हंगामात शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही व कृषी विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन उपस्थित विक्रेत्यांना केले.

### नर्सरीधारकांना विक्री परवाना बंधनकारक

भाजीपाल्याची रोपे विक्री करण्यासाठी शासनाने नर्सरीधारकांना विक्री परवाना बंधनकारक केलेला असून, परवाना घेतल्याशिवाय भाजीपाला रोपांची खरेदी-विक्री करू नये. अधिकृत परवानाधारकांकडूनच शेतकरी बांधवांनी भाजीपाला रोपे खरेदी करावीत व रोपे खरेदीची परिपूर्ण पावती देणे आवश्यक आहे. कारण रोपांच्या गुणवत्तेबाबतच्या तक्रारी वाढत असल्याने नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांना खरेदीच्या बिलाच्या अनुषंगाने कृषी विभागाकडे तक्रार करून नुकसानभरपाईसाठी ग्राहक मंचाकडे दाद मागता येते.

### बोगस बियाणे, कृषीनिविष्ठांची विक्री नको

सोयाबीन बियाण्याची खरेदी करण्यासाठी आलेल्या शेतकरी बांधवांना घरचे बियाणे वापराबाबत तसेच सोयाबीन बियाण्याची विक्री केंद्रात ट्रेमध्ये उगवण क्षमता चाचणी करूनच बियाण्याची विक्री केली तर उगवणक्षमतेच्या तक्रारी होणार नाहीत. बंदी असलेल्या किंवा मुदतबाह्य झालेल्या कृषिनिविष्ठांची विक्री न करणे, कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांपर्यंत बोगस बियाणे, खते व कीटकनाशके पोहचणार किंवा विक्री होणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना यावेळी करण्यात आल्या. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या स्वर्गीय गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजनेची प्रचार-प्रसिद्धी करण्याचे आवाहन करण्यात आले.

# बारामती बँकेच्या सिन्नर शाखेचा ग्राहक मेळावा उत्साहात

**सिन्नर : प्रतिनिधी**

दि बारामती सहकारी बँकेच्या सिन्नर शाखेने आपल्या यशस्वी वाटचालीचा आठवा वर्धापन दिन व ग्राहक आभार मेळावा शाखेचे पालक संचालक नामदेवराव तुपे व देवेंद्र शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. २८) सांगळे कॉम्प्लेक्स, सिन्नर येथे मोठ्या उत्साहात साजरा केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्रीमंत बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन नारायणशेठ वाजे होते.

व्यासपीठावर खासदार राजाभाऊ वाजे, उदय सांगळे, सहनिबंधक गिते, देवनदी खोरे पतसंस्थेचे चेअरमन एस. एम. पवार, समृद्धी पतसंस्थेचे अध्यक्ष कन्हय्यालाल भूतडा, विघ्नहर्ता पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ. विष्णू अत्रे, श्रायबर डायनामिक्स डेअरीचे समूह सल्लागार डॉ.



पतसंस्था संघटनेचे अध्यक्ष नारायण वाजे यांचा सत्कार करतांना संचालक नामदेवराव तुपे, समवेत देवेंद्र शिर्के, डॉ अत्रे, एस एस पवार आदी.

गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी बँकेच्या शाखेच्या कारभाराबद्दल व प्रगतीबद्दल सर्व मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. शाखेच्या ग्राहकाभिमुख सेवा, पारदर्शक व्यवहार आणि सामाजिक बांधिलकीचे सर्वत्र कौतुक झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ जगताप यांनी ओघवत्या शैलीत केले. शैलेश गलांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत सिन्नर शाखेच्या यशाचा आढावा घेतला, तर विक्रम कासट यांनी आभार मानले. यावेळी दूध डेअरी मालक, दूध उत्पादक सभासद, खातेदार, कर्जदार तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. शाखेने आपल्या सेवेमध्ये सातत्याने गुणवत्ता टिकवून ठेवण्याचा व ग्राहकांचा विश्वास दृढ करण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी बँकेतील कर्मचारी उपस्थित होते.

# वीजग्राहकांना टीओडी मीटरची सक्ती!

**नाशिक : प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने घरगुती ग्राहकांकडे स्मार्ट प्रीपेड मीटर लावणार नसल्याची घोषणा केली होती, परंतु आता महावितरणकडून स्मार्ट मीटरचे नाव टीओडी (टाइम ऑफ डे) असे बदलून सर्व ग्राहकांकडे सक्तीने लावण्याचे प्रयत्न केले जात आहेत. महावितरणकडून सध्या घरोघरी जाऊन स्मार्ट मीटर लावले जात आहेत. यासंदर्भात ग्राहकांनी महावितरणकडे मीटर लावण्याचे काम दिलेल्या संबंधित एजन्सीचे नाव, तिला सोपवलेली कामे, मीटर बदलण्याची कार्यपद्धती, ग्राहकाला पूर्वसूचना न देता परस्पर मीटर बदलण्याचे अधिकार असल्यास संबंधित पत्राची प्रत, एजन्सीच्या माणसांना महावितरणने ओळखपत्र पुरवले असल्यास त्याची माहिती, नियमांची प्रत, मीटर सक्तीने बदलवण्याचे आदेश असल्यास शासन आदेशाची प्रत आदी मागणी करावी. या स्मार्ट मीटरविरोधात लेखी तक्रार करावी, असे आवाहन




नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष सुरेश पाटील यांनी केले आहे.

पाटील म्हणाले की, महावितरण हे स्मार्ट मीटर लावण्याबाबत लेखी आदेश काढायला घाबरत आहे. सध्याचे इलेक्ट्रॉनिक्स मीटर सुस्थितीत असताना स्मार्ट मीटर बसविण्याचा महावितरणचा अट्टहास का? वीज कायदा २००३ कलम ५५ नुसार ग्राहकांना वीजमीटर निवडीचे स्वातंत्र्य आहे. तरीही अघोषित सक्ती करून प्रीपेड मीटर लावण्याचे बंधन असल्याचे चित्र वीज कंपनीकडून निर्माण केले जात आहे. राज्यातील अनेक भागांतून महावितरणच्या स्थानिक कार्यालयाकडे स्मार्ट मीटर नको असल्याचे अर्ज ग्राहकांकडून दिले जात आहेत. कारण या मीटरचा इतर राज्यांतील अनुभव वाईट आहे. प्रीपेड मीटर जर रिचार्ज करण्यास उशीर झाला तर त्याच्याकडील वीजपुरवठा बंद होतो. त्यामुळे वीजग्राहक त्रस्त झाले आहेत. हरियाणामध्ये गेली तीन वर्षे सातत्याने या मीटरला विरोध होत आहे आणि त्याचे कारण बिल जादा येते. योग्य येत नाही. रकमेची कपात मोठ्या प्रमाणात होते. उत्तर प्रदेशमध्ये मीटर जम्पिंग होण्याचे प्रकार प्रचंड प्रमाणात वाढलेले आहेत. सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्यूटने पाहणी व तपासणी केल्यानंतरही अजून तक्रारी होत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य वीजग्राहकांनी या स्मार्ट प्रीपेड मीटरला विरोध करावा, असे आवाहन सुरेश पाटील यांच्यासह सचिव विलास देवळे, अनिल नांदोडे, कृष्णा गडकरी, सुभाष तिडके यांनी पत्रकाद्वारे केले आहे.




# सुसंस्कृत माणूस घडण्यासाठी वाचन चळवळ वृद्धिंगत करणे आवश्यक

## सिन्नरला कामगार कल्याण मंडळाच्या ग्रंथालयाचे उद्‌घाटन

**सिन्नर : प्रतिनिधी**

ग्रंथालये ही आधुनिक मंदिरे आहेत. सुसंस्कृत माणूस घडण्यासाठी ग्रंथालय आणि वाचन चळवळ वृद्धिंगत करणे नितांत गरजेचे आहे, असे प्रतिपादन कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले.

सिन्नर येथील कामगार कल्याण मंडळ येथे ग्रंथालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. कामगारांच्या कल्याणासाठी कामगार मंडळ अनेक काही उपक्रम राबवत असते, त्यातीलच ग्रंथालय हा एक उपक्रम, कामगारांना व त्यांच्या मुलांचे अवांतर वाचन वाढावे, या उद्देशाने या ग्रंथालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. शिक्षण हे माणसाला स्वतःचे अस्तित्व ओळखायला शिकवते आणि त्याला समाजातील बदल घडवण्यास सक्षम करते. या पुस्तकांचा उपयोग सर्व कामगारांनी करावा, असे विचार त्यांनी मांडले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सिन्नर शाखेचे अध्यक्ष प्रा. राजाराम मुंगसे यांच्या हस्ते ग्रंथालयाचे उद्‌घाटन करण्यात आले. ग्रंथालयात जवळपास एक हजार पुस्तके उपलब्ध आहेत. सुजाता गळवे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला सक्षमीकरण व सबलीकरण यावर डॉ. वैष्णवी नेहे यांचे विशेष व्याख्यानही यावेळी आयोजित केले होते. महिलांना सॅनिटरी पॅडचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमास महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या सहायक कल्याण आयुक्त भावना बच्छाव, केंद्र संचालक विनोद पाटील, विजय पाटील, कविता कासार, अनिता भगत आदींसह अनेक अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. राजाराम मुंगसे, मनीषा उगले, किरण भावसार, हरिभाऊ तांबे, रवींद्र गिरी, भारत मांडे, गणेश तांबोळी, प्रा. जावेद शेख, शाहीर स्वप्नील डुंबरे, देव थोरात, बाबासाहेब भोरकडे, मोहन वाघचौरे, वृक्षमित्र विष्णू वाघ, सुनीता वाळूंज, जालिंदर डावरे, उत्तम खताळे, जयश्री चव्हाणके उपस्थित होते.

# पांढुर्ली आरोग्य केंद्रात सतर्क अभियानाचा शुभारंभ

## मुख्य कार्यकारी अधिकारी मित्तल यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उद्‌घाटन

**सिन्नर : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा परिषद आरोग्य विभाग, इंडियन कॅन्सर सोसायटी आणि एसएमबीटी मेडिकल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील पांढुर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रात शुक्रवारी (दि.२) सतर्क अभियानांतर्गत गर्भाशय मुख, स्तन कर्करोग, तोंडाचा कर्करोग आदींचे तपासणी शिबिर घेण्यात आले. नाशिक जिल्ह्यातील या पहिल्यावहिल्या पांढुर्ली येथील सतर्क अभियानाचा शुभारंभ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी असीमा मित्तल, जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. सुधाकर मोरे यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी मित्तल यांनी या अभियानास शुभेच्छा देत तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या टीमचे अभिनंदन केले.



### ११५ रुग्णांची शिबिरात मोफत कर्करोग तपासणी

शिबिरात प्रामुख्याने ३० ते ६५ वर्षे वयोगटातील ७३ महिलांची गर्भाशय व स्तन कर्करोग तपासणी करण्यात आली. ४२ रुग्णांची तोंडाचा कर्करोग तपासणी करण्यात आली. यावेळी उपस्थित महिलांना आरोग्य मार्गदर्शन करण्यात आले. तपासणी अहवालानंतर येणाऱ्या निष्कर्षानंतर रुग्णांचा पुढील पाठपुरावा प्राथमिक आरोग्य केंद्र पांढुर्ली व एसएमबीटीमार्फत केला जाणार आहे.

यावेळी एसएमबीटी कॉलेजच्या डीन डॉ. मीनल मोहगावकर यांनी स्त्रियांमधील एचपीव्ही व्हॅक्सिनेशन काळाची गरज याबद्दल मार्गदर्शन केले. तर इंडियन कॅन्सर सोसायटीचे प्रमुख डॉ. प्रसाद राणे यांनी ग्रामीण भागातील कॅन्सर अर्ली डटेक्शनमध्ये सदर शिबिरांचे महत्त्व व इंडियन कॅन्सर सोसायटीचे योगदान विशद केले. प्रिव्हेंटिव्ह ऑन्कॉलॉजी विभागप्रमुख डॉ. अश्विनी देशमुख यांनी सदर शिबिरात एचपीव्ही डीएनए, लिक्विड बेस्ड सायटॉलॉजी, व्हीआयए व इतर आवश्यक चाचण्या मोफत करण्यात येत असल्याने ३० ते ६५ वयोगटातील महिलांनी आवर्जून पुढे येऊन सदर तपासण्या कराव्यात, असे आवाहन केले. एसएमबीटीचे सीईओ सचिन बोरसे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दीपक लोणे, सिन्नर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन बच्छाव, प्राथमिक आरोग्य केंद्र पांढुर्लीचे वैद्यकीय अधिकारी डॉ. लहू पाटील, डॉ. नीलेश बेडीस्कर आदींसह आरोग्य कर्मचारी, गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविका उपस्थित होत्या.

# वडांगळी ग्रामपंचायतीत कर्मचाऱ्याच्या हस्ते ध्वजारोहण

**सिन्नर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त वडांगळी ग्रामपंचायत येथील ध्वजारोहण ग्रामपंचायत कर्मचारी सुरेश कहांडळ यांच्या हस्ते करण्यात आले. सरपंच नानासाहेब खुळे यांच्या पुढाकारातून गावात प्रथमच ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

ग्रामपंचायत अधिकारी योगेश चित्ते, कर्मचारी सुखदेव आढांगळे, संजय आढांगळे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. पाणीपुरवठा कर्मचारी अमोल आढांगळे यांच्या हस्ते ध्वजपूजन करण्यात आले. त्यानंतर सुरेश कहांडळ यांनी ध्वजारोहण केले. कहांडळ यांनी नालेसफाई व स्वच्छता कर्मचारी म्हणून ग्रामपंचायतीमध्ये कामास सुरुवात केली होती. त्यामुळे सर्वसामान्य कर्मचाऱ्यास ध्वजारोहणाचा मान मिळाल्याने या गोष्टीचे कौतुक



होत आहे. तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष सुदेश खुळे, उपसरपंच अनिता क्षत्रिय, राहुल खुळे, रमेश खुळे, विक्रम खुळे, अमित भावसार, रवी माळी, सचिन कुलथे, विकास सोसायटीचे अध्यक्ष रामनाथ खुळे, गणेश कडवे, उत्तम खुळे, राम कांदळकर, दिनकर खुळे, प्राचार्य बाळासाहेब खैरनार आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



▶▶ सर्वधर्मसमभाव हो, सबका हो सन्मान!
▶▶ पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक
# गांवकरी



▶▶ बाभूळगावच्या तलावात गेलेल्या जमिनीचा मोबदला द्या ▶▶ पान २

■ gavakari.in ■ gavkarinews.com
■ नाशिक, शनिवार, दि. ३ मे २०२५

## महत्त्वाचे



### जातनिहाय जनगणनेबद्दल नाशिक रोड येथे जल्लोष

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणना करण्यास मंजुरी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अभिनंदन करण्यात आले. भारतीय जनता पार्टी नाशिक रोड मंडलातर्फे बिटको पॉइंट येथे जल्लोष करण्यात आला. यावेळी लाडू वाटप केले. याप्रसंगी नाशिक रोड मंडल अध्यक्ष शांताराम घंटे, सुनील आडके, संभाजीर मोरुस्कर, अंबादास पगारे, गजानन तितरे, राजेंद्र मोरे, माधुरी पालवे, सुजाता जोशी, सुरेखा निकम, ज्योती चव्हाणके, राम डोबे, योगेश कपिले, किरण पगारे, निवृत्ती भोर, अशोक गवळी, विशाल पगार, केतन बोराडे, समाधान सांगळे, शंकर साडे, संदीप शिरोळे, महेंद्र अहिरे, राजू बोराडे, किरण मेड, किसन सोनवणे, हेमंत नारद, गौरव विसपुते, कांतिलाल बोराडे, महेंद्र पोरजे, भूषण शहाणे, दीपक जाधव, हर्षल आहेर, सचिन शेजवळ, विनोद नाजरे, सतीश निकम, विलास मुळाणे, नितीन चव्हाण, के. मंगेश, रोजेकर, प्रदीप जाचक, उमेश श्रीवास्तव आदींसह मंडल पदाधिकारी उपस्थित होते.

### जिल्ह्याला पावसाचा आजपासून चार दिवस यलो अलर्ट

**नाशिक :** जिल्ह्यात तापमानाने नागरिक हैराण झालेले असतानाच आता पुढील चार दिवस अवकाळी पाऊस बरसणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. नाशिक शहरासह जिल्ह्यातील घाटांच्या परिसरातील काही भागांत विजांच्या कडकडाटासह मध्यम व तुरळक पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जना होण्याची व सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. शनिवार, दि. ३ मे ते मंगळवार, दि. ६ मे या कालावधीत हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. उत्तरेकडून येणारे वारे हे उत्तर ते दक्षिण असून, त्यामुळे आर्द्रता वाढली आहे. त्यामुळे पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. हवामान विभागाने नागरिकांनी बदलत्या हवामानाचा विचार करून काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. पावसाचा प्रभाव काही दिवस राहिल्यानंतर पुन्हा राज्यात उष्णतेची लाट जाणवण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी योग्य ती काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### क्रिकेट संघटनेसाठी आज मतदान

**नाशिक :** जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या सन २०२५ ते २०२८ या कालावधीसाठी निवडणूक ३ मे रोजी होत आहे. विद्यमान चेअरमन धनपाल शहा यांच्या नेतृत्वाखालील खेळाडू पॅनलचे एकूण सात पदाधिकारी- १ सेक्रेटरी, १ खजिनदार, २ जॉइंट सेक्रेटरी व ३ निवड समिती सदस्य बिनविरोध निवडून आले आहेत. आता चेअरमनपदासाठी दोन, खेळाडू पॅनल व वैयक्तिक उमेदवार व कार्यकारिणी सदस्य १० पदांसाठी १३ उमेदवार रिंगणात आहेत. मतदान दिनांक ३ मे रोजी अन्नपूर्णा सभागृह, नंदनवन लॉन्स, मते नर्सरी रोड, सावरकरनगर, गंगापूर रोड, नाशिक येथे सकाळी ८.३० ते ५.०० वा. पर्यंत होईल. नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे एकूण ३११२ आजीव सभासद व संलग्न एकूण ७६ क्लब सभासद आहेत. मनीष लोणारी आणि असोसिएट्स यांनी यंदाची निवडणूक मतदान यंत्राद्वारे होत असल्याचे सांगितले.

# साधुग्राममधील जमिनीसाठी मनपाचा शासनाला प्रस्ताव

## मोबदला, टीडीआरसाठी ४५-५५ चा फॉर्म्युला

**नाशिक : प्रतिनिधी**

**आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने महापालिका प्रशासनाने या जागेच्या अधिग्रहणासाठी शासनाला ४५-५५ टक्के असा फॉर्म्युला सादर केला आहे. तपोवन परिसरातील साधुग्राममधील साडेतीनशे एकरपैकी २७० एकर जागेचे अधिग्रहण बाकी आहे. त्यासाठी शासनाला महापालिकेने प्रस्ताव दिला आहे. त्यात आरक्षित जागेसाठी शेतकऱ्यांना रोख मोबदला व टीडीआरसाठी ४५ किंवा ५५ जी टक्केवारी देता येईल त्याप्रमाणे द्यावी, असे म्हटले आहे. शासनाकडून यावर निर्णय कधी घेतला जाणार, याकडे महापालिका प्रशासनाचे लक्ष लागले आहे.**

शहरात दोन वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा होत असून, सध्या महापालिका प्रशासनाकडे साडेतीनशे एकर जागा वगळता अतिरिक्त जागा नाही. काही दिवसांपूर्वी सिंहस्थ कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी सिंहस्थासाठी पाचशे एकर जमीन अधिग्रहण करणार असल्याचे म्हटले होते. मात्र, प्रत्यक्षात एवढ्या मोठ्या प्रमाणात जागा तपोवन परिसरात कुठे आहे, असा सवाल केला जातो आहे. भाडेतत्त्वावर जागा शोधण्याचा प्रयत्न केला जातो आहे. महापालिका प्रशासनाने यापूर्वी सिंहस्थासाठी आरक्षण टाकलेल्या तब्बल २७० एकर जागेचा मोबदला शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्यामुळे रोख मोबदला घेण्यासाठी शेतकरी चांगलेच आक्रमक झाले आहेत. महापालिका प्रशासनाने तपोवनमधील जागेवर आरक्षण टाकून शेतकऱ्यांना त्या मोबदल्यात भाडे अदा करण्यात आले, परंतु या जागेचे कायमस्वरूपी अधिग्रहण व्हावे, याकरिता महापालिका प्रशासनाकडून या विषयाला आता चाल दिली आहे. आता शासनाच्या निर्णयाकडे लक्ष लागले असून, सिंहस्थासाठी दोन वर्षांचा कालावधी राहिलेला आहे.

### ...अन्यथा आरक्षणच रद्द होणार

महापालिका प्रशासनाकडून दर वीस वर्षांनी डीपीआर आराखडा सादर केला जातो. एखाद्या जमिनीवर आरक्षण टाकलेले असेल. मात्र, दहा वर्षांत तेथे कुठलीही कार्यवाही झाली नाही, तर त्या जागेवर टाकलेले आरक्षण आपोआप रद्द होते. मनपाने साधुग्राममध्ये साडेतीनशे एकरवर आरक्षण टाकले आहे. त्यांपैकी तब्बल २७० एकर जागेचे अधिग्रहण बाकी असून, याप्रकरणी झटपट निर्णय अपेक्षित आहे.

# शिवपुत्र संभाजी महानाट्याचे नाशकातील सर्व प्रयोग रद्द

## पहलगामविषयी डॉ. कोल्हेंच्या वक्तव्याने आयोजकांची माघार

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरात होणाऱ्या शिवपुत्र संभाजी महानाट्याचे ५ मेपर्यंत होणारे सर्व प्रयोग रद्द करण्यात आले आहेत. अमोल कोल्हे यांनी पहलगाम हल्ल्याबाबत केलेल्या पोस्टनंतर कोल्हे हे ट्रोल झाले होते. त्यानंतर आयोजक गोपाळ पाटील यांनी महानाट्याच्या आयोजनातून माघार घेत असल्याचे सांगितले.

डॉ. कोल्हे हे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार, तर आयोजक पाटील हे भाजपाचे पदाधिकारी असल्याने सोशल मीडियावरील ट्रोलिंगमुळे पाटील यांनी माघार घेतल्याची चर्चा आहे.

नाशिकमध्ये भाजप नेते पाटील यांनी शिवपुत्र संभाजी महानाट्याचे आयोजन केले होते. त्यासाठी दीड महिन्यापासून तयारी सुरू होती. मात्र, प्रयोगाच्या एक दिवस आधी त्यांनी आयोजनातून अंग काढून घेतले. कोल्हे यांनी संसदेत वक्फ कायद्यावर केलेली भूमिका आणि पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्याबाबत केलेली एक पोस्ट वादग्रस्त ठरली. यामुळे कोल्हे यांच्यावर ट्रोलिंग सुरू झाले होते.

ऐनवेळी आयोजक संस्थेने अंग काढून घेतल्याने महानाट्याचे प्रयोग रद्द करण्याची नामुष्की ओढावली होती. महानाट्याचे प्रयोग रद्द झाल्याचे समजल्यानंतर अनोळखी व्यक्तींनी मदतीविषयी विचारणा केल्याचे कोल्हे यांनी सांगितले. तिकिटाचे दर कमी करून एक मेपासून प्रयोग करण्याचे प्रयत्न झाले. मात्र, त्यास यश आले नाही. त्यामुळे महानाट्याचे सर्वच प्रयोग रद्द करण्यात आले आहेत.



"वारंवार विनवणी करूनही डॉ. कोल्हे हे आपल्या राजकीय भूमिकेवर ठाम राहिले. त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याबाबत केलेल्या विखारी पोस्टमुळे आम्ही व्यथित झालो. त्यामुळे महानाट्याच्या आयोजनातून माघार घेत आहोत.

– **गोपाळ पाटील**, आयोजक तथा भाजप नेते



"मी शिवपुत्र संभाजी महानाट्याच्या प्रांगणात येतो तेव्हा कोणताही राजकीय मुखवटा नसतो. दहशतवादी हल्ल्यानंतर पंतप्रधान मोदींमागे विरोधी पक्ष ठामपणे उभा आहे. पाकिस्तानला धडा शिकवावा ही सर्वांचीच भावना आहे. त्यादृष्टीने हिंदू-मुस्लिम असा भेद न करता सर्वांनी एकजुटीने देशाच्या पाठीशी उभे राहावे, या भूमिकेतून आपण पोस्ट केली होती. महानाट्यावर त्याचा परिणाम होणे गैर आहे.

– **डॉ. अमोल कोल्हे**, खासदार

# सामान्यांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्या

## केंद्रीय मंत्री जाधव : आरोग्य अभियान आढावा बैठक

**नाशिक : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जनतेला प्रभावी, सहज साध्य व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी राज्यात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान राबविले जाते. या अभियानांतर्गत आरोग्यविषयक योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून सामान्य नागरिकांना उत्तम दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याणमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिले.

शासकीय विश्रामगृहात राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आढावा बैठकीत ते बोलत होते. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे मुंबई येथील अधीक्षक अभियंता देवेंद्र पवार, नाशिकचे उपअभियंता भूषण देसले, बुलढाणा येथील उपअभियंता अभिषेक जवकार उपस्थित होते.



मंत्री जाधव यांनी यावेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान, पीएम-आयुष्यमान भारत, आरोग्य पायाभूत सुविधा अभियान, आयुष योजना, १५ व्या वित्त आयोगांतर्गत करण्यात आलेली कामे, प्रस्तावित कामे व प्रलंबित असलेली कामे यांचा आढावा घेतला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत कार्यक्रम अंमलबजावणी योजनेत मंजूर असलेल्या कामांची वर्षनिहाय प्राधान्यक्रमानुसार यादी सादर करावी, अशा सूचना मंत्री जाधव यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

प्राथमिक आरोग्य केंद्रांचे बांधकाम गुणवत्तापूर्ण व उत्तम दर्जाचे होण्यासाठी प्रामुख्याने भर द्यावा. १५ व्या वित्त आयोगांतर्गत आरोग्यविषयक विविध चाचण्या करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या प्रयोगशाळा या पूर्णक्षमतेने सुरू कराव्यात. राज्यात ज्या ठिकाणी आरोग्यविषयक सेवा देणारे दवाखाने व प्रयोगशाळा इमारतींची कामे सुरू आहेत, त्यांची अंदाजपत्रकासह नमूद केलेल्या बाबींसह तपासणी करण्यात येणार आहे, असेही मंत्री जाधव यांनी सांगितले.



कॉसमॉस बँकेच्या वर्धापन दिनाप्रसंगी उपस्थित प्रवीणकुमार गांधी, दिलीप फडके, गणेश भोरे, वंदनराव पोतनीस, अविनाश चव्हाण आदी.

# शहरातील उद्योगांना पतपुरवठा करण्यास कॉसमॉस बँक सज्ज : गांधी

## नाशिक शाखांचा वर्धापन दिन

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेच्या नाशिक शहरातील बनकर चौक, नाशिक रोड व रविवार कारंजा या तीन शाखांचा वर्धापन दिन मान्यवरांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे बँकेचे संचालक तथा सनदी लेखापाल प्रवीणकुमार गांधी यांच्या हस्ते रविवार कारंजा शाखेत गणपतीपूजन व आरती करण्यात आली. श्री. गांधी यांनी, बँकेच्या वाटचालीवर प्रकाश टाकला. शहरातील लघु व मध्यम उद्योगांना पतपुरवठा करण्याची आमची इच्छा असून, त्या दिशेने आम्ही काम करू, असे त्यांनी सांगितले. यावेळी सावाना व नाशिक एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिलीप फडके, दैनिक गांवकरीचे संपादक वंदनराव पोतनीस, बँकेचे महाव्यवस्थापक अविनाश चव्हाण, मुख्य व्यवस्थापक केतकी विसपुते, व्यवस्थापक दीपक आळंदकर, अवधूत स्वामी नागरी पतसंस्थेचे संचालक गणेश भोरे, जनकल्याण नागरी पतसंस्थेचे सुनील खोडके, परशुराम नागरी पतसंस्थेचे प्रकाश कुलकर्णी व बँकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# सफाई ठेका रद्दसाठी महिलांचे मनपात आंदोलन; सुरक्षारक्षकांशी वाद

**नाशिक : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून सफाई ठेक्याचा वाद पेटला आहे. सफाई कर्मचारी विकास युनियनने मनपा आयुक्तांच्या दालनासमोर थेट आयुक्तांविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. परिस्थिती आणखी बिघडू नये म्हणून पोलिसांना पाचारण करण्यात आले होते.

दरम्यान, शुक्रवारी (दि.२) सफाई ठेका रद्द करावा, या मागणीसाठी महिलांनी महापालिकेसमोर जोरदार आंदोलन केले. दरम्यान, प्रवेशद्वारावर महिलांना सुरक्षारक्षकांनी अडवल्याने महिलांचा सुरक्षारक्षकांशी वाद झाला. यावेळी महिलांच्या शिष्टमंडळाने अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांना निवेदन देऊन मैला फेको आंदोलन करू, असा इशारा दिला.

निवेदनात म्हटले की, नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा सन २०२७ मध्ये होणार आहे. सिंहस्थाच्या नावाखाली तसेच साफसफाईच्या नावाखाली चुकीच्या पद्धतीने नियमबाह्य बेकायदेशीर, अटी-शर्ती, नियमाचा भंग करून ठेकेदाराच्या लाभासाठी व फायद्यासाठी ठेका देण्याचा प्रयत्न आपल्याकडून चालविलेला दिसतो. साफसफाई ठेकेदारीस वंशपरंपरागत सफाईपेशा करणाऱ्या लोकांचा व सफाई कामगारांचा तीव्र विरोध असून, यामुळे व्यवसाय हिरावून जाऊन आमच्या समाज व समाजातील बेरोजगार देशोधडीला लागले आहेत. नाशिक ग्रामपालिकेपासून ते नगरपालिका व महापालिकेपर्यंत वाल्मीकी, मेघवाळ, मेहतर समाज हा डोक्यावरून मैला वाहणे, मैला साफ करणे, मैला बैठका उचलणे, सार्वजनिक शौचालय साफ करणे, हा या समाजाचा मुख्य व्यवसाय आहे. परंतु, नाशिक महापालिका बेकायदेशीर ठेकेदारी करून अन्याय करीत आहे. त्यामुळे आंदोलन करून या गंभीर विषयाकडे लक्ष वेधले.

यावेळी सुरेश मारू यांच्यासह खिमिबेन परमार, अनिता राठोड, यमुना बारिया, तेजू खेर, नीता सोळंकी, ऊर्मिला जाधव, लता पडाया, सुनीता चव्हाण, रीना चव्हाण आदी उपस्थित होत्या.



### महिलांना प्रवेशद्वारावर अडवले

सुरक्षारक्षकांनी आंदोलनासाठी आलेल्या महिलांना रोखल्याने काही काळ तणावाची परिस्थिती निर्माण झाल्याचे चित्र होते.

### नाशिकच्या काही भागात आज वीजपुरवठा बंद

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील काही भागांचा वीजपुरवठा आज शनिवारी बंद राहणार आहे. शालिमार उपकेंद्रातील ११ केव्ही राजेबहादूर वाहिनीवरील विद्युत पुरवठा देखभाल-दुरुस्तीच्या कामासाठी शनिवारी सकाळी ९ ते ३ बंद राहील. यामध्ये एमजी रोड, मेन रोड, चित्रमंदिर, राजेबहाद्दर लेन, नेहरू गार्डन परिसर, धुमाळ पॉइंट, रेडक्रॉस, घनकर लेन परिसरात बंद राहील.

# 'आदिवासी विकास'च्या शिरपेचात मानाचा तुरा

## मुख्यमंत्री १०० दिवस मोहिमेत राज्यात तिसरा क्रमांक

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाच्या आयुक्त लीना बनसोड यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विकास आयुक्तालयाची घोडदौड सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या महत्त्वाकांक्षी १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेच्या कार्यालयीन मूल्यमापनात आदिवासी विकास आयुक्तालयाने ७२.५७ टक्के गुणांसह राज्यात तिसरे स्थान पटकाविले आहे. त्यामुळे आदिवासी विकास आयुक्तालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.



आदिवासी विकास आयुक्तालयाच्या विविध ३५ मुद्द्यांची पडताळणी 'क्यूसीआय'च्या त्रिसदस्यीय समितीने केली. त्यापैकी २२ मुद्द्यांची कार्यवाही पूर्ण झाल्याचे तर १३ मुद्द्यांची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याचे समितीला आढळून आले. समितीने सर्व प्रकारचे निकष तपासून आदिवासी विकास आयुक्तालयाला ७२.५७ टक्के गुण बहाल केले.

या गुणांच्या आधारे आयुक्तालयाने राज्यातील सर्व आयुक्तालये आणि संचालनालये यामध्ये तिसरा क्रमांक मिळविला. दरम्यान, येत्या बुधवारी (दि.७) मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पारितोषिक वितरण होणार आहे.

### ०.२९ गुणांनी हुकले दुसरे स्थान

१०० दिवस कार्यालयीन सुधारणाच्या विशेष मोहिमेच्या मूल्यमापनात तंत्रशिक्षण संचालनालयाने ७७.४३ टक्के गुणांसह अव्वल स्थान मिळविले. जमाबंदी आयुक्तालय ७२.८६ टक्के गुणांसह दुसऱ्या तर आदिवासी विकास आयुक्तालय ७२.५७ टक्के गुणांसह तिसऱ्या स्थानी राहिले. 'आदिवासी विकास'चे अवघ्या ०.२९ गुणांनी दुसरे स्थान हुकले.



"शासकीय कामात सुसूत्रता आणून लोकाभिमुख कामकाज करण्यासाठी १०० दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम मार्गदर्शक ठरणार आहे. यापुढेही शासकीय योजनांची अंमलबजावणी प्रभावी केली जाईल. तसेच या योजनेचा लाभ सुलभतेने सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्यात येईल.

–**लीना बनसोड**, आयुक्त, आदिवासी विकास विभाग

# नाशिक जिल्हा परिषद राज्यात तिसरी

## मुख्यमंत्री १०० दिवस कार्यमूल्यमापन कार्यक्रम

**नाशिक : प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमात नाशिक जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी या गटात राज्यात तिसरा क्रमांक मिळवला आहे. मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमाचा कार्यमूल्यमापन अहवाल महाराष्ट्र दिनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषित केला. यामध्ये नाशिक जिल्हा परिषदेने १०० पैकी ७५.४३ गुण मिळवत राज्यात तिसरा क्रमांक पटकावला आहे.**

राज्य शासनाने विविध निकषांवर जिल्हा परिषदांची मूल्यांकन प्रक्रिया राबवली होती. या मूल्यांकनात नाशिक जिल्हा परिषदेने संकेतस्थळ विकास, केंद्र शासनाशी सुसंवाद, स्वच्छता अभियान, तक्रार निवारण व्यवस्था, कार्यालयीन सुविधा, प्रशासकीय सुधारणा, अधिकारी-कर्मचारी प्रशिक्षण, आर्थिक प्रोत्साहन योजना, नावीन्यपूर्ण उपक्रम आणि कामकाजातील पारदर्शकता अशा १० प्रमुख बाबींमध्ये उल्लेखनीय प्रगती साधली आहे.



मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या नेतृत्वाखाली जिल्हा परिषदेने नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत 'लोकाभिमुख प्रशासन' या संकल्पनेला मूर्त स्वरूप दिले आहे. यामध्ये अनुकंपा ॲप, घरकुल योजना चाट बोट, आरबीएसटीएस प्रणाली, इंटेलिजंट वर्क मॅनेजमेंट सिस्टीम, अंगणवाड्यांचे १०० टक्के विद्युतीकरण, पेसा ॲप, बीआरसी कनेक्ट ॲप, जलजीवन मिशन तक्रार निवारण ॲप, ई सुनावणी, हजेरी प्रणाली या उल्लेखनीय नवकल्पनांचा समावेश केला आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या कामकाजात पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकांशी सुसंवाद वाढला आहे.



"मुख्यमंत्री १०० दिवस कार्यक्रमांतर्गत सर्व विभागप्रमुख व अधिकारी व कर्मचारी यांनी मेहनत घेतली. या एकत्रित प्रयत्नांचे हे फलित आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागासाठी लोककेंद्रित, पारदर्शक सेवा देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. हा सन्मान आम्हाला पुढील कामकाजासाठी निश्चितच बळ देणारा आहे.

– **आशिमा मित्तल**,
जि.प. सीईओ, नाशिक



भारताचा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर वज्रप्रहार पान ३

नाशिक आज

# गांवकरी


टोयोटातर्फे इनोव्हा हायक्रॉसची एक्सक्लुझिव्ह एडिशन लाँच पान ३

नाशिक, शनिवार, दि. ३ मे २०२५


# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध

## जलसंपदामंत्री महाजन : महाराष्ट्रदिनी ध्वजारोहण

**नाशिक : प्रतिनिधी**

**कुंभमेळा स्वच्छ व हरित होण्यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले.**



महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभ पोलिस संचलन मैदानावर पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, जिल्हाधिकारी जलज शर्मा, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, पोलिस अधीक्षक विक्रम देशमाने आदी उपस्थित होते.

यावेळी पोलिस दल, गृहरक्षक दल, राज्य उत्पादन शुल्क, अग्निशमन दल, नागरी संरक्षण दल, शहर पोलिस वाहतूक शाखेच्या तुकडीने संचलन करून ध्वजास मानवंदना दिली. यावेळी विविध पुरस्कार, तसेच प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

श्री.महाजन म्हणाले, की नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२६-२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सध्या नियोजन सुरू आहे. स्वच्छ आणि सुंदर, पर्यावरणपूरक कुंभमेळ्याच्या कामाला चालना देण्यात येईल. कुंभमेळ्यानिमित्त पायाभूत सोयी-सुविधांना प्राधान्य देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत. कुंभमेळ्याच्या नियोजनासाठी कोणत्याच गोष्टींची उणीव जाणवू देणार नाही, असे ते म्हणाले.

जिल्ह्यातील काही वाड्या, गावांना सध्या पाणीटंचाई जाणवत आहे. अशा ७८ वाड्या, गावांना टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. दहा गावांसाठी विहिरी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत.

जिल्ह्यात खरीप पीककर्ज वितरणाला सुरुवात झाली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून १५ हजार १४५ सभासदांना १४८ कोटींचे कर्ज वितरित करण्यात आले आहे. पावसाळा जवळ आला आहे. यामुळे कर्जवितरण प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ करिता सर्वसाधारण योजनेसाठी ९०० कोटी, आदिवासी उपयोजनेसाठी ४४३ कोटी रुपये, तर अनुसूचित जाती उपयोजनेसाठी १०१ कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर आहे.

पोलिस दलाने द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी आणि तक्रारींची तत्काळ दखल घेता यावी म्हणून बळीराजा सेल कार्यान्वित केला आहे. आतापर्यंत ९५८ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. पोलिस दलाने या शेतकऱ्यांना दोन कोटी ३३ लाख ४२ हजार रुपये परत मिळवून दिले आहेत, असेही त्यांनी सांगितले.

महिला सक्षमीकरणासाठी राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली. आपल्या नाशिक जिल्ह्यात १५ लाख ३५ हजार ४४७ महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. महिला, तरुणींना आत्मनिर्भर करणे आणि महिलांच्या सुरक्षित प्रवासासाठी नाशिक शहरात एक हजार महिलांना पिंक (गुलाबी) ई-रिक्षा योजनेच्या माध्यमातून लाभ मिळणार असल्याचे महाजन यांनी सांगितले.

यावेळी आमदार सीमा हिरे, महापालिका आयुक्त मनीषा खत्री, अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, सहाय्यक जिल्हाधिकारी ओमकार पवार, अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलावले, रवींद्र भारदे, शुभांगी भारदे यांच्यासह लोकप्रतिनिधी, विविध विभागांचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### जिल्हाधिकारी कार्यालयात ध्वजारोहण

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ६६ व्या स्थापना दिवसानिमित्त सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी अर्पित चौहान, अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ, उपजिल्हाधिकारी तुकाराम हुलावले, रवींद्र भारदे, शुभांगी भारदे, तहसीलदार गणेश जाधव, अपर तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते.



# योगविद्या भारतीय परंपरेचा एक भाग

## केंद्रीय मंत्री जाधव : गौरी पटांगणावर योग प्रात्यक्षिके

**नाशिक : प्रतिनिधी**

योगविद्या भारतीय परंपरेचा एक भाग आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परिश्रमातून योग जगासाठी अमूल्य भेट ठरला आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त होणाऱ्या कार्यक्रमांत जगभरातील विविध देशांतील नागरिक सहभागी होत आहेत. यामुळे जगातील नागरिकांसाठी योगविद्या आरोग्यदायी आधार ठरली आहे, असे प्रतिपादन केंद्रीय आयुष मंत्रालय व स्वास्थ आणि कल्याणमंत्री (स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव यांनी येथे केले.



केंद्रीय आयुष मंत्रालयातर्फे शुक्रवारी (दि.२) सकाळी गौरी पटांगण येथे आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

केंद्रीय मंत्री जाधव म्हणाले की, नाशिक शहर हे अध्यात्म आणि संस्कृतीचे केंद्र आहे. दर १२ वर्षांनी येथे कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. कुंभमेळा आस्था आणि परंपरेचा संगम आहे. त्याचप्रमाणे योगस्वास्थ्य, संस्कृती आणि एकतेचा संगम ठरेल. गोदावरीच्या काठावर योग दिनाचा कार्यक्रम होत आहे, ही समाधानाची बाब आहे. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी विविध कार्यक्रम होणार आहेत. त्याचाच एक भाग म्हणून हा कार्यक्रम होत आहे. योग दिनाच्या माध्यमातून 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना साकारली जात आहे. योग दिन हा एक आंतरराष्ट्रीय उत्सव झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

आयुष मंत्रालयाच्या संयुक्त सचिव डॉ. मोनालिसा दास यांनी प्रास्ताविक केले. यावेळी नागरिक उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी योगाची विविध प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी खासदार भास्कर भगरे, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे डॉ. काशीनाथ समगंडी, योगविद्या गुरुकुलाचे डॉ. विश्वास मंडलिक आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते योग संगम पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले.

### 'आदिवासी विकास'मध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त आदिवासी विकास भवन येथे आयुक्त लीना बनसोड यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मुंढेगाव शासकीय आश्रमशाळेच्या बँडपथकाने पथसंचलन करत मानवंदना दिली. ध्वजारोहण समारंभास सहआयुक्त भगवान जगदाळे, अपर आयुक्त




दिनकर पावरा, उपायुक्त संतोष ठुबे, विनिता सोनवणे, शशिकला अहिरराव, सहाय्यक आयुक्त अरुणकुमार जाधव, दिलीप खोकले, संतोष गायकवाड, मुख्याध्यापक तन्वीर जहांगीरदार यांच्यासह आदिवासी विकास आयुक्तालय, अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी कार्यालय, आदिवासी विकास महामंडळ, शबरी वित्त व विकास महामंडळ, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. आयुक्त बनसोड यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त शुभेच्छा देत मार्गदर्शन केले.

# जिल्ह्यात यंदा ३११ नवीन वाहनांची भर

## अक्षयतृतीयेला आरटीओला १२ कोटी ४५ लाखांचा महसूल प्राप्त

**पंचवटी : सुनील बुनगे**

**साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेला प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) सुमारे दोन हजार ३५५ नव्या वाहनांची नोंद झाली आहे. त्या माध्यमातून १२ कोटी ४५ लाख १० हजार ७८० रुपयांच्या महसुलाची आरटीओच्या तिजोरीत भर पडली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा ३११ वाहनांची वाढ झाली आहे.**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेला विविध प्रकारच्या वस्तू खरेदीला पसंती दिली जाते. त्यामुळे विविध प्रकारच्या वस्तूंच्या खरेदीच्या माध्यमातून कोट्यवधींची उलाढाल बाजारपेठेत होत असते. अनेक नागरिकांकडून नवीन वास्तू, व्यावसायिक गाळे, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, सोने-चांदी याबरोबर दुचाकी, चारचाकी वाहनांच्या खरेदीला पसंती दिली जाते. यामुळे बाजारपेठेतसुद्धा कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असते.

सण-उत्सवापूर्वी वाहनांचे बुकिंग केले जाते आणि मुहूर्त बघून वाहन घरी आणले जाते. त्यातच वर्षांचा पहिला सण अन् साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडवा सणाला नागरिकांनी नवीन वास्तू, सोने खरेदी आणि वाहनांना पसंती दिल्याचे दिसून आले आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालयात अक्षयतृतीयेला एकाच दिवसात दोन हजार ३५५ वाहनांची नोंद झाली आहे. ट्रॅक्टर (३३), रुग्णवाहिका (१), बस (१३७), डंपर (१४), व्यावसायिक वाहने (१०), हार्वेस्टर (मळणीयंत्र) (२५०) मोटारसायकल (१००३), मोपेड (३), मोटार कॅब (५३), चारचाकी (७८८), थ्री-व्हीलर मालवाहू (११), रिक्षा (२२), उत्खनन करणारी वाहने (९) यांसह कृषी, बांधकाम व्यवसायाला लागणाऱ्या एकूण दोन हजार ३५५ वाहनांची नोंद झाली आहे. सन २०२४ मध्ये अक्षयतृतीयेला दोन हजार ४४ वाहनांची नोंद झाली होती.

यंदा आरटीओकडे दोन हजार ३५५ वाहनांची नोंद झाली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत ३११ इतक्या वाहनांची वाढ झाली आहे. गतवर्षी आठ कोटी ९९ लाख ३८ हजार २२७ रुपये महसूल प्रादेशिक परिवहन कार्यालयाला मिळाला होता. त्या तुलनेत यावर्षी नवीन ३११ वाहनांची वाढ झाल्याने १२ कोटी ४५ लाख १० हजार ७८० रुपये महसूल मिळाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत तीन कोटी ४५ लाख ७२ हजार ५५३ रुपयांची वाढ झाली आहे.



### यावर्षी मालवाहू वाहनांमध्ये घट

गेल्या वर्षीच्या तुलनेत ट्रॅक्टर १४, बस १०, डंपर १०, चारचाकी २२७, हार्वेस्टर (मळणीयंत्र) २४९, मोटारसायकल, मोपेड १०७, थ्रीव्हीलर मालवाहू ९, मोटार कॅब सहा अशा प्रकारच्या वाहनांत वाढ झाली आहे. मालवाहू वाहनांमध्ये २६५ वाहनांची, तर रिक्षांची १६ ने घट झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत मोटारसायकल, मोपेड, चारचाकी, हार्वेस्टर यांची जास्त प्रमाणात विक्री झाली आहे. त्यामुळे महसुलातदेखील मोठी वाढ झाली आहे.

# नाशिक महापालिकेची १५ मेनंतर नालेसफाई

## ५० हजार मीटर लांबीचे नाले, १३ हजार चेंबरची सफाई

**नाशिक : प्रतिनिधी**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून शहरातील नालेसफाई केली जाते. यंदाही जूनपूर्वीच महापालिकेने नालेसफाई करण्याचे नियोजन केले आहे. १५ मेनंतर नालेसफाईला सुरुवात केली जाणार आहे. दरम्यान, शहरात एक लाख २१ हजार मीटर लांबीच्या पावसाळी नाल्यांपैकी ५० हजार ९६० मीटर लांबीचे नाले साफ करणे गरजेचे असतात. यासोबतच तीन लाख ६३ हजार मीटर लांबीचे पाइप असून, त्यावर १३,९४६ चेंबर आहेत. त्यांचीही कामे केली जाणार आहेत.

पावसाळ्यात रस्त्यांवर पाणी तुंबू नये, यासाठी महापालिकेकडून दरवर्षी पावसाळापूर्व कामे हाती घेतली जातात. एप्रिल व मे महिन्यात नैसर्गिक नाले, चेंबर्स, पावसाळी खुल्या गटाराची कामे विभागनिहाय ठेकेदारांमार्फत केली जातात. दरम्यान, यंदा निविदा प्रक्रिया न राबवताच जुन्याच ठेकेदारांकडून ही कामे केली जाणार आहेत. नाले, रस्ते आणि पावसाळी गटारातून पाण्याचा निचरा योग्य पद्धतीने झाला नाही तर रस्त्यावरच पाणी साचते. दरवर्षी मे महिन्यात ही कामे पूर्ण केली जातात. गेल्या काही वर्षांपासून शहरातील रस्त्यांवर पाणी साचत असल्याने रस्त्यांचे रूपांतर तळ्यात होत आहे. मुख्य परिसरात अनेकदा पाणी साचून वाहनधारकांना याचा मनस्ताप सहन करावा लागतो. पाणी साचल्यामुळे परिसरात दुर्गंधीयुक्त परिस्थिती निर्माण होते. शहरातील गोदावरी व नंदिनी नदीच्या परिसराचीदेखील सफाई केली जाते. द्वारका, मुंबई नाका, नाशिक रोड परिसरातील दत्त चौक, उपनगर, सिडको, सातपूर, पंचवटीतील काही भाग आदी भागांत पावसाचे पाणी साचत असते. मेअखेर नालेसफाई होणार असल्याचा दावा महापालिकेच्या बांधकाम विभागाने केला आहे.

## महत्त्वाचे



### ब्रह्माकुमारी वासंतीदीदी यांचा अभीष्टचिंतन सोहळा उत्साहात

**नाशिक :** येथील ब्रह्माकुमारी संस्थेच्या उपक्षेत्रिय मुख्य संचालिका ब्रह्माकुमारी वासंतीदीदी यांचा अभीष्टचिंतन सोहळा सुचितानगर येथील सेवा केंद्रात मोठ्या उत्साहात झाला. याप्रसंगी आशीर्वचन देण्यासाठी मुख्यालयातून संस्थेच्या सहमुख्य प्रशासिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी संतोषदीदी उपस्थित होत्या. ब्रह्माकुमारी वासंतीदीदी गेल्या ५५ वर्षांपासून ईश्वरीय कार्यात समर्पित आहेत. दीदींच्या अमृतवाणीतून आजपर्यंत अनेकांनी आपल्या व्यसनांचा त्याग केला. अभीष्टचिंतन सोहळ्यानिमित्त दीदींचे औक्षण करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या ब्रह्माकुमारी शक्तीदीदी, ब्रह्माकुमारी मनीषादीदी, ब्रह्माकुमारी वीणादीदी, ब्रह्माकुमारी कावेरीदीदी आदी समर्पित भगिनींसहित डॉ. उज्ज्वल कापडणीस, डॉ. मनीषा कापडणीस व त्यांचा म्युझिकल योगा परिवार उपस्थित होता.



### भाजप तपोवन मंडलातर्फे पेढेवाटप


**पंचवटी :** केंद्र सरकारने देशात जातनिहाय जनगणना करण्यास मंजुरी दिल्याबद्दल केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचे अभिनंदन करून भाजप तपोवन मंडलातर्फे पंचवटी कारंजा येथे पेढे वाटप करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. देशात जातनिहाय जनगणना होत असल्यामुळे सर्वांना न्याय मिळेल, कोणावरही अन्याय होणार नाही, असे तपोवन मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी यांनी म्हटल आहे. याप्रसंगी भाजप नाशिक महानगर जिल्हा सरचिटणीस सुनील केदार, तपोवन मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, श्याम पिंपरकर, माजी नगरसेवक उद्धव निमसे, उल्हास धनवटे, धनंजय माने, रुची कुंभारकर, सुरेश खेताडे, हरिभाऊ लासुरे, महेश महांकाळे, दिगंबर धुमाळ, युवराज झोमन, नीलेश पवार, रवींद्र जोशी, रामदास खोटरे, सोमनाथ बोडके, भारती माळी, पूनम परदेशी, नाझिया खाटीक, लिला व्यवहारे, पोपट काकड, विजय पगार, विलास कारेगावकर, विजय बनछोडे, शंतनु शिंदे, अविनाश पिंपरकर, सुनील फरताळे, मयूर नाटकर, विशाल गोवर्धने, मंगेश धनवटे, नामदेव देशमुख, रोशन ठोके आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

### आरोग्य विज्ञान विद्यापीठात महाराष्ट्र दिन

**नाशिक :** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात महाराष्ट्र दिन उत्साहात झाला. विद्यापीठाच्या प्रांगणामध्ये आयोजित महाराष्ट्र दिन कार्यक्रमात कुलगुरू डॉ. माधुरी कानिटकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे प्रति-कुलगुरू डॉ. मिलिंद निकुंभ, परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू, वित्त व लेखाधिकारी बोधीकिरण सोनकांबळे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. देवेंद्र पाटील आदी उपस्थित होते. यावेळी राष्ट्रगीतानंतर 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सादर करण्यात आले. महाराष्ट्र दिन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपकुलसचिव प्रकाश पाटील यांनी केले. या कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वाणिज्य विभागात अंशुम गुरुळे प्रथम

**नाशिक रोड :** कौन्सिल फॉर दि इंडियन स्कूल सर्टिफिकेट



यांच्यामार्फत नुकत्याच घेण्यात आलेल्या परीक्षेत अशोका युनिव्हर्सल स्कूलचा विद्यार्थी अंशुम नीलेश गुरुळे याने वाणिज्य विभागात ९६.५ टक्के गुण मिळवून नाशिक शहर विभागात प्रथम येण्याचा मान मिळवला. उद्योजक नीलेश गुरुळे यांचा पुत्र, तर शिवसेना सहसंपर्कप्रमुख दत्ता गायकवाड यांचा तो नातू आहे.

### पाथर्डी गावात महाराष्ट्र, कामगार दिन



**सिडको :** नाशिक मनपा प्रभाग क्र. ३१ मधील पाथर्डी गावातील मनपाच्या शाळेत ६५ वा महाराष्ट्र दिन आणि कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माजी नगरसेवक सुदाम डेमसे यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. याप्रसंगी डेमसे यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा देत, राज्याच्या प्रगतीत सर्वसामान्य नागरिक व कामगार वर्गाचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास प्रताप राजपूत, सीताराम देवरे, भास्कर मुर्तडक, वसंत शिंपी, अंबरनाथ पवार, उमाकांत पवार, के. टी. राजोडे, गोविंद विसपुते, प्रकाश मोरे, शरद डावरे, दादाजी सस्ते, शिवराम बोराडे, कारभारी बोराडे, दिलीप शिंदे व रमेश बोरसेंसह मान्यवर उपस्थित होते.

### पिंपळसच्या वाघ फार्मसीला एनबीए मानांकन

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षणसंस्था संचालित के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पिंपळस महाविद्यालयास नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन यांच्याकडून मानांकन प्राप्त झाले आहे. हे मानांकन पुढील तीन वर्षांसाठी असणार आहे. महाविद्यालयीन शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, रोजगाराच्या संधी, अनुभवी प्राध्यापक वर्ग, विद्यार्थिकेंद्रित शिक्षण व इतर सुविधा याआधारे मानांकन दिले जाते. ग्रामीण भागात कार्यरत असलेले के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी हे जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे. प्रा. प्रतीक केदार यांनी एनबीए समन्वयक म्हणून कामकाज केले. समन्वयक डॉ. एन. एस. पाटील, नाशिक फार्मसीचे प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

अग्रलेख

# संघर्ष टाळण्याचे प्रयत्न

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात कमालीचा तणाव वाढला आहे. भारत सरकारच्या हालचालींवर पाकिस्तानचे जितके बारीक लक्ष आहे, तितकेच लक्ष पाकिस्तानच्या हालचालींवर भारत ठेवून आहे. दोन्ही देशांत युध्द होण्याची शक्यताही वर्तविली जात असून, भारताकडून हल्ला होण्याची भीती पाकिस्तान सरकार आणि तेथील जनतेला वाटत आहे. भारताने पाकिस्तानला एकदाचा धडा शिकवावा, अशी भावना भारतीयांमध्ये असून, धडा शिकविणे म्हणजे युध्द करुन पाकिस्तानचे कंबरडे मोडावे, ही अपेक्षा आहे. दहशतवादी हल्ल्यानंतर भारत सरकारने अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांना दहशतवादाविरुद्ध आणि दहशतवादाची पाठराखण करणार्या देशाविरुद्ध कृती करण्यास पूर्ण मोकळीक दिली आहे. याशिवाय राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार मंडळात बदल करण्यात आले आहेत. या काही घडामोडी पाहता पाकिस्तानच्या विरोधात मोठी कारवाई करण्याच्या तयारीत भारत दिसत आहे, असा संदेश जगभर गेला आहे. दुसरीकडे आम्ही युध्दाला सामोरे जाण्यास सज्ज आहोत, असेही पाकिस्तानकडून सांगितले जात आहे. पण, जगातील अनेक देशांना भारत आणि पाकिस्तान यांच्यात युध्द होऊ नये, असेच वाटत आहे. दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताला जगभरातील देशांचा पाठिंबा असला, तरी भारताने पाकिस्तानशी चर्चा करावी, अशी भूमिका अमेरिका आणि ब्रिटन या देशांनी घेतली आहे. पाकिस्तानशी बोलणी करण्यास भारताला कोणत्याही तिसर्या देशाशी मध्यस्थी नको असली, तरी काही देशांनी ती दर्शविली आहे. भारताकडून कधीही लष्करी कारवाई केली जाऊ शकते, अशी भीती पाकिस्तानचे मंत्री अत्तातुल्लाह तरार यांनी व्यक्त केली. दोन देशांतील पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेचे उपराष्ट्राध्यक्ष जेडी व्हान्स यांनी पाकिस्तानकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यासाठी जबाबदार असलेल्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी पाकिस्तान भारताला सहकार्य करेल, अशी अपेक्षा असल्याचे व्हान्स यांनी म्हटले आहे. पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला तेव्हा व्हान्स भारत दौऱ्यावर होते. पाकिस्तान हा दहशतवाद पोसणारा देश आहे, हे अमेरिकेला माहिती आहे. याशिवाय आतापर्यंत पाकिस्तानने भारताला दहशतवादी शोधण्यासाठी कधीही मदत केलेली नाही. हे लक्षात घेता व्हान्स यांनी पाकिस्तानकडून मदतीची व्यक्त केलेली अपेक्षा म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी, अशीच आहे. दोन्ही देश अण्वस्त्रधारी असल्याने त्यांच्यात संघर्ष झालाच, तर त्याचे विपरित परिणाम होतील, अशी भीती व्हान्स यांना वाटत आहे. तसे त्यांनी बोलूनही दाखविले. अमेरिकेचे विदेशमंत्री परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांनीही याआधी अशी भूमिका घेतली होती. संघर्ष टाळण्यासाठी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांशी चर्चा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सूचित केले होते. याचा अर्थ भारत आणि पाकिस्तान यांची समजूत काढण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. अमेरिकेच्या विदेश मंत्रालयाचे प्रवक्ते टॅमी ब्रुस यांनीही अमेरिका दोन्ही देशांशी संपर्क साधत त्यांना संघर्ष वाढवू नका, असे आवाहन केले होते. समजूत भारताची नव्हे, तर पाकिस्तानची काढण्याची गरज आहे, हे अमेरिकेने लक्षात घेतले पाहिजे. अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही देश महत्त्वाचे आहेत, असेही ब्रुस म्हणाले होते. भारत आणि पाकिस्तान यांच्या तणावात अमेरिका आपले स्वत:चे हित पाहत आहे. भारत-पाकिस्तान युध्द झाले, तर त्याचे परिणाम जगावर विशेषतः अमेरिकेवरही होतील. भारत हा जगासाठी मोठी लोकसंख्या असलेला बाजारपेठेचा देश आहे. युध्द झाले, तर त्याचा जागतिक व्यापारावर परिणाम होईल. रशिया-युक्रेन युध्दाचे परिणाम जगावर झालेले आहेत आणि होत आहेत. ते युध्द संपुष्टात आणण्यासाठी अमेरिका मध्यस्थी करत आहेच. त्यात अमेरिकेला भारत-पाकिस्तान युध्द नको आहे. अमेरिकेसारखीच भूमिका ब्रिटनने घेतली आहे. दोन्ही देशांनी शांतता बाळगावी आणि चर्चा करावी असे आवाहन ब्रिटनच्या सरकारने केले आहे. ब्रिटिश संसदेच्या कनिष्ठ सभागृहात हुजूर पक्षाचे खासदार गुरिंदर सिंग जोसान यांनी पहलगाम हल्ल्यातील दोषींना शिक्षा करण्यासाठी भारताला मदत करण्यात ब्रिटन कोणती भूमिका घेणार? हा प्रश्न विचारला. त्यावर परराष्ट्रमंत्री हेमिश फाल्कनर यांनी यासाठी सर्व बाजूंनी, सर्व समुदायांनी शांतता प्रक्रियेत सहभागी होणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. दोन देशात संघर्ष होऊ नये, असे ब्रिटनलाही वाटत आहे. अमेरिका आणि ब्रिटन यांची भूमिका पाकिस्तानला निश्चित दिलासा देणारी असली, तरी पाकिस्तानचा भारतावर विश्वास नाही आणि भारताचाही पाकिस्तानवर विश्वास नाही. यामुळे दोन्ही देशांत बोलणी होण्याची शक्यता सध्या तरी दिसत नाही. भारताने पाकिस्तानबाबत एकतर्फी राजनैतिक निर्णय घेतले आहेत. पाकिस्ताननेही तेच केले आहे. जे काही निर्णय घेण्यात आले त्यांचे परिणाम दोन्ही देशांवर होत आहेत. त्यात पाकिस्तानवर अधिक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. अमेरिका आणि ब्रिटन या देशांनी घेतलेल्या भूमिकांनंतरही पाकिस्तान सीमेवर पहलगामनंतर आगळीक करतच आहे. दोन देशांत संघर्ष टाळायचा असेलच, तर अमेरिका आणि ब्रिटन यांनी दहशतवाद पोसणाऱ्या पाकिस्तानवर दबाव आणण्याची गरज अधिक आहे. दहशतवादी हल्ल्यामुळे सध्याचा तणाव निर्माण झाला आहे. त्याला भारत नाही, तर पाकिस्तान जबाबदार आहे, हे स्पष्ट आहे. पण, पाकिस्तान काही ऐकण्याच्या मनस्थितीत नसल्याचे दिसून येत आहे. जगात आपण एकटे पडू नये म्हणून या देशाने धर्माचा आधार घेऊन इस्लामिक देशांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. जगातील ५७ देशांचा गट असलेल्या ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कोऑपरेशन (आयओसी) म्हणजेच इस्लामिक सहकार्य संघटनेचा पाठिंबा मिळवल्याचा दावा केला आहे. दक्षिण आशियातील ताज्या परिस्थितीबद्दल ओआयसीला पाकिस्तानने माहिती दिली. यात भारताने केलेल्या कृतींना या प्रदेशाच्या शांततेसाठी 'गंभीर धोका' असल्याचे नमूद करण्यात आले. ओआयसीच्या सदस्य देशांना भारताची भूमिका आणि त्याचे परिणाम विचारात घेण्याचे आवाहनही करण्यात आले. ओआयसी राजदूतांनी पाकिस्तान आणि त्यांच्या जनतेसाठी एकता आणि पूर्ण पाठिंबा दिला असल्याचे सागितले जात आहे. मात्र, राजनैतिक संवादाद्वारे तणाव कमी करण्याचे आणि प्रादेशिक तणावाचे मूळ शोधण्याचे आवाहन आयओसीने केले आहे. काश्मीर प्रश्नाचे शांततापूर्ण निराकरण हाच मार्ग आयओसीने सांगितला आहे. पाकिस्तान तो मान्य करणार की दहशतवादाला पोसत बसणार? हाच प्रश्न आहे.

# पाकिस्तान तुटणार, स्वतंत्र बलुचिस्तान होणार!

१४ ऑगस्ट १९४७ भारताच्या पूर्व व पश्चिम बाजूंनी निर्माण झालेला पूर्व पाकिस्तान व पश्चिम पाकिस्तान हे एकसंध देश, १९७१ ला भारताने तोडून टाकले. पूर्वेकडील पाकिस्तानचे स्वतंत्र बांगलादेश राष्ट्र तयार झाले. आता पुन्हा इतिहासाची पुनरावृत्ती होणार! गुजरातच्या वरील पाकिस्तानचा भाग बलुचिस्तान स्वतंत्र होणार आहे. त्याते पुन्हा भारताचा सिंहाचा वाटा असणार आहे. तसे पाहिले तर पाकिस्तानचे बरेच प्रांत अस्वस्थ आहेत. आतल्या आत धुमसत आहेत. पाकिस्तानची सेना, प्रसारमाध्यमे व अपंग लोकशाही हे तिन्ही विभाग बलुच प्रांताला, सिंध प्रांताला, खैबर पख्तुनख्वा यांना सर्वच विकासापासून उपेक्षित ठेवत, गुलामांची वागणूक देत आहेत. नैसर्गिक संसाधनांचे शोषण करीत आहेत. या प्रांतांपैकी सर्वात धुमसत व जळत असलेला प्रांत म्हणजे बलुचिस्तान. खरं म्हणजे बलुचिस्तानला भारत-पाकिस्तान फाळणीच्या वेळी पाकिस्तानमध्ये विलीन व्हायचेच नव्हते. त्यांना जबरदस्तीने पाकिस्तानमध्ये विलीन करण्यात आले. तेव्हापासूनच त्यांना उपेक्षित व गुलामांचा दर्जा देण्यात आला आहे. मार्च २०२५ मध्ये पाकिस्तानची एक्स्प्रेस हायजॅक करण्यात आली होती. ती याच भागात. स्वतंत्र बलुचिस्तानसाठी उठाव करणारी, लढणारी संघटना बलुज लिबरेशन आर्मी यांनी हायजॅक केली होती.

**बलुचिस्तानचा भूगोल, भूतकाळ**

पाकिस्तानचा सर्वात मोठा प्रांत कोणता, तर याचे नाव बलुचिस्तान हेच येते. तीन लाख ४७ हजार वर्ग किलोमीटर असलेला, व्यापारदृष्ट्या मोठा समुद्रकिनारा लाभलेला प्रांत. तांबे, सोने, युरेनियम इत्यादी महत्त्वाच्या खनिजांनी संपन्न असलेला भूभाग! पाकिस्तानचे ७० टक्के खजुराचे उत्पादन होणारा प्रदेश. पण सर्वात दुर्लक्षित आणि अत्यंत गरिबीने ग्रस्त असणारा प्रांत आहे. सध्या नेव्हीची तीन तळे आहेत. पाकिस्तानने परमाणु चाचणीसुद्धा याच भागात घेतली आहे. चगा त्या भागाचे नाव. देशाचा ४४ टक्के भूभाग असलेल्या भागात फक्त देशाची ५ टक्के लोकसंख्या राहते. ती पूर्ण अविकसित रूपात, जाणूनबुजून ठेवलेली आहे. सध्या येथे दीड कोटी लोक राहतात. पाकिस्तानची लोकसंख्या २५ कोटी आहे. बलुचिस्तानच्या पूर्वेला पाकिस्तानचा सिंध प्रांत असून, पश्चिमेला इराण देश आहे, तर उत्तरेला अफगाणिस्तान असून, दक्षिणेला सिंधुसागर (पाठ्यपुस्तकात त्यास अरबी समुद्र असे म्हणतात) आहे. भारताच्या स्वातंत्र्य कालखंडाचा अभ्यास केल्यास बलुचिस्तान हा भूतानसारखा स्वतंत्र देश हवा होता किंवा भारतातील एक समृद्ध राज्य. पण ब्रिटिशांच्या धुर्तपणामुळे, स्थानिक संस्थानच्या राजांच्या मूर्खपणामुळे तसेच बॅरिस्टर जीनांच्या विश्वासघातामुळे हा भला मोठा प्रांत पाकिस्तानच्या घशात गेला. तो तब्बल १५ ऑगस्टनंतर २२७ दिवसांनी. म्हणजे बलुचिस्तानने फक्त आपले स्वातंत्र्य २२७ दिवस उपभोगले.

बलुचिस्तानमध्ये चार मुख्य संस्थाने होती. कलात, खरात, लास बेला व मेकरन. कलात सोडल्यास इतर तीनही संस्थानांच्या नावावर बॅरिस्टर जीनांचा प्रभाव व दबाव होता. कलात संस्थानचा विषयच वेगळा होता. १८७६ च्या करारामुळे ब्रिटिश हस्तक्षेपापासून ते मुक्त होते. करातला अंतर्गत स्वायत्तता मिळाली होती. थोडक्यात, करातला सिक्कीम व भूतानच्या श्रेणीत ठेवण्यात आले होते. त्याला बी श्रेणी म्हटलेले आहे. थोडक्यात, कलात हे संस्थान भारतीय संस्थानासारखे 'द चेंबर ऑफ प्रिन्सली स्टेट्स'चे सदस्य नव्हते. १५ ऑगस्ट १९४७ च्या स्वातंत्र्य प्रस्तावानुसार भारतात विलीन होणे किंवा पाकिस्तानमध्ये सामील होणे किंवा स्वतंत्र राहणे, हे तीनच पर्याय होते. कलातचे नवाब खान मीर अहमद खान यांनी स्वतंत्र राहण्यासाठी ब्रिटिशांसमोर आपला खटला मांडण्यासाठी मोहम्मद अली जीना यांना कायदेशीर सल्लागार म्हणून नियुक्त केले आणि येथेच घात झाला. शेवटचे व्हॉइसरॉय, खान मीर, पं. नेहरू व मोहम्मद अली जीना यांची ४ ऑगस्ट १९४७ ला दिल्लीत बैठक झाली. या बैठकीत जीना यांनी कलातच्या स्वतंत्र राहण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला. त्यानुसार ५ ऑगस्टपासून कलात स्वतंत्र राहील यावर एकमत झाले, तसेच जीनांच्या शिफारशीनुसार खरात व लासबेला यांना कलातमध्येच विलीन करून संपूर्ण बलुचिस्तान करण्याचे निश्चित झाले. ११ ऑगस्टलाच कलात व मुस्लिम लीग यांच्यामध्ये करार झाला. त्यानुसार कलातला




स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्यात आली. मुस्लिम लीग बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याचा आदर करेल, असे आश्वासन देण्यात आले. १५ ऑगस्ट १९४७ ला कलातने आपले स्वातंत्र्य घोषित केले. स्वतंत्र ध्वज फडकावला. स्वतंत्र देश म्हणून खुत्बा म्हणजे



**भारताभोवतालचे अस्वस्थ वर्तमान**

**हेमंत चोपडे**

७३५०७०५०९१

इस्लामिक धर्मोपदेश वाचण्यात आला. या सर्व करण्यामागे ब्रिटिशांचा धूर्तपणा व मोहम्मद अली जीना यांचा कावेबाजपणा होता, हे जगाला व कलातच्या नवाबाला नंतर कळले. १२ सप्टेंबरला ब्रिटिशांनी कलातचे खान स्वतंत्र देशाच्या आंतरराष्ट्रीय जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या स्थितीत नाही, असे निवेदनाने घोषित केले. बॅरिस्टर जीनांना हेच हवे होते. ऑक्टोबर १९४७ ला खान मीर यांना कराचीला जावे लागले. स्थानिक बलुची जनतेने राजासारखे स्वागत केले, पण गव्हर्नर व पाकिस्तानने अवहेलना केली. बॅरिस्टर जीना यांनी विलीन होण्यास सांगितले. खान यांनी नकार दिला. 'संपूर्ण कलात जनतेला तसेच आदिवासी बांधवांना विचारात घेतल्याशिवाय निर्णय करू शकत नाही', असे त्यांनी ठणकावून सांगितले. कलातला आल्यानंतर खान यांनी कायदेमंडळाची बैठक घेतली. बैठकीत एकमताने विलीनीकरणाच्या प्रस्तावाला विरोध करण्यात आला. तसेच स्वतंत्र बलुचिस्तानच्या भावनेच्या विरुद्ध हा प्रस्ताव आहे, अशी नोंद केली. खान यांना अंदाज आला. त्यांनी तत्काळ आपल्या सेनापतीला दारूगोळा व शस्त्रसाठा मिळविण्यासाठी लंडनला संपर्क करण्यास सांगितले. पण इंग्रजांनी जीनांसोबत संगनमत केलेले असल्याने त्यांनी नकार दिला. यास डिसेंबर उजाडला होता. कलातमध्ये दोन बलुच सरदार सोडले तर इतरांचा खान यांना पाठिंबा नव्हता. जीनांनी इतरांना अगोदरच फितवलेले होते. अखेर १८ मार्च १९४८ ला जीना यांनी खरात, लास बेला, मेकरन प्रदेश वेगळे करण्याची घोषणा केली. आपोआपच कलात संस्थान एकटे पडले. खानने शेवटपर्यंत प्रयत्न सोडले नाहीत. भारतीय अधिकारी व अफगाणिस्तानच्या राजाला मदत मागितली, पण त्याला यश आले नाही.

इकडे दिल्लीमध्ये बलुचिस्तान विषयासंबंधी परराष्ट्र सचिव व्ही. पी. मेनन व 'नेहरू-पटेल' यांच्यातच सुसंवाद नसल्याचे कालांतराने दिसून आले. बहुसंख्य मुस्लिम प्रदेश असलेल्या काश्मीरला वाचविण्यासाठी आपले सैन्य धावून गेले. बलुचिस्तानसाठी मात्र भारताने माघार घेतली का? उत्तर जिज्ञासूंनी शोधावे. तत्कालीन नेत्यांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणासाठी आवश्यक असलेल्या चाणक्यनीतीचा पूर्णपणे अभाव! आंतरराष्ट्रीय राजकारणाचा पूर्ण अभ्यास असलेले काँग्रेसेत्तर नेते सत्तेच्या बाहेर असणे हेसुद्धा कारण मांडता येईल. शेवटी २६ मार्च १९४८ ला पाकिस्तानी सैन्याने बलुचिस्तानच्या किनारी प्रदेशात प्रवेश केला. करातच्या खानला शरणागतीशिवाय पर्यायच उरला नव्हता. अशा तऱ्हेने तत्कालीन भारतीय 'नेहरू- पटेल' सरकारने बलुचिस्तानला पाकच्या घशात जाऊ दिले. अर्थात, मुस्लिमबहुल प्रांत असल्याने सरदार पटेल यांनी यापेक्षा पूर्ण भारतभर पसरलेल्या पाचशेच्यावर संस्थानांकडे संपूर्ण लक्ष केंद्रित केले होते.

**स्वातंत्र्याचा उठाव शेवटच्या टप्प्यात**

आजही बलुची लोकांमध्ये आम्हाला जबरदस्तीने पाकिस्तानमध्ये ढकलले आहे याचे शल्य आहे. स्वतंत्र बलुचिस्तानसाठी १९५८, १९६२, १९७०, २०१६ आणि वेळोवेळी उठाव करण्यात आले आहेत. पण पाकिस्तानी सैन्याच्या दडपशाहीने नेहमी बंड मोडण्यात येते. उठाव करणाऱ्या नेत्यांना ठार करण्यात येते किंवा गायब करण्यात येते. तरुण संघर्ष करणारे स्वयं प्रज्ञामान बलुचींचे अपहरण होते. हजारो संघर्ष करणारे तरुण बलुचिस्तानमधून गायब करण्यात आलेले आहेत. पाकिस्तानी सैन्याने बलुची उठाव कर्त्याविरुद्ध रासायनिक शस्त्रांचा वापर केला आहे. २००५ मध्ये मात्र बलुचिस्तानचे माजी गव्हर्नर असलेले नवाब अकबर खान बुगटी यांनी सशस्त्र उठाव केला.

नैसर्गिक संसाधनांचा अनिर्बंध उपसा आणि फक्त पंजाब प्रांतासाठीची व्यवस्था, याला त्यांनी विरोध केला. त्यांचीही २००६ मध्ये हत्या करण्यात आली. हत्येच्या षडयंत्रामागे तत्कालीन जनरल परवेज मुशर्रफ हेच होते. त्यांचा बदला घेण्याचा बलुचींनी प्रयत्नही केला, पण त्यामध्ये मुशर्रफ बालंबाल वाचले. याच भागातील 'ग्वादर बंदर' पाकिस्तानने चीनला विकसित करण्यासाठी दिले आहे. 'चीन पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर' अंतर्गत म्हणजे अंतर्गत हे संपूर्ण बंदर चीनच्या ताब्यात दिले आहे. हे बंदर चीनच्या झिनजियांग प्रांताला जोडण्यात येत आहे. त्यामुळेही स्थानिक बलुची व चिनी यांच्यात संघर्ष सुरू आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्यावरून बलुचिस्तानच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिला आहे. भारताने वेळोवेळी बलुचिस्तानचा विषय संयुक्त राष्ट्रसंघातही काढलेला आहे. त्यामुळे बलुचींच्या मनात भारताविषयी नितांत आदर आहे.

**बलुचिस्तान व महाराष्ट्र यांचा संबंध**

बलुचिस्तानला भारताविषयी आदर असण्याचे आणखी एक कारण म्हणजे, आपला महाराष्ट्र आहे. बलुचिस्तानात मराठ्यांची प्रचंड संख्या आहे. पानिपतच्या शेवटच्या युद्धात १४ जानेवारी १७६१ ला मराठ्यांचा पराभव झाल्यानंतर मराठ्यांच्या सैन्याची वाताहत झाली. एक लाखाच्यावर बांगड्या फुटल्या, असे म्हणतात. त्यावेळी २२ हजार मराठी कैदी मोहम्मद शहा अब्दालीने आपल्या ताब्यात घेतले आणि अफगाणिस्तानला नेण्यासाठी मार्गक्रमण केले. बलुचिस्तानला पोहोचेपर्यंत सैन्याचे व मराठा कैद्यांचे हाल झाले. तेव्हाच्या बलुचिस्तानच्या राजाने 'मीर नासिर खान नुरी' याने पानिपतच्या युद्धात अब्दालीला मदत केल्यामुळे, त्याचा आर्थिक परतावा परत करण्याची अब्दालीची क्षमता नसल्याने, हे २२ हजार मराठा सैनिक कैदी त्याला देऊन टाकले. अशा तऱ्हेने हे मराठा कैदी बलुचिस्तानच्या राजाचे गुलाम झाले. गुलामांना स्वतःचा धर्म नसतो. राजाचा धर्म तोच गुलामांचा. ही सर्व मराठा मंडळी मुसलमान झाली. त्यांना १९४४ पर्यंत हीन दर्जाची, उपेक्षेचीच वागणूक मिळाली.

# भगवान परशुराम यांच्याविषयी असलेले गैरसमज

साडेतीन मुहूर्तांपैकी एक अखंड मुहूर्त असणाऱ्या अक्षय तृतीयेला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच दिवशी भगवान परशुराम अवतरले. अग्रतः चतुरो वेदाः पृष्ठतः सशरं धनुः । इदं ब्राह्मं इदं क्षात्रं शापादपि शरादपि ।। अर्थात ज्याच्या मुखात चार वेद आहेत आणि पाठीवर धनुष्य बाण आहे, ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज ज्याठिकाणी एकत्रित आहेत. विरोध करणाऱ्यांना शापाने आणि प्रसंगी शराने म्हणजेच बाणाने नष्ट करण्याचे ज्यामध्ये सामर्थ्य आहे असे भगवान पशुराम श्रीविष्णूचा सहावा अवतार. श्रीविष्णूचा परशुराम हा एकमेव अवतार आहे जो अमर्त्य म्हणजेच चिरंजीव आहे. आजही एखादी व्यक्ती अत्यंत क्रोधीत झाली की तिला जमदग्नीची उपमा दिली जाते. अशा जमदग्नी ऋषी आणि माता रेणुका यांच्या पोटी भगवान परशुरामांचा जन्म झाला. त्यांचे नाव राम असे ठेवण्यात आले. ते भगवान शिवाचे परमभक्त होते. आपल्या तपसामर्थ्याने त्यांनी भगवान शिवांना प्रसन्न करून घेतले होते. भगवान शिवांनी त्यांना दुष्टांच्या संहारासाठी परशु दिला होता तेव्हापासून त्यांच्या नावापुढे परशु लागून ते परशुराम झाले. वडिलांप्रमाणे परशुराम सुद्धा शीघ्रकोपी होते; मात्र वडिलांप्रमाणेच त्यांचा राग पुढच्या क्षणाला शांतही होत असे. संपूर्ण कोकणप्रांतात भगवान पशुरामांची अनेक मंदिरे आणि पौराणिक संदर्भ सापडतात. त्यामुळे कोकणभूमीला परशुराम भूमी म्हणूनही संबोधले जाते. भगवान पशुरामांविषयी मुख्यतः दोन गैरसमज समाजामध्ये आढळतात. यामागील नेमकी कारणमीमांसा काय आहे याविषयी थोडक्यात जाणून घेऊया!

भगवान परशुरामांविषयी पहिला गैरसमज आहे तो म्हणजे भगवान परशुरामांनी आपल्या आईचा शिरच्छेद केला. होय भगवान परशुरामांनी त्यांच्या जन्मदात्या आईचा शिरच्छेद केला हे सत्य असले, तरी त्यांना पुनर्जीवित करण्यामागेही त्यांचाच प्रमुख हात होता. एकदा जमदग्नी ऋषींनी एका यज्ञाचे अनुष्ठान आरंभले होते. त्यासाठी हवे असलेले जल त्यांनी पत्नी रेणुका यांना नदीवरून घेऊन येण्यास सांगितले. माता रेणुका कुंभ घेऊन नदीवर जल घेण्यासाठी



गेल्या असता त्यांना त्याठिकाणी गंधर्व आणि अप्सरा जलक्रीडा करत असल्याचे दिसले. ते पाहिल्यावर त्या देहभान हरपून ते दृश्य पाहत बसल्या. नदीवर त्या नेमक्या कशासाठी आल्या होत्या तेच त्या विसरल्या. जेव्हा

**जगन घाणेकर**

९६६४५५९७८०

भानावर आल्या तेव्हा बराच उशीर झाला होता. जल मिळण्यास विलंब झाल्याने जमदग्नी ऋषींना यज्ञ करता आला नाही. शीघ्रकोपी असलेले जमदग्नी भयंकर क्रोधीत झाले आणि त्यांनी आपल्या चारही पुत्रांना मातेचा शिरच्छेद करण्यास सांगितले. काय करावे सुचेना म्हणून अन्य तीन मुले खाली मान घालून उभी राहिली; मात्र परशुरामांनी शिरच्छेद करण्यासाठी शस्त्र हाती घेतले. आपल्या वडिलांना ते चांगलेच ओळखून होते. या प्रसंगातून ते आपली परीक्षा घेत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. वडिलांना क्रोध आला असला, तरी पुढच्याच क्षणी तो शांत होईल आणि आईला ते मंत्रसामर्थ्याने पुनर्जीवित करू शकतात हे ज्ञात असल्यानेच पशुरामांनी मातेचा शिरच्छेद केला. मुलाच्या आज्ञापालनाने प्रसन्न झालेल्या जमदग्नी ऋषींनी परशुरामांना तीन वर मागण्यास सांगितले. त्यांनी तत्क्षणी मातेला जीवित करण्यास सांगितले. जमदग्नी ऋषींनी मंत्रजल शिंपडून रेणुका मातेला जिवंत केले.

भगवान परशुरामांविषयी दुसरा गैरसमज पसरवला गेला आहे तो म्हणजे परशुरामांनी २१ वेळा पृथ्वीप्रदक्षिणा करून २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रीय केली. भगवान परशुराम हे क्षत्रिय विरोधी होते. भगवान परशुरामांच्या या कृतिमध्येच प्रश्नाचे उत्तरसुद्धा आहे. भगवान परशुरामांनी एकदा पृथ्वी खरोखरच नि:क्षत्रीय केली असती, तर दुसऱ्यांदा ती नि:क्षत्रीय करण्यासाठी एकही क्षत्रिय जिवंत राहिला असता का? भगवान परशुरामांनी केवळ सत्तेने, सामर्थ्याने आणि मदाने उन्मत्त झालेल्या, प्रजेवर जुलूम करणाऱ्या क्षत्रियांचाच नि:पात केला.

परशुरामाचा अवतारच मुळात उन्मत्त क्षत्रियांच्या विनाशासाठी झाला होता. भगवान परशुरामाच्या या कृतीमागेही एक कथा आहे. एके दिवशी भगवान परशुराम बाहेर गेले असता राजा सहस्त्रबाहू याचे दोन पुत्र कृतवीर अर्जुन आणि कार्तवीर्य अर्जुन जमदग्नी ऋषींच्या आश्रमात आले आणि त्यांनी आश्रमातील कामधेनूचे अपहरण केले. साधनेत मग्न असलेल्या जमदग्न ऋषींवरही त्यांनी प्रहार करून त्यांना ठार केले. पतिनिधनानंतर माता रेणुका सती गेल्या. भगवान पशुराम आश्रमात परतल्यानंतर त्यांना सर्व प्रकार कळला. वडिलांचा घात करणाऱ्या सहस्त्रबाहूच्या दोन्ही पुत्रांसह पृथ्वीतलावरील समस्त दुष्ट क्षत्रियांचा नाश करण्याचा त्यांनी निश्चय केला. दुष्ट आणि अत्याचारी क्षत्रियांचा नाश केल्यावर त्यांच्या पुढच्या पिढ्याही अत्याचारी निपजत असल्याचे लक्षात आल्यावर परशुराम त्यांचाही वध करत गेले. असे करत करत त्यांनी पृथ्वीतलावरील राजधर्म विसरलेल्या, सत्तेचा दुरुपयोग करणाऱ्या उन्मत्त आणि अत्याचारी क्षत्रियांचा २१ वेळा नि:पात केला. प्रजेचे कल्याण साधणाऱ्या, प्रजेवर पुत्रवत प्रेम करणाऱ्या आणि प्रजेच्या उद्धारासाठी झटणाऱ्या एकही क्षत्रिय राजाला भगवान परशुरामांनी कधी स्पर्शही केला नाही. यावरून भगवान परशुराम कधीही क्षत्रियविरोधी नव्हते हे लक्षात येते. त्रेतायुगात सीता स्वयंवराच्या प्रसंगी भगवान पशुरामांची भेट प्रभू रामचंद्रांशी झाली. प्रभू रामचंद्र हे क्षत्रिय आहेत आणि भगवान विष्णूचे अवतार आहेत. श्री विष्णूंनी दुष्टांच्या संहारासाठीच प्रभूरामचंद्राचा अवतार घेतल्याचे लक्षात आल्यावर भगवान परशुरामांनी आपले कार्य थांबवले आणि तपासाठी निघून गेले. द्वापारयुगात त्यांनी पितामह भीष्म, द्रोणाचार्य आणि कर्ण यांना प्रशिक्षण दिले.

# पाकिस्तानविरोधी आंदोलनांना विरोध नको!

**जनमनाचे प्रतिध्वनी**

पहलगाम आतंकवादी हल्ल्यानंतर देशभरातील देशप्रेमी नागरिकांच्या भावना तीव्र झाल्या असून, भारतात आतंकवादी हल्ले घडवून आणणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा, पाकिस्तानवर भारताने आक्रमण करावे, आतंकवाद्यांना सहाय्य करणाऱ्या स्थानिक नागरिकांवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा यासाठी देशभर निदर्शने, मोर्चे, स्वाक्षरी मोहिमा आणि विविध आंदोलने सुरू आहेत.

आधीच्या तुलनेत यावेळी पाकिस्तानचा निषेध करण्यासाठी नागरिक विशेषतः तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात घराबाहेर पडताना दिसत आहे. पाकिस्तानचा निषेध करण्याच्या विविध पद्धतीही नागरिकांनी शोधून काढल्या असून, काही ठिकाणी पाकिस्तानचे झेंडे लोकांनी पायदळी तुडवावेत, यासाठी ते रस्त्यावर चिकटवले जात आहेत, तर काही ठिकाणी सार्वजनिक प्रसाधनगृहात पाकिस्तानचे झेंडे लावले जात आहेत, काही ठिकाणी पाकिस्तानचे झेंडे फाडले आणि जाळले जात आहेत, तर काही ठिकाणी पाकिस्तानचा प्रतीकात्मक पुतळा तयार करून त्याला जोडे मारले जात आहेत, लाथांनी तुडवले जात आहेत.

काही ठिकाणी या निषेध आंदोलनाला स्थानिक शांतताप्रिय समाजाकडून विरोध होताना दिसत आहे. त्यातून वाद होत आहेत आणि तो सोडविण्यासाठी पोलिसांना मध्यस्थी करावी लागत आहे. पाकिस्तान हे भारताचे पहिल्या क्रमांकाचे शत्रुराष्ट्र आहे. त्यामुळे पाकिस्तानच्या झेंड्याला फाडणे, लाथाडणे किंवा जाळणे भारतात गुन्हा ठरू शकत नाही. ज्यांना हे सर्व पाहून वाईट वाटत आहे त्यांच्या भावना पाकिस्तानशी जोडल्या गेल्या आहेत का, याचाही शोध घेणे गरजेचे आहे.

**जगन घाणेकर**, घाटकोपर

**आमच्या बुद्धीचे ग्रहण कधी सुटणार?**

भारतीय समाज हा जुनाट, बुरसटलेला, मागासलेला व अंधश्रद्धाळू जसा आधी होता तसाच आजही आहे. परकीयांची संस्कृती ही पाश्चात्य असली, तरी त्यांच्यात आणि आपल्यात जमीन अस्मानचा फरक आहे. त्याला कारणेही तितकीच आहेत.

आजही आपण रस्त्यावर फेकलेल्या लिंबाला ओलांडण्याची हिंमत ठेवत नाही. कदाचित ते कोणीतरी मंतरलेले असावे, हा भ्रम आपल्या मनात तसाच आहे. एखादे मांजर रस्त्यावरून आडवे गेल्यास आपण तो रस्ताच बदलून पर्यायी मार्गाने जाणे योग्य मानतो. नदीकिनारी श्राद्ध केल्याने आपल्या पूर्वजांना त्यांनी केलेल्या पापातून मुक्तता मिळून स्वर्गप्राप्ती होते, हे आजही प्रचलित आहे. आपला समाज यातून कधीच बाहेर येणार नाही का? आपल्या बुद्धीचे हे ग्रहण कधी सुटणार? वास्तववादी वैज्ञानिक दृष्टिकोन हा त्यासाठी योग्य मार्ग आहे, असे म्हणता येईल.

**नितीन चव्हाण**, नाशिक

# निश्चयपूर्वक नामस्मरण व चित्तशुद्धी



**विचारधन**


मला अजून अमुक करायचे आहे ही कल्पना सोडून द्यावी. आता मी परमेश्वराचा झालो, आता मला काही करायचे राहिले नाही, अशी मनाची स्थिती झाली पाहिजे. 'हे परमेश्वरा, आता तुझ्याकरताच मी जगेन, तुझ्या नामस्मरणाशिवाय मला काही कर्तव्य उरले नाही.' असा निश्चय केला तर मनाला समाधान झालेच पाहिजे. 'नामस्मरण होत नाही, कारण वयामुळे मन थकले,' हे म्हणणे बरोबर नाही. शरीर थकेल, कारण लहानपणी वाढणे आणि वृद्धपणी थकत जाणे, हा शरीराचा निसर्गक्रमच आहे; परंतु मन थकले हे मात्र सयुक्तिक नाही. मन हा परमेश्वराचा अंश आहे, असे आपल्या दिव्य विभूती सांगताना भगवंतांनी सांगितले आहे. मनाची अत्यंत क्षीणतेची अवस्था म्हणजे मृत्युसमयीची; परंतु त्या समयीही माझे स्मरण ठेवावे असे भगवंतांनी सांगितले असताना, त्यापूर्वी केव्हाही, मन थकले आणि स्मरण करू शकत नाही असे होणे शक्य नाही. सर्व व्यापांतून ते भगवंताकडे लावणे जरूर आहे. पैसाअडका, प्रपंचातल्या सर्व गोष्टी, यांचा मनाने त्याग करावा. असा त्याग केला तर कार्यभाग निश्चित होतो.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

## बाजार - कंपन्या - मनोरंजन

### 'मास्टर' मोहन आगाशे आणि 'ब्लास्टर' सिद्धार्थ जाधव एकत्र

**मुंबई :** नेमक्याच तरीही प्रभावी भूमिका करण्याकडे ओढा असणाऱ्या कलाकारांमध्ये ज्येष्ठ अभिनेते मोहन आगाशे आणि अभिनेता सिद्धार्थ जाधव ही नावे आवर्जून घेतली जातात. आतापर्यंत मोजक्या पण हटके चित्रपटांमध्ये दिसणारे हे दोन चतुरस्त्र कलाकार दिग्दर्शक विशाल पी. गांधी यांच्या 'आतली बातमी फुटली' या आगामी मराठी चित्रपटातून पहिल्यांदाच प्रेक्षकांसमोर येत आहेत. या दोघांचं एक पोस्टर नुकतंच प्रदर्शित करण्यात आलं आहे. ज्यात मोहन आगाशे यांनी सिद्धार्थ जाधव याच्यावर बंदूक रोखलेली पाहायला मिळतेय. या मागचं नेमकं कारण काय असेल? हे पाहण्यासाठी ६ जूनला येणारा 'आतली बातमी फुटली' हा चित्रपट पाहावा लागेल. वीजी फिल्म्स बॅनरखाली विशाल पी. गांधी यांच्या पहिल्या मराठी चित्रपटाच्या दिग्दर्शनात त्यांना जैनेश इजरदार यांची सहदिग्दर्शक म्हणून साथ लाभली आहे. या चित्रपटाची निर्मिती विशाल पी. गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सहनिर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तर संकलन रवी चौहान यांचे आहे.



### 'आतली बातमी फुटली'चा रंजक टीझर भेटीला

**मुंबई :** मराठी चित्रपटांनी सगळ्याच बाबतीत आपलं वेगळेपण दाखवून दिलं आहे. चित्रपटात काय वेगळे पाहायला मिळणार याची उत्कंठा वाढवण्यातही मराठी चित्रपटांचे पाऊल सातत्याने पुढे



पडत आहे. वीजी फिल्म्स या बॅनरअंतर्गत दिग्दर्शक विशाल पी. गांधी आणि जैनेश इजरदार 'आतली बातमी फुटली' हा नवाकोरा मराठी चित्रपट प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी घेऊन आले आहेत. या चित्रपटाचा रंजक टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. ६ जूनला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. 'आतली बातमी फुटली' या चित्रपटाची निर्मिती विशाल पी. गांधी आणि ग्रीष्मा अडवाणी यांची आहे. सहनिर्माता अम्मन अडवाणी तर सहयोगी दिग्दर्शक जीवक मुनतोडे आहेत. चित्रपटाचे छायांकन अमित सुरेश कोडोथ तर संकलन रवी चौहान यांचे आहे. संगीत एग्रेल रोमन यांनी दिले आहे. कथा जैनेश इजरदार यांनी तर पटकथा जीवक मुनतोडे, अम्मन अडवाणी, जैनेश इजरदार, विशाल पी. गांधी यांची आहे. संवाद लेखन जीवक मुनतोडे व अद्वैत करंबेळकर यांनी केले आहेत.

### 'सोनी'तर्फे हास्यदिन साजरा

**मुंबई :** हलक्या-फुलक्या आणि कुटुंबाला एकत्र बसून आनंद घेता येणाऱ्या मालिका सादर करण्याबद्दल प्रसिद्ध असलेली सोनी सब वाहिनी बऱ्याच वर्षांपासून देशभरातील प्रेक्षकांसाठी प्रसन्न मनोरंजनाचा एक स्रोत आहे. आपल्या जीवनातील घडामोडींच्या गोष्टी असोत किंवा भन्नाट विनोदी मालिका असोत- या मालिकांमध्ये काम करणारे कलाकार ४ मे रोजी असलेल्या जागतिक हास्य दिनाच्या निमित्ताने सांगत आहेत की, घराघरात आनंद पसरवणाऱ्या आणि प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवणाऱ्या मालिकांमध्ये काम करताना कसे वाटते. 'तेनाली रामा' मालिकेत शीर्षक भूमिका करणारा अभिनेता कृष्ण भारद्वाज म्हणतो, मी साकारत असलेला तेनाली रामा हा त्याच्या बुद्धीचातुर्याबद्दल आणि विनोदी स्वभावाबद्दल ओळखला जातो. हुशारी आणि विनोद एकत्र नांदू शकतात याची साक्ष देणारी ही व्यक्तिरेखा आहे. 'वागले की दुनिया' मालिकेत वंदना ही व्यक्तिरेखा साकारणारी परिवा प्रणती म्हणते, आमच्या मालिकेत माणसाचे दैनंदिन आनंद आणि त्याचे संघर्ष यांचे चित्रण असते. 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिकेत नायिकेचे काम करणारी करुणा पांडे म्हणते, पुष्पा खूप खंबीर आहे. आणि तिची विनोदबुद्धी देखील उत्तम आहे. तिच्या प्रवासातून हे सिद्ध होते की, हसण्यासाठी तुम्ही परफेक्ट असण्याची गरज नसते, किंवा आनंद पसरवण्यासाठी आदर्श परिस्थितीच असली पाहिजे असे नाही. गंभीर परिस्थितीत देखील आनंद शोधणारी व्यक्तिरेखा करत असल्याचा मला अभिमान वाटतो.

# भारताचा पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेवर वज्र प्रहार

## पाकिस्तानची हवाई कोंडी, दररोज एक कोटीचे नुकसान

**नवी दिल्ली :**

जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रातील मोदी सरकारकडून पाकिस्तानची राजकीय कोंडी करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. एकीकडे दोन्ही देशांमध्ये अनेक वर्षांआधी करण्यात आलेल्या सिंधू जल कराराला मोदी सरकारने स्थगिती दिली, तर दुसरीकडे त्यानंतर पाकिस्तानी विमानांसाठी आपले हवाई क्षेत्रही बंद केले. प्रत्युत्तरात पाकिस्तानने भारतातील विमान वाहतूक क्षेत्राला हानी पोहोचवण्याच्या दृष्टीने भारतीय विमानांसाठी आपल्या हवाई क्षेत्रावर बंदी घातली, पण आता हा निर्णय त्यांच्यावरच उलटला असं दिसत आहे.




दोघांनीही एकमेकांच्या विमानांसाठी आपले हवाई क्षेत्र (एअरस्पेस) बंद केले आहे, ज्यामुळे दोन्ही देशांचे आर्थिक नुकसान अटळ आहे. पाकिस्तानबद्दल बोलायचे तर भारतीय हवाई क्षेत्र बंद झाल्यामुळे शेजारच्यांना दररोज १ कोटी रुपयांचे नुकसान होईल, असा अंदाज आहे.

भारतीय विमान कंपन्यांसाठी आपले हवाई क्षेत्र बंद करून पाकिस्तानला मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून, यामुळे देशाच्या उत्पन्नाचा एक प्रमुख स्रोत असलेल्या ओव्हरफ्लाइट शुल्कावर परिणाम झाला आहे. फायनान्शियल एक्स्प्रेसच्या एका अहवालानुसार, बोईंग ७३७ सारख्या छोट्या विमानांमुळे पाकिस्तानला दररोज किमान ५८,००० डॉलर्सचे नुकसान होत असल्याचा अंदाज आहे. या विमानांचा वापर इंडियन एअरलाइन्स करत ज्यांचे शुल्क सुमारे ५८० आहे, जे विमानाचे वजन आणि प्रवास केलेल्या अंतरावर अवलंबून असते.

त्याचवेळी भारत बोईंग ७७७ सारखी मोठी विमानेदेखील चालवतो. या विमानांचे शुल्क १,२०० ते १,७०० पर्यंत आहे, कारण त्यांचे वजन जास्त आहे. लहान आणि मोठ्या विमानांसह भारतीय उड्डाणांमुळे पाकिस्तानला दररोज सुमारे १,२०,००० (सुमारे १.०२ कोटी रुपये) नुकसान होत आहे.

# द्विपक्षीय व्यापार उद्योगाला चालना, निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील : गांधी

## हाँगकाँगच्या शिष्टमंडळाची महाराष्ट्र चेंबरला भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो, साऊथ एशियाचे सल्लागार राजेश भगत, वरिष्ठ प्रकल्प व्यवस्थापक झहीर मर्चंट यांच्या शिष्टमंडळाने महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड अग्रिकल्चरच्या मुख्यालयास भेट दिली. याप्रसंगी महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले. अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत द्विपक्षीय व्यापार संधींबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाली. सामंजस्य करार करण्याचे ठरले.

महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी महाराष्ट्र चेंबरच्या कार्याची माहिती दिली. राज्यातील व्यापार, उद्योगांची माहिती देऊन महाराष्ट्र चेंबरने जागतिक स्तरावर व्यापार, उद्योग, कृषी उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका असून, अनेक देशांतील चेंबर ऑफ कॉमर्सबरोबर सामंजस्य करार केला असल्याची



**नाशिक : हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो यांचे स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करताना महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी.**

माहिती दिली. तसेच द्विपक्षीय व्यापार उद्योगांना चालना देणे, त्यांचा विकास करणे, माहिती तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करणे यासाठी हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिल व महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स यांच्या होणाऱ्या सामंजस्य करारामुळे द्विपक्षीय व्यापार उद्योगाला चालना मिळेल. महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगांना निर्यातीच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वास अध्यक्ष ललित गांधी यांनी व्यक्त केला. हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या साउथेस्ट एशिया आणि साउथ एशियाचे प्रादेशिक संचालक रोनाल्ड हो यांनी हाँगकाँग ट्रेड डेव्हलपमेंट कौन्सिलच्या माध्यमातून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योगाच्या वृद्धीसाठी, राज्यातील कृषीमाल निर्यात याविषयी विविध संधी उपलब्ध होतील. महाराष्ट्र चेंबरच्या सहकार्याने व्यापार, उद्योगांच्या विकासासाठी संयुक्तरीत्या काम करू, असे सांगितले.

सामंजस्य करार करण्यात येणार आहे. या चर्चासत्रात वरिष्ठ उपाध्यक्ष रवींद्र माणगावे, उपाध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष करुणाकर शेट्टी, उपाध्यक्ष संजय सोनवणे, उपाध्यक्ष शंकर शिंदे, कांतीलाल चोपडा उपस्थित होते.

# टोयोटातर्फे इनोव्हा हायक्रॉसची एक्सक्लुझिव्ह एडिशन लाँच

**मुंबई :**

आपल्या कस्टमर फर्स्ट फिलॉसॉफीशी प्रामाणिक राहत टोयोटा किर्लोस्कर मोटर अर्थात टीकेएमने इनोव्हा हायक्रॉसच्या झेडएक्स (ओ) ग्रेडमध्ये एक्सक्लुझिव्ह एडिशन लाँच केली. इनोव्हा हायक्रॉसच्या उल्लेखनीय यशानंतर, ही नवीन एडिशन खास स्टाइलिंग व आरामदायी केबिन अनुभवासह फीचर्स सादर करत आहे. ड्युअल टोन एलिमेंट्स रूफ, फ्रंट ग्रिस, रिअर गार्निश, अलॉय व्हील्स, हूड एम्ब्लेम यांसह इतर रेग्युलर फीचर्स आहेतच.




देशभरातील लाखाहून अधिक ग्राहकांनी इनोव्हा हायक्रॉसवर विश्वास दाखवला असून, ही कार तिच्या आकर्षक स्टाइल व उत्कृष्ट कार्यक्षमतेने सर्वांना आकर्षित करत आहे. प्रत्येक ड्राइव्हला खास तिला चालविणाऱ्या व्यक्तीप्रमाणेच खास बनविण्यासाठी डिझाइन केलेली इनोव्हा हायक्रॉस एक्सक्लुझिव्ह एडिशन झेडएक्स(ओ) मे २०२५ ते जुलै २०२५ पर्यंत सुपर व्हाइट आणि पर्ल व्हाइट या दोन कलरमध्ये मर्यादित संख्येत उपलब्ध असेल.

या लाँचबद्दल बोलताना वरिंदर वाधवा, व्हाइस प्रेसिडेंट, सेल्स, सर्व्हिस आणि युज्ड कार बिझनेस, टोयोटा किर्लोस्कर मोटर म्हणाले, एसयूव्हीसारख्या डिझाइनसह एमपीव्हीसारखी स्पेशियसनेस देणाऱ्या इनोव्हा हायक्रॉसने नेहमीच ग्राहकांची मनं जिंकली आहेत. ग्राहकांनी आमच्या ब्रँडवर दाखवलेला विश्वास व प्रेम यासाठी आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत. आमच्या ग्राहकांच्या बदलत्या अपेक्षांना पूर्ण करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेली इनोव्हा हायक्रॉस एक्सक्लुझिव्ह एडिशन झेडएक्स(ओ) लाँच करताना आम्हाला आनंद होत आहे. टोयोटाची 'एक्सक्लुझिव्हनेस' आणि उच्च दर्जाच्या ग्राहक अनुभवाबाबतची वचनबद्धता हे या व्हेरिएंटचे वैशिष्ट्य आहे. या एडिशनमुळे अधिक मूल्य आणि सुविधा प्रदान करता येतील. इनोव्हा हायक्रॉसच्या गुणवैशिष्ट्यांवरच हे विकसित व्हर्जन आहे, जी कुटुंबांसाठी आरामदायक प्रवास सुनिश्चित करते. सर्व टोयोटा डीलरशिपमध्ये बुकिंग खुली आहे.




# हीरो मोटोकॉर्पकडून महाराष्ट्रात विस्तार

## नाशकात 'हीरो प्रीमिया' डीलरशिपचे उद्घाटन

**नाशिक : प्रतिनिधी**

हिरो मोटोकॉर्प या जगातील मोटारसायकल्स आणि स्कूटर्सच्या सर्वांत मोठ्या उत्पादक कंपनीने नाशिकमध्ये आपल्या प्रीमिया डीलरशिपचे उद्घाटन करण्यात आले. आपल्या ग्राहकांना उत्तम दर्जाच्या उत्पादनांची उपलब्धता वाढवण्यासाठी हीरो प्रीमिया डीलरशिप अत्यंत गजबजीच्या त्र्यंबकेश्वर रोडवर उघडण्यात आली आहे. या अद्ययावत स्टोअरमध्ये हीरो, विदा आणि हार्ले डेव्हिडसन एक्स उत्पादनांसाठी वचनबद्ध विभाग आहेत.

या डीलरशिपचे उद्घाटन हीरो मोटोकॉर्पच्या चॅनल अपॉइंटमेंट आणि डेव्हलपमेंट विभागाच्या प्रमुख नवनीत कौर यांच्या उपस्थितीत झाले. या उद्घाटनासोबत महाराष्ट्रात आता आठ हिरो प्रीमिया डीलरशिप्स झाल्या आहेत. आपल्या सर्व ग्राहकांना एक ताजातवाना ऑटोमोटिव्ह अनुभव देण्यासाठी हीरो प्रीमियामध्ये आधुनिक वास्तुरचना, आकर्षक डिझाइन आणि उत्तम दर्जाच्या नवीन युगाच्या तंत्रज्ञानाचा समावेश आहे.

या श्रेणीतील उत्तम प्रीमियम मालकीच्या अनुभवासाठी व्यावसायिकदृष्ट्या प्रशिक्षित विक्री सल्लागारांची एक टीम मौल्यवान ग्राहकांना त्यांच्या मोबिलिटीच्या गरजांनुसार वैयक्तिकीकृत विक्री सल्ला देईल. हीरो प्रीमिया डीलरशिपमध्ये विविध प्रकारची उत्पादने आहेत. त्यात मावेरिक ४४०, एक्स्ट्रीम २५०आर, एक्स्ट्रीम १६० रेंज, एक्सपल्स २१०, एक्सपल्स २०० रेंज, करिझ्मा एक्सएमआर, हार्ले डेव्हिडसन एक्स ४४० आणि विदा व्ही२ रेंज आहे. त्यासोबत विविध प्रकारच्या खास मर्चंडाइज आणि एक्सेसरीजचा समावेश आहे. या नवीन डीलरशिपच्या उद्घाटनासोबत हीरो मोटोकॉर्पने आपल्या प्रीमिया डीलरशिपचा विस्तार ८१ आऊटलेट्समध्ये केला आहे.

# 'आझाद'च्या लीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटचे उद्घाटन

**मुंबई :**

अभियांत्रिकी क्षेत्रात अग्रेसर असलेल्या आझाद इंजिनिअरिंगने काल त्यांच्या नवीन लीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटच्या उद्घाटनाने आणखी एक उल्लेखनीय टप्पा गाठला आहे. जीई वर्नोव्हाच्या स्टीम पॉवर सर्व्हिसेस बिझनेस युनिटसाठी क्षमतेची बांधिलकी पूर्ण करण्यासाठी हैदराबादमधील तुनिकिबोल्लारम येथे असलेल्या आझादच्या सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनोव्हेशन सेंटरमध्ये हे युनिट डिझाइन केले गेले आहे.

७६०० चौरस मीटरमध्ये पसरलेल्या या आधुनिक युनिटचे उद्घाटन जीई वर्नोव्हाच्या या मान्यवरांच्या हस्ते झाले. यावेळी रोडोल्फो टोरेस, लीन लीडर, अंकुर चंडक, सोर्सिंग लीडर; मार्टिन शेफर, ग्लोबल कमोडिटी लीडर, अखोना कबाका, सप्लायर क्वालिटी लीडर, मिस कार्ले लोरेन्स, ग्लोबल प्लॅनिंग लीन लीडर आणि राकेश चोपदार, चेअरमन आणि सीईओ, आझाद इंजिनिअरिंग उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना आझाद इंजिनिअरिंगचे अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राकेश चोपदार म्हणाले की, या एक्सक्लुझिव्ह लीन मॅन्युफॅक्चरिंग युनिटचे उद्घाटन, जीई वर्नोव्हाच्या स्टीम पॉवर सर्व्हिसेस बिझनेस युनिटसोबत २०१३ मध्ये सुरू झालेल्या आमच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण यश आहे. गुणवत्ता, नवोन्मेष आणि अचूक अभियांत्रिकीसाठी




असलेल्या बांधिलकीमुळे आम्ही एका साध्या सुरुवातीनंतर जागतिक दर्जाच्या मॅन्युफॅक्चरिंग सेंटरपर्यंत पोहोचलो आहोत, ज्याने जागतिक उत्पादनात भारताची स्थिती अधिक मजबूत केली आहे. ७६०० चौरस मीटरमध्ये पसरलेले हे आधुनिक युनिट आमच्या सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनोव्हेशन सेंटरमधील प्रमुख ग्लोबल ओईएम भागीदारांसाठी निश्चित केलेले मॅन्युफॅक्चरिंग स्पेस तयार करण्याच्या आमच्या योजनांचा एक भाग आहे. १८० हून अधिक प्रत्यक्ष कुशल व्यावसायिक या युनिटमध्ये कार्यरत आहेत आणि आगामी काळात शेकडो अन्य व्यावसायिकांना येथे रोजगाराच्या संधी मिळतील. आम्ही या कारखान्यातून दरवर्षी सुमारे १,००,००० ब्लेड तयार करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

# आयपीएस बिरदेव डोणे यांच्या वाचनालय उपक्रमाला प्रतिसाद

## शिखर पहारिया यांनी केली १,००० पुस्तके भेट




**कोल्हापूर :**

एका सशक्त पावित्र्यात, शिखर पहारिया यांनी नव्याने नियुक्त झालेल्या आयपीएस अधिकारी बिरदेव धोणे यांच्या प्रेरणादायी उपक्रमासाठी १,००० पुस्तके दान केली आहेत. हा उपक्रम त्यांच्या मूळ गावात स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वाचनालय उभारण्याचा आहे. बिरदेव हे कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातून यूपीएससी उत्तीर्ण होणारे पहिले व्यक्ती आहेत.

अलीकडेच, बिरदेव यांनी बुके नव्हे, पुस्तके पाठवा असे आवाहन करत समाजमाध्यमांवर एक भावनिक पोस्ट शेअर केली होती, जी देशभरात गाजली. या संदेशाने भारावून जाऊन, शिखर पहारिया यांनी शैक्षणिक आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त अशा अनेक पुस्तकांची मोठी खेप गावाकडे पाठवली.

अतिशय साध्या पार्श्वभूमीतून आलेले बिरदेव यांनी २०२० ते २०२१ या काळात पोस्टमन म्हणून काम केले आणि त्याचवेळी यूपीएससीचा स्वप्न उराशी बाळगले. त्यानंतर ते दिल्लीला गेले, आर्थिक अडचणींशी झुंज दिली, पण हार न मानता मेहनत घेतली आणि वयाच्या २७व्या वर्षी पहिल्याच प्रयत्नात आयपीएस झाले.

शिखर यांचे हे योगदान केवळ भेटवस्तू नाही, तर एक संदेश आहे - संधी, समता आणि शिक्षणाच्या माध्यमातून आयुष्य बदलण्याच्या शक्तीवरचा विश्वास. जसा विश्वास बिरदेव यांनी त्यांच्या प्रवासातून दाखवून दिला आहे.

या भेटवस्तूंच्या हस्तांतरणाचे फोटो आणि व्हिडिओ सध्या समाजमाध्यमांवर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत आणि नेटिझन्स दोघांच्याही कार्याची भरभरून प्रशंसा करत आहेत.

आम्हाला आणखी भाषांतर, मथळे किंवा सोशल मीडिया कॅप्शन हवे असल्यास सांगू शकता.

# आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी आयकराचे नवीन सुधारित फॉर्म्स

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळने बुधवार, दि. १ एप्रिलपासून लागू होणाऱ्या मूल्यांकन वर्ष २०१५-२६ साठीचे आयकर विवरणपत्र फॉर्म क्रमांक १ (सहज) आणि फॉर्म ४ (सुगम) चे नवीन स्वरूप अधिसूचित केले आहे. यामुळे अर्थातच लहान गुंतवणूकदारांसाठी कर विवरणपत्रक भरणे अधिक सुलभ होणार आहे, असे चित्र आहे. यातील मुख्य बाबी म्हणजे, रु.५० लाखांपर्यंत एकूण उत्पन्न असलेल्या निवासी व्यक्तींना हे फॉर्म वापरता येतील. दीर्घ मुदतीच्या भांडवली नफ्यावर रु.१.२५ लाखांपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांनाही ITR-१ किंवा ITR-४ वापरण्याची मुभा देण्यात आली आहे, ज्या वेळेस या उत्पन्नावर कोणताही बॅलन्स फॉरवर्ड किंवा लॉस दर्शविण्यात येणार नसेल. यापूर्वी अशा करदात्यांना ITR-२ किंवा ITR-३ वापरावा लागत असे, जे लहान गुंतवणूकदारांसाठी अतिशय क्लिष्ट होते.

आता या बदलामुळे साध्या आणि वेगवान कर विवरण प्रक्रियेस चालना मिळेल अशी शक्यता वाटते. नव्याने करण्यात आलेल्या या सुधारणेमुळे लहान गुंतवणूकदार व नोकरदार व्यक्तींना त्यांचे आयकर विवरण सादर करताना त्यात सुलभता आणि अचूकतेसाठी ते उपयुक्त ठरेल, असे मत नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष नितीन डोंगरे यांनी व्यक्त केले आहे.

**नवीन सुधारित नियम व वैशिष्ट्ये :**

१) करकपातीबाबत विवरण सुस्पष्ट करणे आवश्यक : करदात्यांना आता कुठल्या कलमांतर्गत TDS वजावट झाली आहे हे स्पष्टपणे नमूद करणे बंधनकारक राहील. कलम १९४ - लाभांशावरील TDS कलम १९४- - बँक ठेवींवरील व्याजावर TDS यासारख्या बाबी स्पष्टपणे नोंदवाव्या लागतील.

२) कर लागणार नाही अशा उत्पन्नावर नवे विभाग : नव्या फॉर्ममध्ये करमुक्त उत्पन्नाचे तपशील देण्यासाठी स्वतंत्र विभाग त्यात समाविष्ट करण्यात आलेले आहेत.

३) कलम ११२- अंतर्गत भांडवली नफा करमाफी : दीर्घ मुदतीच्या भांडवली व्यवहारावर कर भरावा लागत नसेल, म्हणजेच करमुक्त LTCG असल्यास, त्याचे पूर्ण तपशील त्यात नमूद करणे आवश्यक राहील, उदा. एकूण विक्री किंमत, मिळवलेली मूळ किंमत आणि एकूण भांडवली नफा या बाबी त्यात नमूद कराव्या लागतील.




**नितीन डोंगरे**
**कर सल्लागार**
**९११२१२३२६५**

४) उच्च मूल्याच्या व्यवहारांवरील देखरेख : परदेश प्रवासावर रु.२ लाखांपेक्षा जास्त खर्च किंवा रु.१ लाखावरील वीज वापर असल्यास, अशा व्यक्तींना त्यांचे उत्पन्न अगदी करपात्र नसले तरी आयकर विवरणपत्रक सादर करणे आवश्यक राहील.

५) जुना टॅक्स रिजिम पर्याय निवडताना अर्ज करणे आवश्यक : व्यक्तींनी जर जुनी कर प्रणाली निवडली असेल आणि त्यांनी फॉर्म १०EA भरला असेल, तर त्यांना त्याची पुष्टी विचारली जाईल. तर, व्यवसाय करणाऱ्यांनी फॉर्म १०AIEA सादर करूनच नवीन प्रणालीमधून जुन्या कर प्रणालीकडे त्यांना वळावे लागेल.

मागील वर्षी अनेक करदात्यांनी ही माहिती न भरल्याने त्रास झाला होता.

**विवरणपत्रकाचे प्रकार :**

आयकर विभागाने आर्थिक वर्ष २०१४-२५ (आकारणी वर्ष २०२५-२६) साठी विविध आयकर विवरणपत्रकाचे (ITR Forms) प्रकार प्रसिद्ध केले आहेत. खाली दिलेली आहेत

ITR-१ कोण वापरू शकतो :

निवासी व्यक्ती ज्याचे एकूण उत्पन्न रु.५० लाखांपेक्षा कमी असेल. उत्पन्नाचे स्रोत : पगार, एक घरमालकीचे उत्पन्न, इतर स्रोत (उदा. बँकेवरील व्याज) कलम ११२- अंतर्गत रु.१.२५ लाखांपर्यंतचा दीर्घकालीन भांडवली नफा (२०१५-२६ पासून)

ITR-२ **कोण वापरू शकतो :**

वेतन, भाडे, भांडवली नफा, इतर स्रोत इ. प्रकारचे उत्पन्न असलेले व्यक्ती, अनिवासी भारतीय, भांडवली नफा कोणत्याही स्वरूपाचा (लाभ किंवा तोटा), एकाधिक घरमालकी, शेअर्स विक्री इ. ज्यांचं उत्पन्न व्यवसाय, व्यावसायिक सेवा, फर्ममधील भागीदारी इ. वर आधारित आहे, जर शेअर्स ट्रेडिंग, व्यावसायिक कमाई असेल त्यांना हा फॉर्म वापरता येईल.

ITR-४ **कोण वापरू शकतो :** कोणतीही निवासी व्यक्ती, HUF किंवा फर्म, ज्यांनी त्यांचे उत्पन्न अनुमानित पद्धतीने दर्शविलेले असेल, एकूण उत्पन्न रु.५० लाखांपेक्षा कमी, कलम ११२- अंतर्गत रु.१.२५ लाखांपर्यंतचा LTCG असल्यासही वापर शक्य (२०२५-२६ पासून)

ITR-५ **कोण वापरू शकतो :** -OP, BOI, LLP, ट्रस्ट, एखादी सहकारी संस्था इ. यांच्यासाठी आयटीआर ५ हा नमुना कायम आहे.

ITR-६ **कोण वापरू शकतो :** कंपनी (Company) - ज्या कंपन्या कलम ११ अंतर्गत कर सवलत घेत नाहीत.

ITR-७ कोण वापरू शकतो : ट्रस्ट, धर्मादाय संस्था, राजकीय पक्ष, शैक्षणिक संस्था - कलम १३९(4A) ते १३९(4D) अंतर्गत करसल्लागारांनी तसेच करदात्यांनी त्यांना आर्थिक वर्षात मिळालेले उत्पन्न, त्याचा प्रकार आदी बाबी तपासून मगच सुयोग्य आयकर विवरणपत्रकाचा वापर करावा.

गांवकरी
नाशिक, शनिवार, दि. ३ मे २०२५
लाईफ स्टाईल




# तणावमुक्त जीवन



सृष्टीवर जर सगळं मिथ्य असेल तर मग चिंता, चिंतन आणि तणाव घेण्याची गरज काय आहे; मात्र हे कळत नाही म्हणून तणाव निर्माण होतो. कधी कधी दुर्दैवाने हे आपल्याला कळतं, मात्र वळत नाही. हीच सगळ्यात मोठी समस्या आहे. तणाव मनात साठवला तर त्याचा उद्रेक कधी होईल हे आपल्याला पण समजणार नाही. म्हणून तणाव मनात साठवण्याऐवजी त्याला योग्य वेळी वाट मोकळी करून देणं कधीही हितकारक ठरते. मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे.

शाश्वत जीवनात मोह, माया, स्वार्थ, भौतिक आशा-अपेक्षा नसतात, पण संसारीक भौतिक जीवनात मात्र अनेक आशा-अपेक्षा, मोह, स्वार्थ, अहंकार असल्याने दैनंदिन जीवनात अनेक ताणतणावाचे प्रसंग निर्माण होतात आणि याच ताणतणावाचे जीवनात योग्य व्यवस्थापन करण्यामध्ये जर आपण यशस्वी झालो तर मनात रागाचा संचय निर्माण होऊ शकत नाही हे वास्तविक सत्य आहे. सर्वसाधारणपणे आपल्याला अधूनमधून प्रचंड मोठ्या प्रमाणात राग येतो. तो अनेकदा अनावर देखील होत नाही. तो येणं स्वाभाविक आहे आणि प्रचंड राग हा काही क्षणातच एकाएकी अथवा अचानक येत नाही. तर तो अनेक दिवसांपासून आपल्या मनात एकप्रकारचा वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने जो तणाव संचय निर्माण झालेला असतो, त्याचा तो उद्रेक असतो. वास्तविक पाहिलं तर जीवनातील सुखदुःखं हे समीकरण असतंच आणि व्यक्ती कोणीही असो, कर्म भोग हे कोणालाही चुकत नाहीत. त्यामुळे जीवनातील सुखदुःख यापासून स्वतःची सुटका कोणालाही करून घेणं शक्य होत नाही. तरीसुद्धा दैनंदिन अनेक विषयांच्या अनुषंगाने आपल्या मनात सकारात्मक आणि नकारात्मक भाव प्रकट होत असतात. ते निर्माण होणं स्वाभाविक आहे. राग हा कुठल्याही प्रकारचा असो, एका क्षणात निर्माण होत नाही हे अगदी धुतल्या तांदळासारखं स्वच्छ आणि वास्तव सत्य आहे. एक एक टप्प्याने हळूहळू मनात राग संचय होऊन तो आपलं स्वरूप विस्तार करत असतो.

आपण ज्या व्यक्तीशी संवाद साधल्यानंतर आपल्या मनाला हलकं वाटतं, बरं वाटतं, मनःशांती मिळते, अशा व्यक्तीला अहंकार बाजूला ठेवून आवश्यकतेनुसार वैचारिक संवाद साधला पाहिजे. असे शब्द आपल्या कानावर पडताक्षणी आपण तणावमुक्त झाल्यासारखे आपल्याला वाटत असतं. आणि त्यामुळे निर्माण होणारा तणाव, त्याचे रागात होणार रूपांतर होण्याऐवजी तो जागीच संपुष्टात येतो.

दैनंदिन जीवनात वाचन मग ते काही पण वाचा, मात्र वाचन आवश्यक आहे. वाचल तर वाचाल हे

**गणेश खाडे**

उगीच म्हटलं नाही आणि त्यामध्येही आध्यात्मिक वाचन केले तर अति उत्तम आहे आणि या पद्धतीने आपण आपल्या जीवनात निर्माण होणारा शारीरिक, मानसिक तणाव कमी करू शकतो आणि पर्यायाने त्याचे रागात होणार रूपांतर आपण नक्कीच थांबवू शकतो. स्वतःचा बचाव करून आपण आपलं मोठं नुकसानदेखील टाळू शकतो आणि एक ज्ञान पूर्ण शांत, स्थिर जीवन आपण जगू शकतो.

# अतिथी देवो भवः

आगाऊ कळवून भोजनास येणारी मंडळी पाहुणे या संज्ञेत मोडतात तर तिथी न कळवता येणारा हा अतिथी असतो.

अतिथी देवो भवः याचा शब्दशः अर्थ आहे की, ज्याच्यासाठी अतिथी देव आहे असे व्हा.

**तृणानि भूमिरुदकं**
**वाक्चतुर्थी च सूनृता ।**
**सतामेतानि गेहेषु**
**नोच्छिद्यन्ते कदाचन ।।**
**(महाभारत ५- ३६-३४)**

**गिरीश उदास**
**९४२२७६३४१२**

सज्जनांच्या घरी गवताचे आसन, स्वच्छ जागा, जल व सत्यप्रिय भाषण यांची कधीच कमतरता भासत नाही. त्यांच्या घरी या चार गोष्टी अतिथी सत्काराकरिता सदैव तत्परच असतात.

भूक लागणे व भोजन करणे ही मानव व प्राण्यांमध्ये समान नैसर्गिक गोष्ट आहे. पूर्वी अनेक लोक पायी प्रवास करत तीर्थयात्रा करत. या मंडळींची भोजनाची सोय व्हावी याकरिता शास्त्रकारांनी ही व्यवस्था लावून दिली आहे. अनेक मंदिरांमध्ये पांथस्थांना मुक्कामाकरिता धर्मशाळांची योजना यासाठी केली गेली.

अतिथींकरिता वाट पाहावी. दुपारी किमान चार घास तरी अन्न अतिथींकरिता जास्त शिजवावे असे शास्त्रवचन आहे. अन्न शिल्लक राहिले तर ते रात्रीसाठी उपयोगी येते.

घरी अतिथी आला तर त्याच्याकडे आनंदी नजरेने पाहणे, मनापासून सेवा करणे, गोड बोलून समाधानी करणे व जेव्हा तो जायला लागतो तेव्हा काही अंतर त्याच्याबरोबर चालणे ही पाच कर्मे मनुष्ययज्ञाची पंचविध दक्षिणा आहे.

यानंतर आपल्या मनात प्रश्न असा येतो की, एखादा पाहुणा वाईट वागला तर यजमानाने त्याला किती प्रमाणात सामावून घ्यावे? त्यांनी ते स्वीकारावे का?

'अतिथी देवो भव'चा गर्भित अर्थ असा आहे की, दारी आलेला अतिथी हा साधकरूपात देवाच्या भेटीला आला असून, त्याला देवासारखे वागवावे.

दारी आलेल्या अतिथीला कधीही विन्मुख पाठवू नये. भोजन देता आले नाही तर यथाशक्ती मदत द्यावी. हे कर्म प्रत्यक्ष भगवंताची सेवा केल्याचे पुण्य प्राप्त करून देते.

अगदी शत्रूलादेखील अतिथी मानून भोजन वाढावे असे शास्त्र वचन आहे.

**भुकेल्यासी अन्न,**
**सतपात्री दान ।**
**भावे दिल्यावीण**
**राहू नये ।।**

असे संत म्हणतात ते यथार्थ आहे.

# मुंगा साडी म्हणजे काय?



आपल्याकडे कोणतेही शुभकार्य असल्यास तसेच सणवार असल्यास महिला आर्वजून साड्या परिधान करतात. कारण भारतात साड्यांचे आणि ती परिधान करण्याच्या पद्धती वेगवेगळ्या आहेत. त्यातच तुम्हाला वेगळ्या शैलीतील साड्यांमध्ये कांजीवरम्, बनारसी, पटोला अशा अनेक प्रकारच्या साड्या नेसल्या जातात. अशातच भारतात साड्यांचा स्वतःचा इतिहास आहे, जिथे प्रत्येक राज्याची स्वतःची खास साडी असते, जी त्या राज्याची संस्कृती आणि परंपरा प्रतिबिंबित करते. तर यापैकी एक म्हणजे मुंगा साडी, जी तिच्या अतुलनीय सौंदर्यासाठी, उत्तम कारागिरीसाठी आणि उत्कृष्ट गुणवत्तेसाठी ओळखली जाते.

'मुंगा साडी' ही आसामची एक अतिशय खास आणि प्राचीन वारसा असलेली साडी मानली जाते. ही साडी मुगा सिल्कपासून बनवली आहे, जी जगातील सर्वात अनोखी आणि टिकाऊ सिल्कपैकी एक आहे. तर ही साडी बनवण्यासाठी महिने लागतात. त्यात या साडीची खासियत म्हणजे ही साडी जितकी जुनी होत जाते तितकीच ती चमकदार दिसते. हेच कारण आहे की ही साडी पिढ्यान्‌पिढ्या वारसा म्हणून चालवली जाते.

**मुंगा साडीचा इतिहास**

आसाम राज्याची प्राचीन वारसा जपणारी मुंगा सिल्क साडीचा इतिहास खूप जुना आहे. त्यातच ही साडी बनवण्यासाठी लागणारे रेशीम विशेषतः आसाम राज्यात बनवले जाते. हे रेशीम फक्त आसाममध्ये आढळणाऱ्या अँथेरिया असामेन्सिस नावाच्या एका विशेष प्रकारच्या किड्यापासून तयार केले जाते. प्राचीन ग्रंथांमध्ये आणि आसामच्या राजघराण्यातील पोशाखांमध्येही मुंगा रेशीमचा उल्लेख आढळतो. असे म्हटले जाते की, प्राचीन काळात ही साडी फक्त राजघराणे आणि आसाममधील उच्चवर्गीय महिलाच परिधान करत असत, कारण ही साडी बनवण्याची प्रोसेस कॉम्प्लिकेटेड आणि वेळखाऊ होती. आसामचे राजे आणि राण्या ते शाही पोशाख म्हणून परिधान करायचे.

**मुंगा साडीची वैशिष्ट्ये**

मुंगा साडीमध्ये असे अनेक खास वैशिष्ट्ये आहेत, ज्यामुळे ती इतर साड्यांपेक्षा वेगळी ठरते.

नैसर्गिक सोनेरी चमक - मुंगा सिल्कची सर्वांत अनोखी गोष्ट म्हणजे त्याला नैसर्गिक सोनेरी पिवळा रंग आहे, जो कालांतराने अधिकाधिक उजळत जातो. मुंगा सिल्क साडी बनवण्यासाठी लागणारे रेशीम इतर रेशीम कापडांपेक्षा जास्त चमकदार आहे आणि या साडीला रंगवण्याची आवश्यकता भासत नाही.

**मजबूत आणि टिकाऊ** - मुंगा सिल्क हा जगातील सर्वांत मजबूत नैसर्गिक फायबर मानला जातो. हे रेशीम इतके टिकाऊ आहे की, यापासून बनवलेल्या साड्यांची योग्य काळजी घेतल्यास ते पिढ्यान्‌पिढ्या वापरता येते.

आसामची पारंपरिक कलाकुसर- मुंगा साडीमध्ये आसामची पारंपरिक कलाकुसर दिसून येते. त्यामध्ये पारंपरिक हाताने विणलेल्या नक्षीकामांचा समावेश आहे, जे बहुतेक निसर्गापासून प्रेरित आहेत जसे की फुले, वेली, पक्षी आणि पारंपारिक भौमितिक डिझाइन.

अत्यंत हलकी आणि आरामदायी - मुंगा सिल्क ही साडी जड दिसत असली तरी ती परिधान करायला खूप हलकी आणि आरामदायी आहे. हे रेशीम इतकं मऊ आहे की, तुम्ही उन्हाळ्यातहीदेखील ही साडी सहजपणे परिधान करता येते.

# काजळ लावताना काळजी



खरं तर, तेलकट त्वचा हे काजळ पसरण्याचे मुख्य कारण असू शकते. काजळ पसरू नये म्हणून थंड पाण्याने डोळे आणि पापण्या पुसा. व्यवस्थित कोरडे होऊ द्या. त्यामुळे आपल्या डोळ्याभोवती तेलकटपणा राहणार नाही आणि काजळदेखील पसरणार नाही.

**पापण्यांवर फाउंडेशन लावा**

काजळ लावण्यापूर्वी पापण्यांवर व्यवस्थित फाउंडेशन लावा. यामुळे आपले काजळ अधिक काळ टिकेल.

**पावडर लावा**

डोळ्यांना उठावदार लूक देण्यासाठी काजळ लावल्यानंतर पापण्यांवर पावडर लावा. आपण मेकअप पावडर वापरू शकता.

**तपासून घ्या**

काजळ खरेदी करताना नेहमी काळजी घ्या. नेहमी स्मज प्रूफ, स्मुज फ्री आणि लाँग स्टे काजळ खरेदी करा. अशा प्रकारचे काजळ आपला लूक बराच काळ टिकवून ठेवेल. तसेच, डोळ्यांना ठळक लूक देईल.

# फिटनेस मंत्रा

फिट राहण्यासाठी व्यायामाबरोबरच काही गोष्टींची काळजी नियमित घ्यावी लागते.

**तणावापासून दूर**

ताण आपल्या आरोग्यासाठी सर्वांत हानिकारक आहे. त्यामुळे नेहमी तणावमक्त राहण्याचा प्रयत्न करावा. कठीण काळात जितके शांत राहाल, तितके आरोग्यासाठी चांगले आहे.

**कॅलरीवर लक्ष**

हार्डकोर डाएटऐवजी आपल्या नियमित पदार्थांतून सेवन करत असलेल्या कॅलरीवर नियंत्रण ठेवाव्यात. आहारात अधिक कॅलरीयुक्त पदार्थांचा समावेश टाळावा.

**भरपूर झोप**

पुरेशी झोप चांगल्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाची असते. मानवी शरीराला दररोज ७ ते ८ तास झोप मिळणे आवश्यक आहे. चांगली झोप निरोगी ठेवते.

**भरपूर पाणी**

दररोज २ ते ३ लिटर पाणी प्यायला हवे. शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. पाणी पिण्यामुळे वजन नियंत्रणात राहते आणि चरबीही कमी होते.

**स्वतःला आनंदी ठेवा**

सतत स्वतःला आनंदी ठेवल्याने आपले आरोग्य देखील चांगले राहते. एखाद्याने प्रत्येक गोष्टीत आनंदी राहिले पाहिजे. यामुळे निरोगी राहाल, तसेच तणावापासून दूर राहण्यास मदत होईल.

## फेस्टिव्ह फॅशन

# ट्रेंडी ज्वेलरी





**कधी कधी स्टाइल म्हणजे महागडं असणं नाही, तर किफायतशीर असणंसुद्धा एक स्टाइलच असते!**

**१. ऑक्सिडाइज्ड झुमके - पाचव्या मजल्यावरून पाहिलं तरी दिसतील!**

कधी विचार केलाय का की, आईची जुनी साडी + ऑक्सिडाइज्ड झुमके = डेडली कॉम्बिनेशन?

हे झुमके फक्त ९९-१४९ मध्ये मिळतात आणि कोणत्याही सिंपल कुर्त्याला देतात रॉयल आणि देसी टच!

**२. मिनिमल पेंडंट - लहान पण महत्त्वाचं खरं उदाहरण**

कोरियन लुक्समध्ये जी साधी-सोबर, छोट्या हारची ट्रेंड आहे, ती आज सगळीकडे दिसते.

८९-१२९ मध्ये मिळणारे हे पेंडंट्स डेली कॉलेज लूकला देतील सॉफ्ट फेमिनिन वाइब.

**३. स्टेटमेंट इअरकफ्स - कानात घालायचे, पण लक्ष सगळ्यांचं मिळवणारे!**

कोणतीही पिअरसिंग न करता कूल दिसायचंय?

१४९ च्या आत मिळणारे हे इअरकफ्स रेड टॉप + ब्लॅक जीन्ससाठी परफेक्ट मॅच!

**४. मल्टीरिंग सेट्स - एक बोट नाही तर सगळी बोटं शोभली पाहिजेत!**

१९९ मध्ये मिळणारे ५-६ रिंग्सचे सेट्स म्हणजे किफायतशीर रॉयल्टी!

कॉफी घेणारी हातातली पोज + हे रिंग्स = लुक पूर्ण झाला म्हणायचा!

**५. नाकातलं छोटं नथसदृश पिन - देसीपणा थोडासा ग्लॅमरस!**

ही ट्रेंडिंग गोष्ट ४९-९९ मध्ये मिळते आणि फेसकट फोटोंमध्ये ती कॅमेऱ्याला जास्त आवडते!

भारतीय लुकमध्ये लहान नथ एक वेगळीच कमाल दाखवते.

**६. फंकी चोकर - ब्लॅक, बेल्ट स्टाइल, बीडेड चोकर ट्रेंड मध्ये आहेतच!**

१२९ मध्ये मिळणारा एक चोकर तुझं फॅशन स्टेटमेंट अपग्रेड करेल, लगेच!

**ज्योती हांडगे**
फॅशन डिझाइनर पुणे

**७. मिक्स अँड मॅच ब्रेसलेट्स - फॅब्रिक, मेटल, कुंदन - ब्रेसलेट्सच्या ही भरपूर स्टाइल्स!**

९९ मध्ये दोन-तीन घेता येतील आणि रोज एक नवीन लूक!

**८. हेअर ॲक्सेसरीज - क्लिप्स, बीडेड पिन्स, मिनी रबर बँड्स - हे सगळं ५०!**

आणि स्टाइलला देतात क्लिकबेट इफेक्ट!

# सायबर गुन्हेगारांच्या सावलीतलं इंटरनेट

**चहाच्या कपातून सुरू होणाऱ्या गप्पांपासून बँकेच्या व्यवहारांपर्यंत, आपल्या प्रत्येक डिजिटल श्वासाला टेक्नॉलॉजीचा स्पर्श आहे. पण जसं जाळं मासा पकडायला असतं, तसंच हे इंटरनेट जाळंही कधी कधी आपल्यालाच अडकवू शकतं... सायबर गुन्हेगारांच्या सावलीत.**



**सायबर गुन्हेगार म्हणजे कोण?**

सिंघमसारखी ॲक्शन नसते, ना हॉलीवूड स्टाइल हॅकिंग सीन.

सायबर गुन्हेगार म्हणजे एक क्लिकमध्ये तुमचं आयुष्य विस्कटवणारा मूक हल्लेखोर.

कधी तो ईमेलच्या लिंकमधून येतो, कधी Whatsapp मेसेजमधून, तर कधी तुमच्याच डाउनलोड केलेल्या गेममधून.

हे गुन्हेगार Keyboard मागे बसलेले असतात, पण त्यांचं लक्ष्य तुमचं डेबिट कार्ड, तुमचा ओटीपी आणि कधी कधी तुमचं Identity सुद्धा असतं.

**कुठल्या सावल्या झपाटतात इंटरनेटला?**

- फिशिंग ईमेल्स - तुम्ही लॉटरी जिंकलात! म्हणत फसवणूक
- OTP स्कॅम्स - तुमचा केवायसी संपतोय... म्हणत ओटीपी मागणं
- Fake apps - दिसायला Google Pay, पण डाटा चोरायला तयार
- Ransomware अटॅक्स - तुमचा डेटा Encrypt करून पैसे मागणे

Social Media **फ्रॉड्स** - attractive **प्रोफाइल मागे असतो बनाव**

सावध राहणं म्हणजेच सुरक्षेची सुरुवात.

**वास्तविक घटना :** एका कॉल सेंटर कर्मचाऱ्याची कथा. पुण्यातल्या राहुलची एक छोटीसी चूक त्याला ८०,००० रुपयांना पडली.

ऑनलाइन फूड ऑर्डर करताना, ॲप क्रॅश झालं. त्याच्या ॲपवरील नंबरवर कॉल आला.

हॅलो सर, आम्ही स्विगीमधून बोलतोय, म्हणत समोरच्या व्यक्तीने त्याच्याकडून कार्ड नंबर आणि OTP मागितला. पुढच्याच मिनिटाला त्याच्या खात्यातून पैसे गायब.

**माहिती देताना थांबा - विचार करा, उत्तर द्या.**

- OTP, पासवर्ड, PIN - फक्त तुमच्यासाठी. कोणीही विचारलं, तर 'ना' म्हणा.
- Public Wi-Fi वापरताना बँकिंग नको.
- Fake apps ओळखा - Reviews वाचा, Permissions तपासा.
- Social Media वर अनोळखी फ्रेंड रिक्वेस्ट्सना 'Ignore' करणं हे स्मार्टनेसचं लक्षण आहे.
- सायबर सिक्युरिटी म्हणजे बडं नाव नाही, ती गरज आहे!

**योगेश हांडगे**

**इंटरनेट हे हत्यार आहे**

शाळा-कॉलेजमध्ये आता सायबर जागरूकतेसाठी वेबिनार्स घेतले जात आहेत. पण अजूनही ग्रामीण भागात किंवा ज्येष्ठ नागरिकांमध्ये जागरूकतेचा अभाव आहे. मग इंटरनेटला बाय-बाय करायचं का? नाही! इंटरनेट हे हत्यार आहे - उपयोग कसा करतो, हे आपल्यावर आहे. सायबर गुन्हेगार सावध असतो, पण आपण सजग असलो तर त्याची सावली आपल्यापर्यंत पोहोचत नाही.

- गेल्या काही वर्षांत भारतात सायबर क्राइममध्ये ३५% वाढ झाली आहे. कारण?
- इंटरनेटचा झपाट्याने वाढलेला वापर
- कमी माहिती आणि अति आत्मविश्वास!
- anti-virus, firewall, VPN हे fancy वाटणारे शब्द नाहीत - ते आपल्या डिजिटल शरीरासाठी मास्क आहेत.
- COVID मध्ये जसं मास्क होता, तसंच आता VPN आहे.
- **सरकार काय करतंय?**
- सरकारने 'Indian Computer Emergency Response Team' तयार केलं आहे. यासोबतच "Cybercrime.gov.in' वर तक्रार दाखल करू शकता.